SATSANG

सत्संग

✻ अनुवादक ✻
झाहिद खान

✻ संकलन ✻
माऐल खैराबादी

अनुक्रमणिका

अनु.क्र.	विषय	पृष्ठ क्र.
१	पाषाण हृदय..	६
२	सत्संग..	९
३	बदली..	१२
४	चारित्र्य-घडण..	१६
५	नोकरीतून कमी होणे......................................	२०
६	परिवर्तन..	२२
७	उदरनिर्वाहाची चिंता....................................	२६
८	भावाचे आगमन...	२९
९	ताकीद...	३३
१०	वाहरे चरित्र...	३७
११	वक्र मार्ग..	४०
१२	सामंजस्य..	४४
१३	आशंका...	४८
१४	प्रतिक्रिया...	५३
१५	चारित्र्याची छाप.......................................	५७
१६	लल्ला..	६१
१७	पुढचे पाऊल...	६४
१८	कलकत्त्याहून परतल्यानंतर...............................	६७
१९	इच्छा असूनही...	७१
२०	रात्रभर झोप का येत नाही................................	७५
२१	प्रस्थान...	७८
२२	हत्या..	८२
२३	इस्लामुद्दिनची आत्मकथा.................................	८८
२४	कठीण परीक्षा...	९३
२५	आनंदी आनंद...	९८
२६	घटना...	१०२
२७	शोध..	१०८

''अल्लाह, असीम दयावंत व कृपावंतच्या नावाने''

ही कादंबरी

आज पर्यंत जितक्या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत त्यांच्या तुलनेत ही कादंबरी अगदी वेगळी आहे. ही कादंबरी प्रणय कथा नाही. रहस्य कथा ही नाही. अशा विषयांवरील कादंबऱ्याची लोकांना आवड असते व बाजारात त्यांचीच जास्तीत जास्त विक्री होत असते.

ही कादंबरी वाचल्या नंतर सामान्य माणूस म्हणेल की ही नीतिमत्ते वर आधारलेली कादंबरी आहे. हे अभिप्राय पूर्णत: योग्य मानता येणार नाही. खरे म्हणजे ही एक विचार प्रवर्तक व मार्गदर्शक कादंबरी आहे जी एका बालकाच्या चारित्र्या भवती फिरत राहते व त्याचे बालपण संपताच त्याच्या पासून अलिप्त होते. अर्थात् तिथे विषय संपतो व वाचक चकित होऊन विचारतो पुढे काय?''

उत्तर असे आहे की जर तुम्हाला ह्या कादंबरीचा विषय व शैली आवडली असेल तर या कादंबरीच्या नायकाच्या (बालकाच्या) यशाच्या मागदर्शक तत्वांचा शोध घ्या व स्वत: त्या सशक्त तत्वांचा अवलंब करा व आपल्या आप्तजनांना त्या तत्वांनुसार जीवन व्यतीत करण्यास प्रवृत्त करा. या कादंबरीचा केवळ हाच एक उद्देश आहे.

या कादंबरीचे विचारप्रवर्तक व मार्गदर्शन नांव ऐकूण ही कादंबरी नीरस व केवळ प्रचारक स्वरुपाची असेल असा अंदाज केला जाईल. मात्र कादंबरी वाचून झाल्यानंतर तर्क चुकीचा ठरेल.

लेखकाने ही कादंबरी लिहिल्यानंतर मासिक नियतकालिक ''हिजाब'' मध्ये क्रमश: प्रकाशित करणे सुरु केले. प्रकाशनास सुरुवात होताच त्यातील चरित्र चित्रण व भाषेच्या गोडव्याने प्रभावित होऊन लोकांनी कौतुकाचा वर्षाव केला. नंतर लोकांनी कादंबरीला पुस्तक स्वरुपात प्रकाशित करण्याचा आग्रह धरला. तामिळनाडूतील एक सद्गृहस्थाचे कादंबरीचे तामिळ भाषेत अनुवाद करून प्रकाशित केले आहे.

कादंबरीकार स्वत: इतक्या घाईत नव्हते. त्यांची इच्छा होती की कादंबरी 'हिजाब' या मासिक पत्रिकेतच क्रमश: प्रकाशित व्हावी व लोकांच्या प्रतिक्रिया प्राप्त होत राहाव्यात. नंतर लोकांच्या प्रतिक्रिया व मतानुसार त्यात बदल व वाढ करून ती पुस्तक स्वरुपात प्रकाशित केली जावी. त्यानुसार कादंबरी चे क्रमश: प्रकाशन होत राहिले. लेखकास प्रोत्साहन व सूचना मिळत राहिल्या. सारांश या कादंबरीला लेखकानेच नव्हे तर विचारवंत वाचकांनी पूर्णत्वाला नेण्याची कामगिरी बजावली आहे.

अशा प्रकारे ही वैचारिक व मार्गदर्शक कादंबरी विविध वळणे घेत आता पुस्तक स्वरुपात आपल्या पर्यंत पोहचत आहे. यातील चरित्र चित्रण कसे झाले आहे. भाषा कशी आहे, कादंबरी नीरस व संथ आहे की रसरशीत व आनंददायी आहे या सर्व प्रश्नांची उत्तर एकाच ओळीत देता येईल.

"कस्तुरीचे कौतुक अत्ताराने करण्या पेक्षा तिच्या सुगंधाने तिचा परिचय करुन द्यायला हवे."

परमेश्वर लेखकाच्या प्रयत्नाना सुयश प्रदान करो. (आमीन)

प्रकाशक

"वाचवा,
स्वत:ला,
स्वत:च्या कुटूंबियांना,
नरकाग्नि पासून"
(कूवा अन्फुसाकुम व अहलीकुम नारन)

- अल्कुरआन

पाषाण हृदय

दारात उभा राहून लहानगा रूशाद शेळ्यांकडे बघत होता. दोन-तीन-चार-पांच तो शेळ्यांची गणना करीत होता. अचानक एका शेळीचा मेंमें च्या आवाजाने त्याचे लक्ष आकर्षित झाले. काळ्या पांढऱ्या मिश्र रंगाची छोटीशी शेळी त्याला खूपच गोंडस वाटली. तिचे स्तन दुधाने फुगले होते. थोडा वेळ त्याने विचार केला. गर्रकन फिरला व धावत धावत आई जवळ गेला.

"अग आई, ती काळ्या पांढऱ्या रंगाची छोटीशी शेळी आहेना, तिचे एवढे एवढे स्तन आहेत! भोळ्या भाबड्या बालकाने आपल्या हाताच्या इशाऱ्याने आईला समजून सांगण्याचा प्रयत्न केला. आई त्याच्या धाकट्या बहिणीसाठी दूध गरम करीत होती. तिने मुलाचे गोंडस चेहऱ्याकडे पाहिले व कौतुक करीत म्हटले "एवढे एवढे स्तन आहेत तिचे?"

"होय ग आई, खूप दूध असेल त्यात!"

"मग?"

"खरं सांगू, मला ना बाबांची भीती वाटते नाही तर" तो बोलता बोलता थांबला. दरवाज्याकडे पाहू लागला. त्याला वाटले वडील आले आहेत व त्याचे बोलणे ऐकूण त्याला समज देत आहेत "रूशाद बाबा, असं बोलू नये !!"

आईने हसत हसत म्हटले "बाबाची भीती नसती तर...?"

"तर मी शेळी धरली असती व दार बंद करून घेतले असते. आई तुझ्या छातीत दूध कुठे आहे?"

"रूशादबाबा, तू वडिलांना इतका भितो, तुला अल्लाहची भीती नाही वाटत?"

"वाटते ना, खूप भितो मी अल्लाहला!"

"मग वडिलांची भिती कशाला?"

"हे बघ आई, अल्लाह तर जगाच्या अंतानंतर शिक्षा देईल. बाबा तर लगेच मारायला सुरवात करतील."

आईला हसूं आले एवढ्यात कोणी तरी दार ठोटावले "बाबा आले" आई लेकांनी एकत्र उच्चारले. आईने पदर डोक्यावर घेतला. लहानगा रूशाद धावत धावत दाराकडे गेला.

"अस्सलाम अलैकुम, अब्बू"

"वालैकुम अस्सलाम, बेटा. बरा आहेस ना, हे घे तुझ्या करिता केळी आणलीत." वडिलांनी मुलाला केळी दिलीत. रशीदने केळी घेतली व आई जवळ गेला.

आईने सांगितले बेटा, एक केळ तू घे व बाकीचे घरांत ठेवून दे. अन हे बघ, सालटे अंगणात फेकू नकोस, सालट्या वर पाय पडल्यास पाय निसटून पडशील!"

नंतर ती आपल्या नवऱ्याला उद्देशून म्हटली,

"काहो, आज इतका उशीर कां?

"अरे, मी आलोय व लगेच परत जायचे आहे. भूक लागली म्हणून थोड्या वेळे करिता

आलोय. तुरुंग तर कैद्यांसाठी आहे मात्र आमच्या करीता तर कटकट असते."

"आज काही घडलेय का?"

"काही ना काही घडतच असते."

"आज काय झाले?"

"मी तुला झेंडासिंग नावाच्या कैद्याबद्दल बोलल्लो होतोना?"

"हो, जो रूशादचे फार लाड करतो."

"हो तोच, आज तो हडताल वर आहे"

"कसली हडताल, कशासाठी हडताल केली त्यांने, तो तर फार शांत कैदी आहे"

"हो ते खरे आहे, पण काय करावे, विचित्र जमाना आला आहे. एखाद्याला जरा अधिकार मिळताच तो गुर्मी दाखवू लागतो. मनाला येईल तसा वागू लागतो, वाटेल तसे हुकूम देऊ लागतो. थोडे दिवस तर हाताखालचे लोक सहन करून घेतात. पण रोज रोजची कटकट कोण सहन करणार?

'हे सर्व तुम्ही कोणा बद्दल बोलताय?

"नवीन तुरंगाधिकारी आलेत ना, त्यांच्या बाबतीत बोलतोय. आल्या आल्यांच दादागिरी करू लागलाय. फरमान काढलंय की ते गस्तीवर असतांना सर्वांनी उभे राहावे. दोन चार दिवस कैद्यांने त्यांच्या आज्ञेचे पालन केले. मग विचार करु लागले. हा नवा नियम कशासाठी? त्याच्या काही लक्षात आले नाही. पण आज काय झाले कुणास ठाऊक. तुरुंगाधिकारी गस्त घेत असतांना एकपण कैदी उभा राहिला नाही. जेलर साहेबांना ही अवज्ञा आवडली नाही. दरडाऊ लागले. झेंडासिंगाने जोरात म्हटले "तानाशाही" कैद्याने उत्तर दिले "नहीं चलेगी."

मी आराडा ओरड ऐकताच धावत गेलो. जेलर रागारागाने ऑफीस कडे जात होते. मी कैद्याना समजाऊन सांगितले. त्या नंतर घोषणा बंद झाली. पण झेंडासिंग याने उपोषण सुरु केलंय. तो म्हणतो की हा शासकीय आदेश नाही की जेलर गस्त वर असतांना कैद्यानी त्याच्या सन्मानासाठी अदबीत उभे राहावे. झेंडासिंगाचे म्हणणे बरोबर आहे. हे काय जो येतो तो आपलाच हुकूम चालवितो. जेलरसाहेबाने आमच्याशी सल्ला मसलमत न करता स्वत:च हुकूम काढला आहे. ते तर बरे झाले की आदेश तोंडी दिलाय, लेखी दिला असता तर कचाट्यात सापडले असते. आदेश ऐकूण मला वाटले की जेलर काहीतरी नवीन सूचना देतील. कैद्यांना वाटले जेलर साहेब त्यांच्या मागण्या मान्य करतील व त्या बाबत काही बोलतील. पण येथे तर सर्वच उलटे चालले. झेंडासिंगला आभास झालाय. मी तुला सांगितले होते की त्याच्या शरीरात राजपूतांच रक्त सळसळतंय. तो डाकू नाही. स्वातंत्र्यापूर्वी तो धनवान नागरिक होता. सरकारने संस्थाने विलीन केली म्हणून तो डाकू (दरोडेखोर) झाला. तरीपण जर त्याला शांतपणे समजाऊन सांगितले तर जीव द्यायला तयार होईल व त्याचे मन दुखावले गेले तर तो जीव देईल पण ऐकणार नाही. त्याने सांगून टाकले आहे. "हा तुरुंगा बाबतचा शासकीय आदेश नाही, मला तो मान्य नाही." सर्व कैदी

त्याच्याशी सहमत आहेत त्यांने जात्याचे पाट उचलून धरले आहे. व म्हणतोय की जो माझ्या जवळ येईल त्याच्या वर आपटून देईन. तुरुंगात खळबळ माजली आहे. आता कुठे जेलर साहेबांचे टाळके ठिकाण्यावर आले आहे. आता घाबरलेत की प्रकरण वर गेले तर जाब द्यावा लागेल. तुला तर माहीत आहे की अशा बिकट प्रसंगी अधिकाऱ्यांना हवलदार राशिद अली खानची आठवण येते. मी दूर उभा राहून समजाऊन सांगितले "आज्ञाचे अवमान करु नकोस" त्याला जाणीव करून दिली की अवज्ञा केल्यास महिना पंधरा दिवसाची शिक्षा वाढविली जाईल. पण त्याचा रागाचा पारा खाली आला नाही.

इतक्यात दारावरील शिपायाने साखळी वाजवली व ओरडून सांगू लागला. साहेब, साहेब, अनर्थ झालाय !"

"हत तिच्या, आलो होतो दोन घास जेवायला. पण त्या झेंडासिंग ने काहीतरी धमाल केली असणार."

"केदारी काय झालेर बाबा?"

"अहो तुमचा रूशाद कैदी नं.८ जवळ जाऊन बसलाय व तो तर काही केल्या आटोक्यात यायला तयार नाही.

"हे खुदा, हा बिनडोक तिथे कसा पोहचला" हवलदार राशिद अली खान धावतच निघाले.

"अरे, तो आता तर येथेच होता "आई ओरडली 'हे अलाह" असे म्हणत रशीदची आई धपकन खाली कोसळली.

हवालदार राशिद अली खान घाईघाईने तुरुंगात पोहचले. तुरुंगातील सारे कर्मचारी व कैदी भयभीत होऊन तमाशा पाहत होते. रशीद कैदी नं. ८ च्या कमरेपर्यंत ही उंच नव्हता. तो त्या कैद्याच्या जवळच पंज्यावर उभा होता व कैद्याशी बोलत होता. "अन्नाला नाही म्हणून नये, असे करणे बरं नव्हे. गावयाचे पण नाही. शिव्या तर मुळीच देऊ नये. ईश्वर नाराज होतो. आई म्हणते, ईश्वराने जे दिलयं ते गपचुप खाऊन घ्यावे. अन् हो, खाताना रडायचे नसते. जे मिळले ते ईश्वराची कृपा मानून खाऊन घ्यायचे. ईश्वर प्रसन्न होतो व गोड गोड खायला देतो. हे घ्या केळी खाऊन घ्या. मला डोळे वटारून काय बघताय. मी काय केलंय ? असं बघू नये. आई म्हणते की राग आला की पाणी पिऊन घ्यावे. राग निघून जातो. हे प्रेषित मुहम्मद (स) यांनी म्हटले आहे. लक्षात ठेवा प्रेषित मुहम्मद (स) चे उपदेश मानाल तर स्वर्ग (जन्नत) प्राप्त होईल."

अशा प्रकारे बाल जादूगार मंत्र उच्चारत होता व चाळीस वर्षीय धुष्टपुष्ट झेंडासिंग हळूहळू शांत होत होता. त्याचे डोळे पाणावले जात होते. हळूहळू त्याचे वर उंचावलेले दोन्ही हात खाली येऊ लागले. शेवटी त्यांने जात्याचे पाट एका बाजूला टाकून दिले व लहानग्या जादूगाराला उचलून घेतले. मुलाने आपल्या कोमल हाताने केळी त्याच्या तोंडा जवळ नेले. त्याचे तोंड आपोआप उघडले गेले. दुरून बघणारे चकित झाले. कोवळ्या पाकळीने हिऱ्या सारख्या कणखर हृदयाला पैलू पाडले. सैतान बाटलीत बंद झाला होता.

सत्संग

सत्संग व प्रवचन इत्यादि कार्यक्रमात लहान मुलांना रुचि नसते. ईश्वराने माणसाला ओल्या मातीने तयार केले की सुक्या मातीने त्याच्याशी त्यांना काही घेणे देणे नसते. मुल्ला निबीकडे काही प्रसाद वगैरे वाटला जाणार नाही हे मुलांना माहित होते म्हणून ते त्या महफिलीतून हळूहळू एक एक करून सटकू लागले. सर्व मुले इमारतीच्या एका कोपऱ्यात एकत्र झाली. तिथे लाकडांच्या ढिगाऱ्यात एक उंदिर शिरला होता. मुलांनी त्याला वरून काढण्याचा प्रयत्न केला. तो काही निघाला नाही. एका पोरांने एक चिमटा घेतला. दुसऱ्याने बारीक काडी घेतली व एका मुलाने खुरपी आणली. सर्वांनी नळाच्या बाजूला खणायला सुरुवात केली. उद्देश्य असा की त्यातून पाणी वाहून आंत शिरले की उंदरी बाहेर पडेल. त्यात त्यांना यश मिळाले नाही. शेवटी निराश होऊन पुन्हा महफिलीत जाऊन बसले. बायकांचे कुरआन वाचनांचा कार्यक्रम संपला होता मात्र मुलं एकत्र बसून काहीतरी योजना आंखत होते. कुठल्या तरी विषया वर त्यांच्यात एकमत होत नव्हते त्यांनी मुल्लानीबीला विचारण्याचे ठरविले. स्वत:चे कपडे झटकले, हात तोंड पुसले तरीही ते गचाळ दिसत होते. बायां त्यांना पाहून हसत होत्या. मुलांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले व मुल्लानीबी कडे जाऊ लागले. बायां त्यांच्याकडे गमंतीने पाहत राहिल्या.

"आई, ईश्वराने आम्हाला मातीतून निर्माण केले आहेना?" रज़िया ने विचारले.

"हो ग, मातीतूनच निर्माण केले आहे. मुल्लानीबी म्हटल्या,

"मगतर ईश्वराचे हात चिखलाने माखले असतील ना?" सफ्फोने विचारले, साऱ्या बाया खदखदा हसूं लागल्या. सर्वांना मजा वाटू लागली.

'मग ईश्वराच्या आईने त्यांचे हात धुतले असतील नाही कां?" सईदने सहजपणे विचारले. बायकांनी आपल्या ओढणीचे पदर तोंडावर ठेवून हंसू आवरण्याचे प्रयत्न केले.

गुल्लूबी म्हणाली "अहो हा रशीद म्हणतो की ईश्वराला आईच नाही."

"खरं बोलतोय रशीद" मुल्लानीबीने रशीदची बाजू घेत म्हटले.

"मग ईश्वराचे हात कोणी धुतले असतील? सर्व मुलांच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह दिसत होते. स्त्रियांना मात्र हसूं आवरता येत नव्हते. त्या मुल्लानीबी कडे आतुरतेने प्रश्नाच्या उत्तराची वाट बघत होत्या. मुल्लनीबी ने समजून सांगण्यास सुरुवात केली."

"ईश्वर निराकार आहे, त्याला हात, तोंड, डोके, धड नाही. तो कोणाचाच बाप नाहीं व त्याला ही बाप नाही. त्याला पत्नी नाही, आई नाहीं, बहीण नाहीं, भाऊ नाहीं तो तर केवळ एक तेज आहे. त्याने आपल्या सामर्थ्याने सर्वकाही निर्माण केले आहे."

मुल्लानीबी च्या वर्णनात काही मुलांना मजा वाटत नव्हती. एक एक मुलगा उठून आपल्या

आईजवळ जाऊन बसू लागला. मुल्लानीबी गप्प झाल्या. बायका आपसात गप्पा मारू लागल्या."

"मुल्लानीबी किती छान गोष्टी सांगितल्या. पण मुलांना त्यात रस वाटला नाही. असो असे म्हणत बायका जाऊ लागल्या. मुल्लानीबीने मरियमला थांबवून घेतले. सर्व बायका निघून गेल्या नंतर चहा करायला घेतला. त्यांनी मरियमला झेंडासिंग व रूशाद मध्ये घडलेल्या घटने बद्दल विचारले. मरियमच्या चेहऱ्यावर स्मित उमटले. तिने रूशादला म्हटले, "जा रज़िया बरोबर खळ." नंतर धाकटीला स्तनपान सुरु केले व हकीगत वर्णन करु लागली. मुल्लानीबी लक्षपूर्वक ऐकत होत्या. नंतर त्या म्हणाल्या.

'राशिदभाईने धर्मप्रचाराची चालून आलेली चांगली संधि गमावली.

त्यांना धर्मप्रचाराशी काय घेणे देणे. थोंड फार रजियाच्या वडिलांकडून ऐकूण घेतात. त्यामुळे आता त्यांच्या मनांत ईशभय निर्माण झाले आहे. नाही तर त्यांच्या नोकरीतील माणसे सरळ संभाषण ही करीत नाहीत. ते नमाज अदा करतात यातच मला समाधान वाटते. जे काही मी तुमच्या कडून शिकते त्यांच्या पुढे मांडते. ईश्वरांच्या कृपेने ते ऐकूण घेतात. पण मला सांगा त्या घटनेचा व धर्मप्रचाराचा काय संबंध."

'हि बघ ताई, झेंडासिंगला माहित आहे की हा शासकीय कायदा नाही. उलट असे म्हणता येईल की जेलरच्या मनाला योग्य वाटला तो कायदा त्याने लागू केला व नंतर त्याने तो कायदा स्वत:च रदद करून टाकला. त्याला इस्लामी कायदा समजून सांगण्याची चांगली संधी होती त्याला सांगायला हवे होते की झेंडासिंग, ज्या प्रमाणे अधिकाऱ्यांना सरकार सारखे मनाला येईल तसे कायदे करता येत नाही, त्याच प्रमाणे छोट्या शासनकर्त्यांना सुध्दा मनाला वाटेल तसे कायदे करता येत नाही. माणसाने बरेंच कायदे करून ठेवलेत व स्वत:ला राजा, नवाब, बादशाह म्हणवून घेत आहेत. आमचा खरा बादशहा व कायदे करणारा तर ईश्वर आहे. तोच आमचा मालक व पालनकर्ता आहे. आम्ही सर्व त्याचे गुलाम व त्याची जनता आहोत. गुलामांना आपल्या मालका बरोबरीचे कायदे करण्याचा अधिकार नाही. मालक अस्तित्वात असताना आपले कायदे कसे राबविता येतील.

"मुल्लानीबी तुम्ही लाख मोलाचा बोललात. मी माझ्या यजमानाना आवश्य सांगेन, बघु या काय परिणाम होतंय."

"ऊं...ऊं... आई, बघना रशादने मला मारले "मुल्लानीबी व मरियम चर्चा बंद करुन रजियाकडे पाहू लागलीत. तिच्या पाठीमागे रशाद उभा होता. तो लगेच बोलला, "मग रजू का बोलली की, 'देव करो, मरण येओ" मग तू माझ्यावर पाणी कां शिंपडले."

"मी हात धुवून झटकले, शिंतोडे उडाले असतील" बालक-बालिका आपसात वकीला

सारखा वाद घालत होते. मरियम गप्प राहिली. ती मुल्लानीबीच्या प्रतिक्रियेची वाट बघत होती. मुल्लानीबी दरडावल्या.

"गप्प बसा, मला हे काही ऐकायचे नाही की रशाद ने रजियाला मारलं की नाही व रजियाने रशादला शाप दिला की नाही. मला फक्त एवढे समजते की तुम्ही दोघे भांडलात व ईश्वराला भांडण आवडत नाही. भांडणाऱ्या वर ईश्वर कोपित होतो. तुम्ही दोघांनी आपसात भांडण करून ईश्वराला नाराज केले आहे. चला चालते व्हा. मरियम चल चहा घे."

मुल्लानीबीच्या दटावणीने रजियाचे डोळे पाणावले गेले. रूशादने आईकडे नजरा वळविल्या. आईने त्याच्याकडे दुर्लक्ष केल्याने त्याचा चेहरा कोमजला. थोडा वेळ दोघे गप्प राहिले मग त्यांनी एकमेकाकडे पाहिले व थोडा वेळ एक दुसऱ्याकडे पाहतच राहिले. एकमेकांच्या नजरेत काही इशारे झाले अचानक रूशाद आईच्या कुशीत शिरला व रडक्या सूरात बोलला "आई मी या पुढे रजियाशी कधीच भांडणार नाही."

रजिया पण पुढे आली व भावुक होऊन म्हणाली "काकू मी पण रूशादशी कधी भांडणार नाही. मरियमने दोघांना कुशीत घेतले व मुल्लानीबीला म्हटले की दोघांना माफ करा." मुल्लानीबी म्हणाल्या "तुम्ही दोघेजन माफी मागा व पश्चात्ताप व्यक्त करा. बोला 'हे ईश्वरा, आता आम्ही भांडणार नाही आमची चूक माफ कर."

कोमल कोमल हात उंचावले, मुल्लानीबी प्रमाणे त्यांनी माफी मागितली.

दोघांना दूध प्यायला मिळाले.

****

बदली

वाअलैकुमस्स्लाम या हवालदार साहेब, सर्वठीकठाक आहे ना?

"ईश्वराची कृपा आहे, मी बरा आहे."

"आपल्या बदलीचे काय झाले?"

"बदली रद्द होईल असे नाहीं वाटत?"

"बदली झाली तर आपणास बराच त्रास होईल."

"त्रास तर होणारच आम्हा सखल भागांत राहणाऱ्यांना त्या भागांत राहणे जरा त्रासदायकच असते. मी एकटा असतो तर काही वाटले नसते. मुलांचा प्रश्न आहे. तेथे सहपरिवार राहण्याची योग्य व्यवस्था नाही. मी शिपाई मला सतत फिरती वर जावे लागते. येथेच सोडून गेलोतर रूशादचे हाल होतील त्याची देखरेख कोण करील? तो आता बाहेर फिरू लागलाय. आई त्याच्या मागे मागे कुठे फिरू शकेल. तुमचे म्हणणे बरोबर आहे. या वयात वडीलांच्या देखरेखीने मुलांचे पालनपोषण योग्यरित्या होते. या वर्षी त्याला शाळेत दाखल करावयाचे आहे. खरं म्हणजे मला सर्वात जास्त रूशादची चिंता वाटते. बाकी सर्व सांभाळून घेता येईल. संपूर्ण परिस्थिति नजरे समोर आहे. या वातावरणात मुलं सहज बिघडतात. चारित्र्यवान होणे फार कठीण काम आहे. मुलांना जशी सोबत मिळते तसेच ते वागू लागतात."

"ठहरी गढवालला आपली बदली म्हणजे शिक्षाच होय"

"अहो जमीर साहेब, ही शिक्षा जाणून बुजून देण्यांत आली आहे."

"तुम्ही काय चूक केली हो?"

"झेंडासिंग माझ्याशी अदबीने वागतो, ही आहे माझी चूक"

"त्याचे तुमच्याशी सलगीने वागण्यामुळे जेलर साहेबांचा फायदाच ठरेल."

"ते सुरवातीला झाले. आता सर्वचे सर्व कैदी जेलरच्या विरुद्ध हडताल करणार आहेत. त्यांचे म्हणणे आहे की जी बाब कायदेशीर नाही ती आमच्यावर कां लादली जात आहे?"

"म्हणजे तेच ना की जेलर येतांच सर्व कैद्यानीं रांगेत उभे राहायला हवे?"

"होय, या बाबतीत झेंडासिंगची जेलरशी बाचाबाची झाली आहे. बरं झालयं की रूशादच्या बालपणाच्या गोष्टींमुळे अनिष्ट टळले गेले."

"मात्र आतून लाव्हा सळसळतोय. जेलरला माझ्या बद्दल संशय वाटतोय की मीच झेंडासिंगला चिथावणी देत आहे."

"तुरुंगअधिकारी तुमचे उपकार मानायचे सोडून अपकार करतोय."

"सुरवातीला तर तो रूशादचा लाड करायचा, माझ्यावर ही खुश होता. पण अचानक बिथरला गेला."

"झालं असे की मी एके दिवशी संधी साधून झेंडासिंगला ईश्वरीय आदेशा बाबत माहिती देऊन टाकली. मी म्हटलें "झेंडासिंग, जेलर गस्तीवर निघाल्या नंतर सर्व कैद्याने त्याच्या समोर अदबीने रागेंत उभे राहावे अशी कायद्यात तरतूद नाही. हे तर जेलरच्या डोक्यात निर्माण झालेले फॅड आहे व तू ते मानण्यास तयार नाहींस, तू सर्वश्रेष्ठ शासनकर्त्याचे कायदे न मानता छोट छोट्या शासकांच्या कायद्यांना स्वीकार करीत आहेस. झेंडासिंगाला काही समजले नाही. तेव्हा मी म्हटले ईश्वर सर्वश्रेष्ठ शासक आहे. या जगातील राज्यकर्ते तर नामधारी शासक आहेत. आज एक शासक आहे तो ज्याचे कायदे अमलांत आणील उद्या दूसरा शासक त्याच्या कडून अधिकार हिसकावून घेईल व नवीन कायदे लागू करील. अशा प्रकारे शासक येतील व जातील त्यांनी तयार केलेले कायदे नष्ट होणारे आहेत. आपला खरा स्वामी, खरा मालक व खरा शासक तर तो आहे ज्यांने आम्हास जीवन दिले, जो आपला अन्नदाता आहे, त्यांने आमच्या करिता विविध प्रकारच्या अति उत्तम उपयुक्त वस्तु निर्माण केल्या आहेत. त्याला तुम्ही ईश्वर म्हणा किंवा अल्लाह वा इतर कोणत्याही चांगल्या नावाने संबोधा. आम्ही सर्व त्याचे सेवक आहोत. सेवकाने आपल्या मालकाचा आज्ञाधारी व्हायला हवा. हे बघ झेंडासिंग, सूर्य आपल्या मालकाच्या आज्ञेचे पालन करीत आहे. ईश्वराच्या आज्ञेनुसार पाऊस पडतो. वारा त्याच्या आज्ञेनुसार वाहत असतो. खऱ्या मालकाच्या आज्ञेचे कोणीच उल्लंघन करीत नाही. सर्वच प्राणी, पक्षी व आम्ही तुम्ही त्याच्याच कायद्यानुसार जन्म घेतो व मृत्यु पावतो. मग आम्ही त्याच्या कडून मिळालेल्या क्षुल्लक अधिकाराचा त्याच्या मर्जीनुरूप उपयोग का करू नये? आम्ही केवळ नामधारी सर्वश्रेष्ठ प्राणी नाहीत.

ज़मीरसाहब, हे ऐकूण झेंडासिंग चकित झाला. जणु त्याच्या समोर मोठ्या रहस्याचा उलगडा झाला असावा. थोडावेळ तो गंभीरपणे विचार करीत राहिला. वेळे अभावी मी तिथून निघून आलो. त्या नंतर त्याने बऱ्याच वेळा विचारले "हवालदार साहेब, ईश्वरीय कायदा आहे तरी कुठे? मी प्रत्येक वेळी त्याला उत्तर देतो. 'प्रयत्ना अंति परमेश्वर'.

त्या दिवसापासून झेंडासिंग माझा मित्र झाला. कुणास ठाऊक कशी ही बातमी जेलर पर्यंत पोहचली. त्याला गैरसमज झालाय की मी आंतल्या आंत बंड पसरवीत आहे. म्हणूनच की काय माझ्यावरच आकाश कोसळले. खरं सांगायचे म्हणजे मी स्वत: नोकरीच्या बंधनांनी त्रस्त झालो आहे. राजीनामा देऊन टाकावासा वाटतो. तुम्हाला काय वाटते?"

राजीनामा देणे इतकी सोपी बाब नाही. जगण्यासाठी उदरनिर्वाह तर करायलाच हवा. त्या बाबत काही व्यवस्था केली आहे काय?

''नाही, मी या बाबत कोणतीच योजना आखलेली नाही. मात्र माझी श्रध्दा आहे की ईश्वर अन्नदाता आहे. कोणत्या न कोणत्या मार्गाने तो पोटापुरता देईलच.''

''याचा अर्थ असा की तुम्हाला वाटते की भोजनाचे ताट आपोमाप तुमच्या समोर येईल. ईश्वर अन्नदाता आहे यांत तिळमात्र शंका नाही पण तुम्ही समजता तसा त्याचा अर्थ नाही. ईश्वराने अन्न जमीनीवर पसरवून दिले आहे. माणसाला सक्षम केले आहे, बुध्दि व समज दिली आहे. हे ही खरे आहे की आपले अन्न आपल्याला आकर्षित करीत असते, ओढत असते. पण लक्षात असू द्या आम्ही माणसे आहोत. आमचे कर्तव्य आहे की आम्हीही अन्नाचा रोजी रोजगाराचा शोध घ्यायला हवा. आम्हाला काम करावे लागेल, हात पाय घासावे लागतील तरच अन्न प्राप्त होईल. आले का लक्षांत, माफ कर, भीक मागायचा विचार तर नाहींना? निश्चितच नाही, सारांश, योग्य असा उदरनिर्वाहाचा मार्ग शोधायचा आहे, मात्र आता लगेच काही सुचत नाही.''

''मग काय करूं''

''सद्या मुलाबाळांना गांवी पाठवून द्या व स्वत: टेढीगढवाल येथे कामावर रुजू व्हा.''

गांवी म्हणजे माझ्या भावाच्या घरी? नकोरे बाबा. त्यांच्याकडचे वातावरण भलतंच बिघडलेले आहे. दीड वर्षापूर्वी तुम्ही मला कोणत्या स्थितीत पाहिले होते. आठवते कां? ईश्वर कृपेने मला तुमचं शेजार लाभलं. माझ्या पत्नीला आपल्या घरच्यांची जवळीक लाभली. मी मुस्लिम असण्याची मला जाणीव झाली. गतकालीन जीवन आठवले की अंगावर शहारे येतात.''

''मगतर गंभीरपणे विचार करावा लागेल. ईश्वराचे स्मरण करून हात पसरून याचना करायला हवी. त्याच्यावर श्रध्दा ठेवून परिस्थितीचा सामना करायला हवा. जे काही घडेल त्याच्या मर्जीनुसारच घडेल व त्यातच आपलं भलं होईल. सद्या तरी काही उमजत नाही.''

दोन्ही मित्रांमध्ये वार्तालाप होत होता इतक्यात एक सायकलस्वार मुलगा आला. रडक्या स्वरात बोलला ''काकाना देवाज्ञा झाली. प्रेतयात्रा नऊ वाजता निघेल. त्याच्या डोळ्यातून अश्रुवाहत होते. तसाच डोळे पुसत तो सायकलवर स्वार होऊन निघून गेला.

''ईश्वराकडून आला व ईश्वराकडे परतला, काही क्षण स्तब्ध राहिल्या नंतर ज़मीर साहेब बोलू लागले. दिवंगत गुणवान व्यक्ति होती. ईश्वर त्यांच्या वर कृपांचा वर्षाव करो व नातेवाईकांना दु:ख सहन करण्याचे सामर्थ्य देवो.''

''ईश्वर मान्य करो ! हे कोण सद्गृहस्थ होते?''

''हे माझे मित्र जमील अहमद साहेब यांचे बंधु तुफैल अहमद होते. नगरपालिकेत लिपिक होते. ईश्वर त्याना क्षमादान करो. चाळीस वर्ष वय असेल. सद्गृहस्थाने कधी एक पैसा लाच घेतली नाही. गरीबीत जीवन कंठत राहिला.''

''त्यांच्या मागे आता कोण आहे?

''विधवा, एक दहा अकरा वर्षाचा मुलगा व दोन मुली आहेत. एक असेल ८ वर्षाची दुसरी ५ वर्षाची. एका मुलीचा अगोदरच मृत्यु झाला आहे.''

आता त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न कसा सुटेल? ''त्यांच्या उदरनिर्वाहाचे काय?''

''काही नाही, जमील साहेब कुणा पुढे हात पसरणार नाहीत. ते स्वत: कमवतील. मुलं लहान आहेत. ती काही करू शकत नाहीत. शिकण्याचे वय आहे. बघु या, ईश्वर काय करतो ते.''

''अरेरे ! कठीण समस्या आहे. तीन चार मुलांबाळांसह या विधवेशी कोण विवाह करील?''

''हल्लीतर सुंदर श्रीमंत कुमारिकांना वर मिळत नाही. तुम्ही तर तुफैल साहेबाच्या विधवेचा विचार करताय.''

''मी विचार करीत होतो की त्यांच्या पोटापाण्यांचा प्रश्न कसा सुटेल? हो मला मान्य आहे की ईश्वर अन्नदाता आहे.''

''काही असे जिवंत राहतील तो पर्यंत जेवायला मिळेलच. कसं मिळेल हे मी सांगू शकत नाही. मला माहित झालंय की पति निधन पावला आहे. अन्न देणारा सर्वशक्तिमान आहे तोच मार्ग दाखवील.''

''जमीर साहेब, तुम्ही जे सांगताय तुफैलच्या विधवेकरिता तर ठीक आहे. पण मी जेंव्हा हीच बाब तुमच्या पुढे मांडली तेव्हा तुमचा तर्क वेगळाच होता. हा विरोधामास माझ्या लक्षात नाही आला?''

''म्हणजे, तुम्ही एका महिले सारखे जगू इच्छिता? अहो तुम्ही पुरुष आहात. पुरुषाला महिलांचा आधार म्हणून ईश्वराने जन्म दिला आहे. पुरुषांनी स्त्रियांना आधार द्यायला हवा. त्यांचा सांभाळ करायला हवा. त्यांच्या अब्रूचे रक्षण करायला हवे व त्यांच्या बरोबर अशा प्रकारे जीवन व्यतीत करायला हवे की जेणे असा समाज निर्माण होईल ज्यांत ईश्वरांचे दर्शन घडून येईल. तुम्हाला बोध होत नाही, मी म्हणेन की विनाकारण प्राप्त असलेली नोकरी सोडू नये. चला बस झाल्या गप्पा, जमील साहेबांकडे जायला हवे. गप्पा नंतर होत राहतील.''

****

चारित्र्य घडण

"आईग, भूक लागलीय,"

"स्वंयपाक करतेयना."

"मला काही तरी खायला दे"

"पैसे दिले होतेना? मध्यांतरात काही खाल्लं नाही का?

"नाहीं ग आई"

"कां नाही घेतलंस?"

"आई"

"पैसे हरवलेत कां?"

"नाही ग आई"

"कोणी हिसकाऊन घेतले?"

"नाही ग आई, कोणी हिसकाऊन घेतले नाही. एक"

"एक काय .... सांगत कां नाहीस?"

"एक मुलगा जरा काळासा तो तिकडे राहतो. त्या मशिदी जवळ, कडुलिंबाच्या झाडाला लागून."

"मला काय माहित झाडाजवळ कोणता मुलगा राहतो. त्या काळ्या पोराने तुझे पैसे चोरले की काय?"

"नाही, नाही, तो चोर नाही, माझ्या बरोबर शिकतोय"

"हो, पण सरळ सरळ सांग पैसे कुठे गेलेत, तुझ्याकडेच आहेत कां?"

"नाही ग आई, माझं ऐकून तर घे"

"हं सांग"

"सांगतोय ना, ऐक, तो कलवा रडत होता."

"कां कोणी मारलं होत त्याला?"

"नाहीं ग आई, तो उपाशी होता. भूक लागली होती त्याला"

"मग?"

"मी त्याला पैसे देऊन टाकले"

"हे ईश्वरा, म्हणून माझा लाडका आज भुकेला आहे." मरियमने मुलाला उराशी

आवळून धरले. तिचे डोळे भरून आले. तिने लगेच तवा चुली वर ठेवला, चपाती शेकल्या, मुलाशी गप्पा ही चालू ठेवल्या."

"बेटा, आज काय शिकवले शाळेंत"

"आई, आजचा पाठ फार छान होता"

"कोणता पाठ?"

"ऐकतेस, बोलू?"

"बोल, ऐकते"

"अ ने ओळख अल्लाहला,

ब ने कर बिस्मिल्लाह"

"अरे वाह, रूशाद बेटा, चांगला धडा शिकून आलास. बरं बेटा, सांग बरे, बिस्मिल्लाह कसे वाचतात?

"ते तर मला माहित आहे. आता तुम्ही जेव्हा भोजन कराल ना तेंव्हा मी म्हणेण "बिस्मिल्लाह हिर्रहमाँ निर्रहीम" "अल्लाह,असीम दयावंत व कृपावंतच्या नावाने" त्यानंतर मी जेवण करीन. आई गुरुजी म्हणत होते की बिस्मिल्लाह म्हटल्याने बरकत (वाढ) होते.

"बरकत म्हणजे काय"

"आई मला नाही माहीत"

"मग तू गुरुवर्यांना का विचारले नाही?"

"हे तर विचारायचे राहून गेले."

"बरंय तर मी सांगते बिस्मिल्लाह म्हटल्याने जेवण चविष्ट होते, अल्लाह अधिक देतो. बिस्मिल्लाह म्हणून धडा वाचला की लवकर पाठ होतो. कोणते ही काम बिस्मिल्लाह उच्चारून केल्यास ते योग्यरित्या पूर्ण हेतो व कामांत ही मन लागते. सर्वात महत्वाची बाब म्हणजे अल्लाह खुश होतो. आलं लक्षात."

"होय"

आईलेकात गप्पा होत असतानाच स्वयंपाक तयार झाला. मरियमने रूशादला जेवण वाढण्याची तयारी केली. तिने चटई पसरली इतक्यात मगरिब (सायंकाळ) ची अज़ान (बांग) ऐकू आली. तिने म्हटले "आता नमाज पढून घे. नंतर जेव."

"ठीक आहे आई."

मगरिबची नमाज झाल्यावर आईलेक सोबतच जेवायला बसले. रूशादने घास तोंडात

टाकला नंतर बोलू लागला.

"आई, वडीला करिता तेथे स्वयंपाक कोण करीत असेल?"

"बेटा, जेवताना इकड तिकडचा विचार करु नये."

"व आई जेवतांना रडू ही नव्हे."

"होरे बाळा"

"मग तू तर"

"बेटा, मी कुठे रडतेय, सहज डोळ्यांत अश्रु आलेत."

"आई एक गोष्ट विचारू कां?"

"काय"

"तिथे हॉटेल आहेत कां ग?"

"कुठे"

"अग काय ते टेढी असं नांव आहे जिथे बाबा गेलेत."

"अस्सं व्हय, तुला बाबांची आठवण येत आहे. होय बाळा टेढी गढवाल येथे हॉटेल आहेत."

"मग बाबा हॉटेलात जेवत असतील, नाही काय? "रूशाद, तुला आताच बजावले होते ना की, इकड तिकडचे विचार करु नये म्हणून"

"आई, बाबांची आठवण येते ग!"

"अरे लेका, मला पण खूप आठवण येते, पण काय करु?"

"बाबा नाहीत ना म्हणून जेवणात ही चव वाटत नाही."

"नकोरे बोलूस जास्त मला रडवशील तू"

"मी तर सहज बोलतोय... तू तर लगेच रडू लागतेस"

"बरं बाबा नाही बोलत, तू पण गुपचुप जेऊन घे."

"चिमुकला रूशाद विचार करू लागला. वडिलांची आठवण करताच आई का रडू लागते. त्याला उमजत नव्हते. त्याने हा प्रश्न मुल्लांनीबीला विचारायचे ठरवले."

जेवता जेवता रूशादने वडिलांची आठवण करून दिली. मरियमला पतिचा वियोग जाणवू लागला. तिने विसरण्याचा प्रयत्न केला पण काही केल्या पतिचा विचार मनांतून जात नव्हता.

मरियमच्या मनात विचार येत होते. ते जेवले असतील की उपाशी पोटीच झोपले असतील. की नुसता चहा पिऊन रात्रभर जागरण करीत असतील. हॉटेलात वेळेवर जेवण मिळत असेल की नाही. पूरी कचोरी मिळत असेल. ती तर त्यांना आवडत नाही.

अशा प्रकारे मरियमला पतिच्या राहण्याची नोकरीची, कपड्यांची, युनिफार्मची, अशा सर्व बारीक सारीक गोष्टींची आठवण येत राहिली. तिची खात्री झाली की त्या डोंगराळ भागात त्यांना खूप त्रास होत असेल. तिने कसे बसे जेवण उरकले. मुलाला जवळ घेऊन बसून राहिली. जेव्हा तिला सुचेनासे झाले. तेंव्हा रूशादला सोबत घेऊन मुल्लानीबी कडे जायला निघाली. मुल्लानीबीच्या सहवासात तिला सांत्वन मिळत असे. रूशाद चिमुकल्या रजिया बरोबर खेळू लागला. ज़मीर साहेब घरी नाहीत हे तिच्या लक्षात आले. त्यांनी एका व्यक्ति करवी कळविले होते की ते स्टेशनला जात आहेत. रात्री नऊची गाडी बघून घरी येतील.

''स्टेशनवर कां गेलेत'' मरियमने सहज विचारले.''

''तसं कांही त्यानी कळविले नाही. कदाचित एखादा परिचित येणार असेल.''

''ईश्वरा तो येणारा...''

''सांगा, सांगा, मरियमबी लाजू नका. पदरात तोंड काय लपविताय. मी पण मनोमन प्रार्थना करते की येणारी व्यक्ति तुमचा पति हवालदार असावा.''

****

नोकरीतून कमी होणे

''काय हवालदार साहेब तुम्ही लेखी उत्तर पाठवून दिलेय की नाही?

''ते तर मी पाठवून देईन पण मला सांगा की आता माझ्या कुटूंबियांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न कसा सुटेल. समजा मला नोकरीवरून बडतर्फच करण्यांत आले तर?''

''खाण्या पिण्याचा प्रश्न तर सुटलाच आहे''

''तो कसा?''

''माझ्या म्हणण्यांचा आशय असा की ईश्वर अन्नदाता आहे. त्याने जन्म दिला आहे तोच खायला देईल वा तुम्ही अन्नापर्यंत स्वत: पोहचाल. ईश्वराने या बाबत आश्वस्त केले आहे. ही बाब निश्चित झाली आहे म्हणून त्याबाबत चिंता बाळगण्याचे कारण नाही. उलट आपल्यावर ईश्वराने टाकलेल्या जबाबदारी बाबत आपण चिंता बाळगायला हवी.

''ती कोणती?''

''ती अशी की, मनुष्य आपल्या श्रध्दे व सत्कर्मानि मरणोपरांत ईश्वराच्या कृपेस पात्र होईल. जो दुष्कर्मी व अश्रद्धाळू असेल तर ईश्वर त्याच्याकडे लक्ष देणार नाही. आश्चर्याची बाब आहे की मनुष्य या बाबत मुळीच चिंतित नाही. त्याला स्वर्ग व नरकाच्या अस्तित्वावरच विश्वास नसावा. जगण्यासाठी निश्चितपणे अन्न प्राप्त होईल याचीही त्याला खात्री वाटत नाही. म्हणून माणूस उदरनिर्वाहासाठी इतकी धडपड करतोय. जणू त्याचा कोणी पालनकर्ताच नाही.''

''जमीर साहेब, पोटापाण्याच्या समस्ये बाबत आपण वेळोवेळी व्यक्त केलेल्या विचारांत विरोधाभास दिसून येतो. त्यामुळे मी एका विशिष्ट विचारावर स्थिर राहू शकलो नाही. परिणामत: ज्या ज्या वेळी माझ्या रोजी रोटीची समस्या समोर आली त्या त्या वेळी''

''जमीर साहेब मला बोलू द्या. दोन सव्वा दोन वर्षा पूर्वी मी हेच म्हटले होते की आपले अन्नपाणी ईश्वराच्या मर्जीअधीन आहे तोच दाता आहे. तेव्हा आपण काय इतर दिले होते? त्यानंतर ही हा प्रश्न निर्माण झाला. तेव्हा आपण वेगळेच उत्तर दिले होते. आज पुन्हा तेच उत्तर देताय जे मी आपणास सांगितले होते. ही हेराफेरी माझ्या लक्षात येत नाही.''

''मग आता पुन्हा समजून घ्या. हे खरे आहे की ईश्वर अन्नदाता आहे. जे ठरले आहे ते मिळणारच उलट मी असे म्हणेन की अन्न स्वत: खाणाऱ्याच्या शोध घेत असते. जेथे खाणारा असेल तेथे अन्न पोहचेल. मात्र त्याच बरोबर मला सांगायचे की ईश्वर जनावरांप्रमाणेच मनुष्यापर्यंत अन्न पोहचवत नाही. मनुष्याला अन्न मिळविण्यासाठी खटाटोप करावा लागतो. या बाबतीत ईश्वरीय रहस्य निहित आहे. ईश्वराची मानवाकडून अशी अपेक्षा आहे की त्याने निर्माण केलेल्या नैसर्गिक खजिन्यातून हवे ते स्वत: प्राप्त करावे. जनावरांना इतकी क्षमता प्राप्त नाही. म्हणूनच पृथ्वीच्या निर्मिती नंतर आज पर्यंत जनावरांनी जरा सुध्दा प्रगति केलेली नाही. मोठमोठे हत्ती, सॉंप, मासे

इत्यादि हजारो वर्षांपासून जसेच्या तसे आहेत. तुम्ही पाहता की माणसा सारखा दिसणारा व नक्कल करणारा वानर (वन माणूस). आज पर्यंत जसाचा तसा आहे. तुम्ही इतिहासात कुठेच वाचले नसेल की वानर वा वनमाणूस माणसा सारखा बोलू लागला व वानराने माणसाचे रूप धारण केले. शास्त्रज्ञानी अनेक प्रयोग केलेत पण ते माकडाला माणूस बनवू शकले नाही. माकडाला खूप प्रशिक्षित करून त्याच्या डोक्यावर टोपी ठेवा. थोडा वेळ तो टोपी डोक्यावर राहू देईल व नंतर ओरबडून फेकून देईल. तुम्ही जनावराला आपल्या खाद्यात बदल करतांना पाहिले आहे काय? त्यांने आपले शरीरावर वस्त्र धारण केले आहे काय? आपल्या राहण्यासाठी नवीन पध्दतिचे आश्रयस्थान निर्माण केले आहे काय? माणसाने मात्र पृथ्वीवर कितीतरी प्रगति केली आहे. निसर्गाच्या रहस्यांचा उलगडा करत करत माणसाने आकाश पाताळ एक करून सोडले आहे. त्याने आपल्या खाद्यासाठी भूतल व जलशयातून विविध प्रकारचे पदार्थ प्राप्त केले आहेत. हवामानानुसार योग्य असे वस्त्र निर्माण केलेत. त्याने कितीतरी प्रकारच्या घरांची निर्मिति केली आहे. प्रवासासाठी अनेक प्रकारची वाहने तयार केलीत. हवालदार साहब, ईश्वराने मनुष्याला या सर्व कामांसाठी पृथ्वीवर पाठविले आहे. माणसाने जर एवढी प्रगति केली नसती तर तो ईश्वरापुढे उत्तरदायी ठरला असता. त्याच्या क्षमतेचा त्यांने उपयोग केला नाही म्हणून त्याला शिक्षा भोगावी लागली असती. त्यांने त्याच्या योग्यतेचा दुरुपयोग केला. तर तो शिक्षेस पात्र ठरला जाईल. मी तुम्हाला चुकीच्या मार्गावर जाण्यापासून रोखण्याचा प्रयत्न करीत आहे. ईश्वराने जे काही वैध मार्गाचे उत्पन्न दिले आहे. त्याला तुम्ही लाथ मारू नये असा माझा म्हणण्याचा आशय होता. तुम्ही स्वत: कोणत्याच अग्निपरिक्षेला सामोरे जाऊ नका मात्र ईश्वरानेच जर तुमची अग्निपरीक्षा घेण्याचे ठरविले असेल तर माघार न घेता ईश्वरावर श्रद्धा ठेवून बिनधास्त मुकाबला करा. ईश्वरावर श्रद्धा ठेवून प्रार्थना करा की तो तुम्हाला परिस्थितीचा सामना करण्याचे सामर्थ्य प्रदान करो. तुम्हाला कामा वरून तातुरते दूर करण्याबाबत बोलायचे झाल्यास मला तशी अपेक्षा होतीच. झेंडासिंग च्या प्रकरणांत तुम्हाला जेलरने चेतावणी दिली होती. त्याच दिवशी माझ्या मनाला शंका शिवून गेली होती. आता तुम्ही तुमची बडतर्फी निश्चित समजा. तुमची बदली व नोकरी वरून तात्पुरते दूर करण्याचे हेच मूळ कारण आहे व आता बडतर्फी हीच पुढची पायरी ठरणार आहे. आता तुम्हाला उदरनिर्वाहाचा कोणता तरी नवीन मार्ग शोधायला हवा आहे. तो मार्ग कोठे मिळेल मी सांगू शकत नाही मात्र हे नक्की की तो मार्ग तुम्हाला नक्की मिळेल.

तुम्ही ईश्वरावर भरवसा ठेवा. तुमच्या जीवनांत जी क्रांति येतंय त्याच्या मागे ईश्वरीय भूमिका आहे, जे कांही घडेल ते तुमच्या बऱ्या करिता असेल. आजच तुम्हाला त्यातील रहस्य कळणार नाही, म्हणून सबूरीने काम घ्या. गोंधळून जाऊ नका. ईश्वरावरील श्रद्धेने सर्व समस्यांचे निवारण होईल. तो अशा मार्गाने धनसंपत्ती देईल की तुम्ही कल्पना ही करू शकणार नाही. तुम्हाला ईश्वराने बुध्दि दिली आहे तिचा उपयोग करा. ईश्वर मार्ग प्रशस्त करील.

परिवर्तन

"ठाकुर, काही दिवसापासून तुमच्या स्वभावात बदल होत असल्याचे दिसून येत आहे. रांत असता तेव्हा काहीतरी विचारांत मग्न असता. तुम्ही इतकं कमी बोलता जणु तोडांत जीभच ाही. बाहेर गेलात की मग तासन् तास तुमची वाट बघावी लागते. कुणाला ठाऊक कुठे निघून ाता. एखाद्या मोठ्या दरोड्याची योजना तर आखत नाहीं ना? अहो, हे असले कुकर्म किती दिवस करणार आहात. मी तुम्हाला किती वेळा बजावले आहे की पापाची कमाई मला खावीशी ाटत नाही. तुमचं एक पाय नेहमी तुरुंगात असतो. अशी एक ही रात्र जात नाही की पोलीस तुम्हाला हांक देत नाही. नेहमीच पोलिसाची धास्ती लागून असते. तुम्हाला भवितव्याची काहीच चिंता नसते. तुमच्या करिता मी सर्व दु:ख सहन करायला तयार आहे. पण आता तुम्ही आशा बाबत काही विचार करायला हवा. बावीस वर्षाची झालीय. डोंगरा एवढे ओझे आणखी किती दिवस हाता वर हात ठेवून बसणार आहात. आपल्या जमातीत इतक्या वयाच्या मुलींना कोण घरी बसवून ठेवतो. तुमचं हे असे. वर शोधावा तरी कसा? हलीचे दिवस वाईट आहे. केवळ साखरपुड्यात हजारो रुपए खर्च करावे लागतात. लल्लाही अकरावीत शिकतोय. दिवसभर वणवण फिरत असतो. मी त्याचा कुठवर पाठलाग करू? मला तर भीति वाटू लागली आहे. तो ही तुमच्याच वळणावर गेला तर काय करायचे? मी तर साधी गृहिणी काय करु शकते? तुम्ही पण घरांत बसून राहता. अहो वडीलोपार्जित जमीन आपल्या वाट्यात आली आहे. थोंड कष्ट केले तर पोटभर भाकर मिळू शकते. हे असे जीवन वाया घालावण्यात काय अर्थ आहे. पोलीस सारखा पिच्छा करीत असतात. एखाद्या दिवशी त्यांच्या सपाट्यात सापडलांत तर गोळी झाडून ठार करतील नाही तर तुरुंगात डांबून ठेवतील. आशाला मला सांभाळत बसावे लागेल. ईश्वरा, काय करू मी?"

पत्नी बडबड करीत होती व ठाकुर मान खाली घालून तिचे व्याख्यान ऐकत होता. हळूच मान वर करून तिच्याकडे क्षणभर पाही व पुन्हा मान खाली करून बसे. त्याच्या ओठांत कंपन होई. काही बोलावेसे वाटे. पण बोलण्याचे धैर्य होत नसे. अशा प्रकारे गप्प बसलेल्या पुरुषाला पाहून बायकांना अधिकच चीड येते. ती वैतागून बोलली "भल्या माणसा, प्रथम मला ठार कर. मी बघा, पक्का निश्चय केलाय. मला ठार केल्याशिवाय तुम्ही बाहेर जाऊ शकत नाही. आता सांभाळा आपल्या मुलाबाळांना, मी जाते विहीरीत जीव द्यायला !" असे म्हणत तिने आपले डोके आपटायला सुरु केले. ठाकूर बापडा तरीही शांत बसून राहिला. ती उठली व खाटेवर जाऊन आदळली. आपल्या आईबापाच्या नांवाने रडू लागली. आशा भांडी घासत होती. आईला दु:खी पाहून ती तिच्या जवळ येऊन बसली. नकळत तिच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले.

ठाकुर तसाच डोक्याला हात लाऊन बसून राहिला. त्याच्या मनांत विचारांनी थैमान मांडले होते. इतक्यात लल्ला धांवत आला. "बाबा, बाबा, जंगूबहादुर व केदारी आलेत."

"जा त्यांना सांग की मला नाही यायचे"

"त्यांनी कारण विचारले तर ?"

"सांग त्यांना की, मला त्यांचे काम जमणार नाही."

"पण बाबा, ते तर कारण विचारणारच."

"अरे गाढवा जा त्यांना सांग मी त्यांचे काम करायचे सोडून दिले म्हणून."

लल्ला गपचुप बाहेर निघून गेला व आपल्या मित्रमंडळींसोबत खेळात रममाण झाला.

"काम सोडून दिले" हे शब्द ऐकून पत्नी दचकली. तिला तिच्या कानांवर विश्वास बसेना. आशाला विचारले "काय गं बाबा काय म्हणत होते ?"

"आई, तू एकलेस तेच ते बोललेत. बाबा बाहेर अंगणात मान खाली घालून बसलेत व त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहत आहेत. आई गं, तू त्यांना काही वेडेवाकडे बोलत जाऊ नकोस."

"ईश्वरा तुझी कृपा आहे. तू प्रसन्न झालास. पण आता निराश करु नकोस. निराधार करु नकोस. त्यांचा मी कसा विश्वास करु. गुंड येतील, गळ घालतील व हे पुन्हा त्यांच्याबरोबर जायला निघतील."

ती खाटेवरुन उठली. ठाकूर जवळ गेली. काही क्षण त्याच्याकडे पाहत राहिली मग हळूच त्याच्या डोक्यावर हात ठेवून बोलू लागली "हे नाथा, अश्रू कां ढाळताय. मी वैतागून बोलले. तुम्ही मनाला लाऊन घेतले. खरं सांगा की, तुम्ही ह्या गुंडाचा साथ सोडला ना ?" ती खाली बसली."

"हो, मी त्यांची संगत सोडली. त्यांचा धंदा सोडला. आजच नाही तुरुंगातून सुटून आलो त्या दिवसापासून. मी पापाची पोटली तुरुंगातच फेकून आलोय. आणि हे बघ, मला तुझं बोलणे वाईट नाही वाटले. कारण तू बोललीस, मी तसाच होतो ना.

"खरंच ?" मला काय माहीत की तुरुंगातून माझा पति सदाचारी होऊन आलाय. मला माहित असतं तर मी आरती करुन स्वागत केले असते."

"अग, पूजा तर परमेश्वराची कर ज्यांने मला सन्मार्ग दाखविला आहे. बऱ्याच वेळा मी तुला पूर्ण हकीगत सांगण्याचा प्रयत्न केला. पण कसं सांगावं उमजत नव्हतं. आज बहादुर व केदारीना भेटण्यास नकार दिला कारण तू जे कांही बरेवाईट बोललेस त्यामुळे मला प्रेरणा मिळाली. यापुढे मी जरासुद्धा विचलित झालो तर माझा हात धरुन तू मला मागे ओढायला विसरू नकोस."

"अहो हात नाही, पाय धरीन, पण प्रथम तुम्ही मला क्षमा करा. मी वाट्टेल तसे बोलले ना तुम्हाला."

"नाही गं, तू जे कांही बोललीस ते सर्व खरे होते."

"एक विचारु... खरं खरं सांगाल ?"

"विचार विचार संकोच बाळगू नको."

"तुम्ही गुंडाचा साथ सोडला म्हणता. मग तुम्ही तासन्तास कुठे गायब असता ?"

"तुला काय वाटते ? मी कुठे जात असेन ?

"आतापर्यंत तर असे वाटत होते की तुम्ही बहाद्दुर, केदारी, जग्गू, जुद्दी, वल्लर, मंगू खैरु व त्यांच्या गँगच्या लोकांबरोबर जात असाल व लपून छपून कुठेतरी दरोडा टाकण्याची योजना आखत असाल. पण आता तसं नाही वाटत. तुम्ही कुठे तरी वेगळ्या ठिकाणी जात असाल ?"

"होय, मी एका वेगळ्या ठिकाणी जातो."

"ते कुठे"

"आत्ताच नाही सांगू शकत मी. सांगेन कधीतरी."

"ठीक आहे, मी नाही करत हट्ट. पण मला खरं खरं सांगा, यावेळी तुरुंगात फार कष्ट सहन करावे लागलेत कां ? व अत्याचारांना घाबरून तुम्ही, गुंडाचा साथ सोडण्याचा निश्चय केलाय ना ?

"नाहीं, माझ्यावर तुरुंगात सक्ति कोण करु शकतो.

तुरुंगाधिकाऱ्याचा माझ्या नांवाने थर्रकाप होत असे. एक दिवस एका चिमुकला देवदूत आला होता. त्यांने माझी कायापालट करुन टाकली. तिथेच मला एक मित्र भेटला. त्यांनी मला अशा गोष्टी सांगितल्या की मी पार बदलून गेलो. माझा जीवनाबद्दलचा दृष्टिकोन बदलून गेला. परंतु अद्याप जे मी पाहू इच्छितो ते पाहू शकलो नाही., जे प्राप्त करु इच्छितो ते प्राप्त करु शकलो नाही. पण मला विश्वास आहे परमेश्वर मला सरळ मार्ग दाखवील."

"ईश्वर करो नि असेच घडो. तुमच्या मित्राने सांगितलेल्या काही गोष्टी मला ही सांगा की,

"ऐक, एके दिवशी त्यांने मला विचारले की ह्या ब्रह्मांडाचा रचयिता कोण आहे ?" मी उत्तर दिले "ईश्वर" नंतर त्यांने विचारले या विश्वातील सर्व वस्तूंचे निर्माण कोणी केले ? मी पुन्हा म्हटले "ईश्वर" यावर त्यांने प्रश्न केला मग ह्या विश्वात जे कांही आहे. त्याचा मालक कोण ? "मी उत्तरलो "ईश्वर" आशाची आई, मी योग्य उत्तर दिलेत ना ?

"अगदी बरोबर उत्तर दिलीत"

"माझ्याकडून उत्तरे वदवून घेतल्यानंतर मित्र म्हणाला. "याचा अर्थ असा की ईश्वर आपणा सर्वांचा मालक आहे व आपण सर्व त्याचे दास आहोत."

मी म्हटले "अगदी बरोबर" मित्र बोलू लागला "ज्या अर्थी आपण त्याचे गुलाम व दास आहात त्या अर्थी आम्ही त्याच्या आज्ञांचे पालन करायला हवे. मालकाचे आपण आज्ञाधारक राहायला हवे. मालकाला प्रसन्न करणे आपले कर्तव्य आहे. आशाची आई, खरंय ना ?"

"तुमच्या मित्राचे म्हणणे अगदी रास्त आहे."

"नंतर त्यांनी अशी विचित्र गोष्ट सांगितली जिचा माझ्या मनावर खोलवर परिणाम झाला. तो म्हणाला. ईश्वराने प्रत्येक गोष्टीकरिता एक नियम निर्धारित केला आहे व जगातील प्रत्येक वस्तू त्या नियमाधीन आहे. ती वस्तू निर्धारित चाकोरीबाहेर जाऊ शकत नाही. मालकाने निर्धारित केलेल्या कक्षेतच सूर्य भ्रमण करीत असतो. सूर्य आपल्या मार्गावरुन इंचभरही इथे तिथे होत नाही.

चंद्राकरिता ही विशिष्ट मार्ग निश्चित करण्यात आला आहे. जगातील प्रत्येक वस्तू - मग ती दृष्य असो वा अदृष्य, ईश्वराच्या मर्जीनुसार आपले कर्तव्य पार पाडीत आहे. तुम्ही डोळ्याने ऐकण्याचे काम घेऊ शकत नाही. तोंडाने विचार करु शकत नाहीं. कानाने केवळ श्रवण करु शकता. जेवू शकत नाही. निर्माण व नष्ट करण्याचे नियमही त्यांनेच निश्चित केले आहेत. त्यानुसारच प्रत्येक सजीव निर्जीव वस्तू निर्माण होते वा जन्म घेते व मृत्यू पावते वा नष्ट होते. ज्याअर्थी त्यांने प्रत्येक वस्तूकरिता नियम निर्माण केलेत त्याअर्थी मनुष्याकरिता सुध्दा नियम व कानून निर्माण केले असणार. आशाची आई, किती चांगला तर्क आहे नांही कां ?

"मला तर पटतं. तुम्ही काय म्हणालात." "मी काय म्हणणार त्यांना विचारले की कुठे आहेत ते नियम व कायदे ?"

"मग तुमच्या मित्राने काय दाखविले ?"

"तो म्हटला, तुम्ही स्वत:च शोधून काढा".

"मग तुम्ही तुमच्या मालक व स्वामीचा कायदा शोधून काढला का ?

"हे तू कां विचारतेस ?"

"जर ते प्राप्त झाले तर त्यावर अंमल करता येईल याकरिता विचारत होते."

"खेदाची बाब आहे, मला अद्याप यश प्राप्त झाले नाही. पण लवकरच प्राप्त करीन अशी दृढ आशा आहे. माझ्यावर अशीच ईश्वराची कृपा होत राहिली तर मी ते नियम शोधल्याशिवाय राहणार नाही."

"मला ही सांगाल ना"

"निश्चितच्"

"बाबा, मला ही सांगा बरं का !"

"हो रे बाबा, तुलाही नक्की सांगेन."

उदरनिर्वाहाची चिंता

"हि बघा हवालदारसाहेब, एकेका समस्येंवर विचार करा. पहले रूशादबाब्त विचार करा. माझ्या मतानुसार त्याला शाळेत दाखल करुन टाका."

"शाळेत, म्हणजे सरकारी शाळेत दाखल करु ?"

"होय".

"तेथे विद्यार्थी कोणत्या मार्गाला लागतात ते तर आपणांस माहित आहे. हल्ली मुलांनी जो धिंगाणा घातला आहे तो तर तुम्हाला माहित आहेच. त्यांना माणुसकीचा जरा सुद्धा गंध नाही. रूशादला त्या आगीत मी कसा झोकून देईन ?"

"हि बघा, जरा गंभीरपणे विचार करा तुमच्या कायमस्वरुपी उत्पन्नाचा अद्याप बंदोबस्त झालेला नाही. नोकरीवरुन तुम्हाला घरी बसवले आहे. नोकरी धंद्याचा शोध चालू आहे. या परिस्थितीत जर तुम्ही मुलाला एखाद्या अशा शाळेत दाखल करण्याचा सल्ला दिला की, ज्या शाळेत धार्मिक पद्धतीने शिक्षण दिले जात असेल तर तेथील खर्च कुठून आणाल. माझं ऐका मुलाला आपल्या डोळ्यासमोर ठेवा. धार्मिक शिक्षण तर कारीसाहेब देतच आहेत. कुरआनचा प्राथमिक भाग तर त्यांने पूर्ण केलाच आहे. त्यांच्याकडे इस्लामिक संस्कृतीचा पाठ घेता येईल व सरकारी शाळेत ही शिक्षण होत राहील. तुमचं म्हणणं असं आहे की सरकारी शाळेत त्याला वाईट सवयी लागतील व त्याच्या मनावर विपरित परिणाम घडून येतील. यासाठी तुम्हाला रोज एक तास मुलाच्या गृहपाठाकरिता खर्च करावा लागेल. तुम्हाला त्याच्या शिक्षणांत ज्या गोष्टी अप्रिय वाटतील त्या दूर करण्याचे प्रयत्न करीत राहा. केवळ तुमच्या एका तासाच्या मेहनतीने मुलाचे जन्मभराचे कल्याण होईल. मला तुमच्या रूशादच्या बुद्धिमत्तेवर विश्वास आहे. मी स्वत: त्याला व रज़ियाला अर्धा तास शिकवणी देतच असतो.

"अत्यंत चांगला सल्ला आहे. आता मी काय करु ते सांगा."

"मी तुमच्या बाबतीत दोन मार्गांचा सल्ला देऊ इच्छितो. एकाला थोडा वेळ द्यावा लागेल म्हणून त्याचा स्वीकार न करता दुसऱ्या मार्गाची अवलंब करा ज्यांने तुम्हाला त्वरित चार पैसे मिळू लागतील.

"बोला, मला मान्य आहे."

"तुम्हाला वैध मार्गाने उत्पन्न मिळवायचे आहे ना ?"

"म्हणजे काय, थोडं समजावून सांगा."

उदाहरणार्थ, मी सल्ला देईन की पानपट्टीचे दुकान सुरु करा किंवा फळविक्री सुरु करा, किंवा असाच एखादा धंदा सुरु करा तर कराल कां ? तुम्ही आहात खानसाहेब, अशा छोटया

छोटया धंद्याना सन्मानजनक मानत नाही. तुम्हाला तर नोकरी करण्याची सवय पण नोकरी तर गेली समजा. आता घरातच एखादा धंदा सुरु करा.''

''ज़मीर साहेब, तुम्ही लाखाचं बोललात. मला इस्लामीक तत्वांचे जे थोडेफार ज्ञान तुमच्या कडून मिळाले आहे, त्याच्या आधारे सांगतो की मी उद्योगधंद्यास हीन लेखत नाही. स्वत: प्रेषित मुहम्मद (स.) यांनी वैध व्यापार करण्याचे प्रोत्साहन दिले आहे व व्यापारास उत्तम दर्जा दिला आहे. मात्र व्यापार प्रामाणिकपणाने करावा अशी अट घातली आहे. त्यांनी (स.) म्हटले होते एक प्रामाणिक व्यापारी स्वर्गात माझ्या इतक्या जवळ राहील जितके आपल्या हाताची पहली दोन बोटं असतात.''

''छान, तुमचे विचार प्रगल्भ होत चालले‌त. मला आता सांगायला हरकत नाही की मी तुम्हाला सांगणार होतो की तुम्ही सायकलच्या चार चाकांच्या आधारे एक हातगाडी तयार करुन घ्या. त्यावर थोडा कोळसा व इस्त्री ठेवण्याची व्यवस्था करुन घ्या. गांवात हातगाडी घेऊन ''कपडे इस्त्री करुन घ्या'' किंवा ''इस्त्रीवाला'' अशी आरोळी देत फिरा. तुम्हाला लोक ओळखू लागतील. स्त्रियां घरात कपडे धुतात. घरातील मोठया माणसांच्या कपडयांना इस्त्री करुन घेतील. माफक दरात तुम्ही ही सेवा देऊ लागलात तर पहिल्या दिवसापासूनच तुम्हाला पैसे मिळू लागतील. तुमची उपासमार होणार नाही. पुढे ईश्वराची इच्छा.

''आपण असा विचार-----''

''थांबा, अजून माझं म्हणणं पूर्ण झालेले नाही. मी हा उद्योग तुमच्याकरिता विशेष उद्देशाने सुचविला आहे. तुम्ही गल्लीबोळात फिरतांना आणखी एक काम कराल. तुम्हाला आठवत असेल की तुम्ही तुफेल अहमद यांच्या विधवा पत्नीबाबत चिंता व्यक्त केली होती. माझ्या माहितीत अशा अनेक निराधार महिला आहेत ज्यांचा विवाह ही होत नाही व त्यांना आर्थिक मदत ही मिळत नाही.'' माझी इच्छा आहे की इस्त्रीच्या धंद्याबरोबर तुम्ही जातधर्माचा भेदभाव न करता गांवातील विधवांबाबत तपशील गोळा करावा. त्यांचे एक रजिस्टर तयार करा. तपशील गोळा झाल्यानंतर त्यांना शिवणकाम मिळवून देण्याची व्यवस्था करण्यांत यावी. महिलांचे पोषाख शिवण्याचे काम त्यांना आपल्या मार्फत पुरविण्यांत यावे. वर्तमानपत्रात आपल्या योजनेची माहिती जाहिर करुन महिलांचे कपडे माफक दरात शिवून दिले जातील व या योजनेद्वारे विधवांना स्वावलंबी करण्याच्या सत्कार्यास हातभार लावावा असे आवाहन करण्यांत यावे. आम्हाला मुस्लिम व मुस्लिमेतरांकडून भरपूर सहकार्य लाभेल. आम्ही जात धर्म इत्यादिबाबत कोणताही भेदभाव न बाळगता समाजसेवा करु शकू. ईश्वर प्रसन्न होईल व लोकही खुश होतील. बोला तुमचे काय मत आहे.''

''आपली योजना तर छान आहे. पण शिवणयंत्र (मशीन) कुठून येतील ?

"एक मशीन तुमच्या घरात आहे एक माझ्याकडे. तसेच बऱ्याच महिलांकडे मशीन्स आहेत. ज्या गरीब विधवांकडे मशीन नाही त्यांना हप्त्याहप्त्याने रक्कम फेडीच्या वाद्यावर खरेदी करुन दिल्या जाऊ शकतील."

"आपली योजना योग्य आहे. मी तुम्ही सुचविलेला उद्योग सुरु करीन. सुरुवातीला थोडं अवघड वाटेल नंतर सवय झाली की अवघडल्यासारखे वाटणार नाही."

एक काम करा हातगाडीला एक घन्टी लावून घ्या. ती आपोआप वाजत राहील व लोकांना सूचना मिळेल. आपल्याला हाक मारायची गरज भासणार नाही."

"घन्टी तर लावावीच लागेल, नाहीतर ओरडून ओरडून घसा कोरडा होईल.

"हं मग ठरलं तर".

"बिल्कुल ठरलं."

"इस्त्रीचा व्यवसाय कधी सुरु कराल?"

"आजच मी एखाद्या भंगारवाल्याकडून सायकलच्या चाकांची खरेदी करतो. उद्या हातगाडी तयार करुन घेईन. परवा ईश्वराला नमन करून व्यवसाय सुरु करेन. पुढे ईश्वराची इच्छा."

"ईश्वर तुम्हाला मदत करो. तुमच्या मनाची तयारी झालीय. आता कामाला लागा, एक काम करा, उद्याच वर्तमानपत्रात जाहिरात देऊन महिलांना कपडे इस्त्रीकरता तयार ठेवण्याबाबत आवाहन करुन टाका. इस्त्रीचे दर ही जाहिर करुन टाका."

"ठीक आहे, स्त्रियांना निश्चित आनंद होईल."

"ठीक आहे ईश्वर तुम्हाला मदत करो."

"मग घरी जाऊन रूशाद व तिच्या आईला सर्व तपशील सांगून टाकतो."

"अवश्य, दोन्ही योजनांची माहिती द्या. विधवांबाबतच्या योजनेबाबत ऐकून त्या खुश होतील."

"ईश्वराची इच्छा!"

"चला निघू या"

"होय... मी पण निघतो".

"अस्सल्लाम अलैकुम"

"वालैकुम अस्सलाम"

भावाचे आगमन

हवालदार राशिद खान मागील दोन तीन दिवसांपासून बरेच खुश होते. त्यांचे मोठे बंधू मुरशदअली खान त्यांचे लखनऊ येथून पत्र आले होते. ते शुक्रवारी कुटुंबियांसह बरेली येथे पोहचणार आहेत असे कळविले होते. मुरशद अली खान हे राशिद अली खान पेक्षा वीस वर्ष मोठे होते. राशिद अली दहा वर्षांचे असतांना त्यांच्या वडिलांचा मृत्यु झाला होता. मुरशद अली खान यांनी धाकटया भावाचे पालनपोषण केले. त्यांनी भावाला शिक्षण दिले. माध्यमिक शाळेपर्यंत शिक्षण दिल्यानंतर नोकरी मिळवून दिली. एवढेच नव्हे तर त्यांचे लग्नहीकरुन दिले. मोठया भावाच्या प्रेम व आत्मीयतेने ते इतके प्रभावित झाले होते की त्यांच्यासमोर जाताना अत्यंत आदर व सन्मानाने वागत. बऱ्याच दिवसांपासून दोहोंची भेट झाली नव्हती. सहा वर्षांपूर्वी राशिद अली खान आपल्या गांवी गेले होते. एक महिना मोठया भावाच्या सहवासात घालविला होता. त्यानंतर केवळ पत्रव्यवहाराद्वारे त्यांची अर्धवट भेट होत होती. या दीर्घकालात त्यांनी एकमेकाला पाहिले नव्हते. राशिद अली खान त्यांच्या मनातील मोठया भावाबद्दलचे आदर व बंधुभावाने त्यांचे हृदय भेटीसाठी आतुर झाले होते. जवळपासच्या सर्व परिचितांना त्यांची मन:स्थिती पाहून आश्चर्य वाटत होते.

पत्र मिळाल्यानंतर राशिद अली खानने आपला कारभार नोकरांवर सोपवून दिला होता. भाऊ येणार म्हणून घराच्या स्वच्छता व रंगरंगोटीच्या कामात गर्क झाले होते. घराला स्वच्छ व सुंदर केल्याने ते आकर्षक दिसू लागले. घरात दोनच खोल्या होत्या. एक खोली भावाच्या निवासासाठी सजवून ठेवली होती. त्यांना आपल्या भावाबद्दल इतका आदर होता की त्यांच्याकरिता सर्वस्व अर्पण करुन ते धन्य होऊ पाहत होते. घरातले सर्वस्व अर्पण करुन ते धन्य होऊ पाहत होते. घरातले सर्वच जण पाहुण्यांच्या स्वागताची तयारी करीत होते. हवालदारसाहेबाची पत्नी आपल्या जाऊला खुश करण्याकरिता योजना आखत होती. रूशाद आपल्या चुलतभाऊ बहिणीचे मनातल्या मनात चित्र रेखाटत होता. त्याने आपल्या अभ्यासाची खोली नीटनेटकी व स्वच्छ केली. शालेय पुस्तक व वह्या एका बाजूला तर खेळणी दुसऱ्या बाजूला व्यवस्थित लावून ठेवली. आर्ट व क्राफ्टचे नमूने भिंतीवर टांगून ठेवले. त्याला चित्रकलेची खूप आवड होती. त्याने "अल्लाह व मुहम्मद' ला विविध रंगाने सजविले होते व त्यांना आर्ट व क्राफ्टच्या वर जागा दिली होती. त्याने आपल्या टेबलावर आरशाखाली सुंदरसे वेळापत्रक लाऊन ठेवले होते व त्यानुसार तो गृहपाठ, नमाज व इतर कामे करीत असे. एकदा जमीर साहेबाने त्यांच्या वेळापत्रकाचे खूप कौतुक केले होते त्यामुळे वेळापत्रकाचे महत्व त्याच्या मनांत अधिकच वाढले होते. तो त्याची खूप काळजी घेई. तो कोणालाच हात लाऊ देत नसे. त्याने आपल्या काक-भाऊ अर्शद अलीखान याचे नांव नक्षीदार अक्षरात रंगवून फ्रेम करुन घेतले होते व ती फ्रेम आपल्या छोटयाशा टेबलासमोर लाऊन ठेवली

होती. त्याने आपल्या 'अर्शी' भावाला वयाच्या सहाव्या वर्षी पाहिले होते. ही फ्रेम तो आपल्या 'अर्शी' भावाला देणार होता. तो जेव्हा आपल्या बाबांबरोबर लखनऊला गेला होता तेव्हा त्याची काक-बहीण चार वर्षाची होती. नंतर पत्र आले होते. ज्यात लिहिले होते की आणखी एका बाहुली समान बहीण जन्माला आली आहे. रूशाद आपल्या चुलत भावंडाच्या उंचीची कल्पना करीत होता. अर्शी भाई आता इतके मोठे असतील. रश्शो इतकी मोठी झाली असेल. ती तर एकदम गुलाबासारखी गोडस असेल. शेवटचे वाक्य न कळत त्याच्या मुखातून वदले गेले. आई टी सेट काढत होती रशादकडे पाहून विचारले - "कोण गुलाबासारखा असेल, बेटा ?"

आईच्या या प्रश्नाने तो दचकला. आईकडे पाहून हसू लागला. "आई, गुल्लो तर गुलाबासारखी असेल."

"असंय कां, तुला सर्वांची आठवण येतंय का ?" "रश्शो तर शाळेला जात असेल व अर्शीभाई तर..." "हो रे, अर्शी आता मोठा झालाय. जुमआ (शुक्रवार) च्या नमाजनंतर आम्ही स्टेशन वर जाऊ"

"आई, मी पण जाईन स्टेशनवर, काकाना घ्यायला"

"काका ना की अर्शी व रश्शोला ?

आईने रूशादला चिमटा घेतला. रूशादला खदखदल्यासारखा आनंद झाला. आई गालातल्या गालात हसली.

आईने सांगितल्याप्रमाणे त्याने स्टेशनवर जाण्याची तयारी सुरु केली. ईदला शिवलेली शेरवानी घातली. रामपूरची मखमली टोपी डोक्यावर ठेवली. आईच्या हट्टामुळे डोळ्यात सुरमा लावला. आईने मुन्नीला आंघोळ घातली तिला फ्रॉक नेसवले. ज़मीर साहेबाकडील सर्वांना सायंकाळचे जेवणाचे आमंत्रणही देण्यांत आले होते. रजियाच्या आईला ठीक एक वाजता घरी येण्याबाबत सूचना देण्यात आली होती जेणेकरुन घर त्यांच्या स्वाधीन करुन त्यांना स्टेशनला जाता यावे.

हवालदार राशिद अलीने जुमआची नमाज मोहल्ल्यातील मशीदीतच अदा केली. नंतर मुलाबाळांसह टांग्याने स्टेशनला पोहचले. ते स्टेशनावर दोन तास अगोदरच पोहचले. तेथे पोहचल्यानंतर गाडी अर्धा तास उशीरा येण्याचे समजले. अर्धा तास वाट बघायची म्हणजे फार अवघड वाटू लागले. वेळ घालवण्यासाठी हवालदार साहेबांनी एक वर्तमानपत्र खरेदी केले व पाने चाळायला सुरुवात केली. रूशादला एक मित्र भेटला तो त्याच्या सोबत प्लॅटफॉर्मवर भटकायला निघून गेला. रूशादची आई मुन्नीला घेऊन एका बाजूला बसून वाट बघू लागली.

अचानक कोणीतरी ओरडला, "गाडी येतंय" गाडी येण्याचा आवाज आला. इतक्यांत

एका बाईची किंकाळी ऐकू आली. "हाय राम. माझा मुलगा" लोक सैराभैरा धाऊ लागले. हवालदार चटकन उठले.

"बघातर रूशाद कुठे निघून गेलाय" रशादची आईने घाबरुन म्हटले. हवालदार साहेब एका बाजूला धावले. ते दहाबारा यार्ड गेले असतील की गाडी प्लॅटफॉर्मवर येऊन ठेपली. आरडाओरड करण्याऱ्यांची गर्दी बाजूला झाली. हवालदार साहेबांनी जे पाहिले त्यांने ते गांगरुन गेले... भयभीत झाले. रशाद एका लहान मुलीला गाडीच्या रुळाच्या पलिकडे नेत होता. क्षणार्धात गाडी रूशाद व प्लॅटफॉर्मच्या मध्ये येऊन उभी राहिली. हवालदार साहेबांनी पाहिले की एक खेडुत महिला "हे राम हे राम" करीत रडत आहे. एक गांवढळ माणूस तिला आवरण्याचा प्रयत्न करीत आहे. हवालदार साहेबानी गाडीत शिरुन दुसऱ्या बाजूस रशादला गाठण्याचा बराच प्रयत्न केला. परंतु गाडीत एवढी गर्दी होती की डब्यात शिरणे अशक्य होते. त्यांचे सारे प्रयत्न विफल झाले. इतक्यात त्यांची पत्नी मुन्नीला घेऊन त्यांच्याजवळ आली व रूशादबद्दल चिंता व्यक्त करु लागली." माझ्या रूशादला शोधा हो"

"ईश्वराचे स्मरण कर," मी त्याला लगेच घेऊन येतो. दोन तीन मिनिटानंतर गर्दी कमी झाली. राशिदसाहेब एका डब्यात शिरुन दुसऱ्या बाजूला उतरले दुसऱ्या बाजूला रूशाद एका मुलीला धरुन बसला होता. त्याच बाजूला कोणातरी पॅसेजरचे सामान उतरविले जात होते. कोणीतरी लखनवी पोशाखातील वयस्क व्यक्ति रूशादकडे चिकित्सक नजरेने पाहत होते. नंतर एक बुरखाधारी महिला मुलांना घेऊन खाली उतरली. तिने उतरताच वयस्क इसमास म्हटले "बघताय काय, हा तर रूशाद आहे" हवालदार राशिद अलींच्या लक्षांत आले की हा प्रवासी कोण आहे? त्यांना झटकन आपल्या वडील बंधु मुर्शद अली खान यांना आलिंगन दिले. व बुरखाधारी महिलेने रूशादला कवटाळून घेतले. काहीच क्षणात रूशादची आईही तिथे पोहचली व तिच्या पाठोपाठ ती खेळुत बाई ही पोहचली. तिचा पति ही तिच्या बरोबर होता तिचा मुलगा सुरक्षित आहे हे पाहून ती आनंद विभोर झाली व मुलाला उचलून घेतले. रूशादच्या पायाचे चुंबन घेऊन त्याला आशीर्वाद देऊ लागली. "ईश्वर, तुझं कल्याण करो, ईश्वर तुझी रक्षा करो."

राशिद अली खान व मोठे बंधु मुरशद अली खान यांनी एकमेकाची चौकशी करण्या ऐवजी खेडुत महिलेची विचारपूस केली. तिला काय झाले म्हणून विचारले. तिने सांगितले "मी मुलाला पायावर शौचासाठी बसविले होते. अचानक गाडीच्या आवाजाने घाबरून गेले. माझ्या हातून मूल खाली रूळावर जाऊन पडले. गाडी सिग्नल जवळ येऊन धडकली होती. हा चिमुकला देवदूत तिथेच उभा होता. त्यांने लगेच उडी घेतली व मुलाला दुसऱ्या बाजूस घेऊन गेला. ईश्वराने कृपा केली नाही तर दोघे ही...महिला बोलता बोलता थांबली. मुलाला कवटाळून घेतले व रूशादच्या पायाचे चुंबन घेण्याकरिता वाकली.

"बस्स बस्स, आता तू जा" हवालदार साहेबांनी खेडूत महिलेला सांगितले व नंतर आपल्या बंधूकडे वळाले. "आपण या बाजूला कां उतरलांत?"

"पाहिले नाहीं, किती गर्दी होती. सामान या बाजूला ठेवले होते. म्हटले की याच बाजूला उतरावे. उतरताच पाहिले की रूशाद उभा आहे. सहा वर्षानंतर पाहिले म्हणून ओळखू शकलो नाही. पण खरोखर मुलाचे कर्तृत्व वाखाणण्या जोगे आहे. आमच्या करिता अभिमानाची बाब आहे."

"ईश्वराची कृपा आहे, त्यांने मुलीस जीवनदान दिले. दुर्घटना होता होता वाचली. ईश्वराने आम्हाला काहीक्षणतर भयभीत करुन टाकले होते." राशिदसाहब बोलत होते तेवढ्यात गाडी सुटली. पण काही अंतरावर जाऊन पुन्हा थांबली. प्लॅट फॉर्म वर रूशादने केलेल्या धाडसी कृत्याचे परिणाम पाहायला लोक गर्दी करून उभे होते. गाडी पुढे जाताच प्लॅटफार्म वर उभ्या असलेल्या गर्दीने खाली उड्या घेतल्या. सर्वांना सुरक्षित पाहून लोकांनी ईश्वराचे आभार मानले व सर्वांनी रूशादचे एक मुखाने कौतुक केले. काही तरूण मुलांनी रूशादचा फोटो काढला. जोपर्यंत राशिद अली पाहुण्याना घेऊन रवाना झाले नाही तो वर गर्दीतील लोक रूशादचे कौतुक करीत राहिले त्याला आशीर्वाद देत राहिले. सर्वच म्हणत होते. "पोरा ने खरोखर कमाल केली हो!"

****

ताकीद

"राशिद"

"काय दादा"

"तुला भेटून मला खूप आनंद झाला."

"आनंद तर व्हायलाच हवे. तुम्ही मला पिता समान आहात."

"तुला व तुझ्या घरातील लोकांना इस्लाम बद्दल श्रध्दा असल्याचे पाहून आनंद वाटला. रूशाद, ईशकृपेने अत्यंत सुशील व समंजस बालक आहे. त्याला कोणाची दृष्ट न लागो, खरोखर चांगली प्रगति करतोय. तुझे मित्र जमीर साहेब अत्यंत चांगले सद्गृहस्थ आहेत. मात्र मला तुझ्या एका गोष्टी बद्दल हरकत घ्यावीशी वाटते. तू खरोखर मला नाराज केलेस.

"ते कसे काय, दादा"

"हे बघ राशिद, खान बहादुर इरशादुल्लाह खान यांच्या वंशातील कोणास ही खालच्या दर्ज्याचा व्यवसाय करावा अशी अपेक्षा नव्हती. तुझ्या व्यवसायाने त्यांचा आत्मा दुखावला जाईल.

"दादा, मी असा कोणताच अवैध व्यवसाय करत नाही की ज्यांने ईश्वर अप्रसन्न होईल. ईश्वराची कृपा आहे. चार पाच वर्षा पूर्वी बाबतचे मी काही बोलू इच्छित नाही. मात्र आता मी माझी पत्नी, मुलगा व दोन तीन नोकर, जे सर्व माझ्या अधीन आहेत. वैध कमाई ने पोट भरीत आहेत. खान बहादुरांच्या वंशातील कोणत्याच व्यक्तीच्या पोटात एक ही घास अवैध कमाईचा रक्त वाहिण्यात वाहत नाही."

मी खान बहादुर च्या आत्म्याला दुखावल्या बाबत बोलत होतो. तू ईश्वराच्या प्रसन्नते व नाराजी बाबत बोलत आहेस. अरे मी तुझ्या नव्या व्यवसायाबाबत बोलत आहे. खान बहादुर इरशादुलाहच्या नातवाला धोब्याचा धंदा शोभतो कां? या व्यवसायाने आपल्या कौटुंबिक प्रतिष्ठेला तडा जात नाही का? आपल्या वंशाच्या नांवाला काळीमा फासला जात नाही कां? चांगली नोकरी होती. उगीचच तुरुंगाधिकाऱ्याशी तेढ निर्माण केली. तीन वर्षापासून नोकरीवरून घरी बसला आहेस. तुझ्या नोकरी बाबतचे कागदपत्र कोणत्या कोपऱ्यात पडले असतील ईश्वरास ठाऊक. तुरूंगाधिकाऱ्याशी जुळते घेतले असते तर तुझे काय बिघडले असते. एका दरोडेखोरासाठी चांगली नोकरी गमावलीस. ठीक आहे, जे झाले ते झाले. पण आमची अब्रू तू घालवायला नको होती."

"दादा, मला खुलासा करू द्या"

"बोल, तुला काय बोलायचे ते. मला सांग तू धोब्याचा धंदा करण्यास का विवश झालास? या व्यवसायात चांगले उत्पन्न मिळतंय काय?"

"दादा, मी उत्पन्नाच्या दृष्टिकोनाने हा व्यवसाय सुरु केलेला नाही. हा व्यवसाय सुरू करण्यामागे माझा सदोद्देश्य व पूर्व नियोजित योजना आहे. मी माझ्या पित्यासमान भावास विनंती करीन की त्यांने मला माझ्या व्यवसायात सुयश चिंतावे."

"मी नेहमीच तुझ्या करिता सुयश चिंततो. तू मला पिता समान मानतो ही तुझी कृतज्ञता आहे. तू जरी माझ्या पेक्षा अधिक धुष्टपुष्ट झाला असला तरी मी तुला आपल्या मुलासारखा मानतो. पण माझ्या मते तू धोब्याचा व्यवसाय सुरु करून योग्य निर्णय घेतला आहे असे मला नाही वाटत. नोकरी वरून घरी बसविल्यानंतर जर तू लखनऊला आला असता तर तुला किती तरी नोकऱ्या मिळवून दिल्या असत्या व तू सन्मानाने जीवन जगू शकला असता. तुला ते सर्व मान्य नव्हते. तू तर माझा साधा सल्लाही घेतला नाही."

"दादा, तुम्ही ज़मीर साहेबाना भेटलात त्यांची प्रशंसा ही केली. त्याच्या नैतिक व बौद्धिक क्षमतेची तुम्हाला जाणीव झाली आहे. मी नोकरीवरून घरी बसवल्या नंतर त्यांचाच सल्ला घेतला. मला असा व्यवसाय हवा होता ज्याने त्वरित चार पैसे मिळू लागतील व कौटुंबिक गरजा पुरवता येतील. ज़मीर साहेबांनी मला असा काही सल्ला दिला की तो मला चटकन स्वीकार्य वाटला. हा व्यवसाय स्वीकारण्याचे दुसरे कारण असे की उच्चस्तरीय मुस्लिम काही व्यवसायाना हीन लेखतात. जे खरे पाहता अवैध धंदे नाहीत उलट ते व्यवसाय प्रेषितांनी केले आहेत. मला वाटते की मुस्लिमांना उदरनिर्वाहासाठी योग्य मार्ग प्राप्त होत नाही, त्याचे कारण असे की ते वैध धंद्याचा स्वीकार करीत नाही. त्यांना वाटते की ते व्यवसाय केवळ खालच्या दर्ज्याचे लोकच करतात. मला धोब्याचा धंदा करताना पाहून बऱ्याच तरुण बेकारानीही असेच उद्योग सुरु केले आहे. अशा काही तरुणाशी तुमची भेट घालून देईन. मिर्झा सुलेमानने कोळश्याचा धंदा सुरु केला आहे. सय्यद रेहानने फळ विक्री सुरु केली आहे. झफर खानने पानाचे दुकान टाकले आहे व सर्वच्या सर्व खुशहाल व यशस्वी आहेत. मला आशा आहे की ईश्वर माझ्या निर्णयाने प्रसन्न होऊन मला पुण्यदान करील.

एक आणखी मुद्दा सांगू इच्छितो. हा व्यवसाय सुरू करण्यामागे माझा व ज़मीर साहेबांचा एक महत्वाचा उद्देश होता. तो असा की मी गल्ली बोळांत फिरून हिंदू मुस्लिम विधवांबाबत माहिती गोळा करावी. ईश्वरकृपेने ते ही काम पुरे केले आहे व त्यांना स्वंयरोजगार उपलब्ध करून देण्याचे कार्यही सुरू केले आहे. प्रयत्नाना चागंली गति प्राप्त झाली आहे. पण एका दुसऱ्या व्यक्तीने ही हीच कार्य पद्धत अमलांत आणली आहे. असो, त्यांच्या कृत्याने आम्हास वाईट वाटले नाही. ते ही

विधवांना काम देत आहेत. उलट आम्हाला समाधान वाटते की त्यांनी आमची निम्मी जबाबदारी सांभाळून घेतली आहे. खेद वाटतो तो या गोष्टीचा की ते विधवांपेक्षा अधिक स्वत:चा स्वार्थ साधत आहेत. ते स्वत: जास्त नफा कमवतात व विधवा कारागिरांना नाममात्र मजूरी देतात. त्यामुळे त्यांना यश प्राप्त होत नाही असे समजते. लोक आमच्या प्रयत्नांची वाहवाह करीत आहेत.''

''अरे भल्या माणसा, लखनौ येथे हेच काम केले असते. मी माझ्या मित्र मंडळीना सांगितले असते की माझा भाऊ मशीनींचा एजंट झाला आहे. आता मी तेथे तुझा परिचय धोबी म्हणून करून देऊ कां?''

''दादा, आता समाज बदलत आहेत आता आपण आपल्या विचारांत ही परिवर्तन घडवून आणायला हवे. ईश्वराचे प्रेषित यांनी ज्या व्यवसायाना अवैध म्हटलेले नाही त्यांना अवैध समजण्याचा आम्हाला अधिकार नाही. या व्यवसायातूंन चांगले उत्पन्न प्राप्त होते. ईश्वरकृपेने आता माझ्या कडे घर बसल्या एवढे काम येते की दुकान भरलेली राहते. मी तुम्हाला दाखवीन. दोन मदतनीस कर्मचारीही काम करताना दिसतील त्यांना मी दोनशे रुपए मासिक वेतन देतो. मला आता नोकरीची चिंता नाही. राहिली काय की गेली काय! ईश्वराची लीला अगाध आहे. तो सर्वज्ञ आहे. आपले ज्ञान तोकडे आहे. तो आपली परीक्षा घेत असतो व आपण हैरान होत असतो. पण निश्चितच ईश्वर जे काही करतो भल्यासाठी करतो. मनुष्य स्वत:च आपल्या उत्पन्नाचा मार्ग बंद करून टाकतो, मात्र ईश्वर त्याच्याकरिता लगेच दूसरा मार्ग मोकळा करतो. मात्र हे लोकांच्या लक्षात येत नाही.''

राशिद अली उत्साहाच्या भरात बोलत गेला. तो कोणाशी बोलतोय याचे त्याला भान राहिले नाही. मुरशदअली खान ने धाकट्या भावाचे बोलणे ऐकूण घेतले. त्यांना त्यांच्या मताचे खंडण झाल्याचे वाईट वाटले. शेवटचे वाक्य त्यांना जास्तच बोचले. ते शांत झाले. राशिद अली खान ला चूक झाल्याची जाणीव झाले ते म्हणाले ''दादा, माझं बोलण तुम्हाला वाईट वाटले असेल तर मला क्षमा करा.''

''राशिद साहेब, आता क्षमा करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. ईश्वरकृपेने आता तू बुद्धिमान झालास. मी निर्बुध्द झालोय मला खूप अपेक्षा होती. पण मी उगीचच तुला हटकल्याचे खेद हातंय.''

''विषादपूर्ण स्वरात मोठ्या भावाचे व्यंगात्मक उद्‌गार ऐकून राशिदअली थोडे गांगरून गेले. त्यांनी विचार केला मी काय बोललो व भावाने वेगळाच अर्थ घेतला.'' ते स्तंभित झाले. तोंडातून शब्द निघेनासे झाले. डोळ्यात अश्रु तरळू लागले व टपटप गळू लागले.

''राशिद, मी एक गोष्ट सल्ला म्हणून तुझ्या समोर मांडली होती. स्वीकार करणे वा न करणे

तुझ्या मर्जीवर अवलंबून होते. तू जे काही बोललास ते सुद्धा चांगल्या उद्देशाने बोललास. पण आता म्हातारपणामुळे माझा स्वभाव थोडा स्वाभिमानी झालाय. मला कोणाचाच विरोध सहन होत नाही. तुझा विरोध तर बिल्कुल सहन होणार नाही. पण ईश्वर शपथ, मी तुझ्यावर नाराज नाही. आणि हे काय तू बायकां सारखा अश्रू ढाळतोय चल सोड हा विषय दुसऱ्या कुठल्या तरी विषयावर बोलू या."

"दादा, ईश्वर शपथ मी तुमच्या आज्ञेचे उलंघन पाप समजतो. मात्र एक विनंति करू इच्छितो ईश्वराच्या आज्ञेशी तुमच्या आज्ञेचा विरोध होत असेल तर मात्र मी तुमची अवज्ञा करीन. मी तर म्हणत होतो की ईश्वर व ईश्वराचे प्रेषित यांनी ज्या गोष्टींना वैध ठरविले आहे, मानवाने ही त्यास वैध जाणले पाहिजे. तुम्हाला वाटले मी तुमचे मत खोडून काढतोय. असो आता आपण दुसऱ्या गोष्टींकडे वळू या."

"राशिद, आता रात्र झालीय, झोपेची वेळ झाली आहे. उद्या बोलू या. मुले ही झोपलीत. तुझी वहिणी ही झोपी गेली आहे. हो पण रूशादची आई जागी आहे. मला पण थकल्या सारखे वाटतंय.

मोठ्या भावाची अनुमति घेऊन, प्रणाम करून राशिद अली खान आपल्या खोलीत निघून गेला.

❋❋❋❋

वाहरे चारित्र्य

"आई ! हे नमाज पढत नाहीं कां?"

"कोण नमाज पढत नाही ? बेटा"

"सांगू, तुम्ही नाराज तर होणार नाही ना?

"नाही रे, मी का नाराज होईन? सांग."

"आई, काल काका व अर्शी आलेत. पण त्यांनी एक वेळची नमाज अदा केलेली नाही. रश्शो ही नमाज पढत नाही व काकी सुध्दा. ईश्वर अप्रसन्न होईल?"

मरियम मुलाच्या या उघड टीकेने घाबरून गेली. तिला खंत वाटू लागली की ह्या वडीलधारी आप्तजनांच्या वागणुकीचा त्यांच्या मुलाच्या बालमनावर दुष्परिणाम तर घडून येणार नाहीत ना? विचारांति बोलली. "बेटा, मोठ्यांच्या बाबतीत टीका करू नये." तिला तिच्याच उत्तराने समाधान झाले नाही. मग मुलाचे समाधान कसे होणार?

"बरं का आई, रश्शोने दहा पैसे उचलून ठेवून घेतले"

"कुठून"

"बाहेर, रस्त्यावर पडले होते."

"तू तिला का उचलू दिले?"

"मी तिला उचलू नकोस म्हणून सांगितले. मी तिला सांगितले की, प्रिय प्रेषित (स) यांनी खाली पडलेली वस्तू उचलण्याची मनाई केली आहे. पण तिने ऐकले नाही. इतक्यात अर्शी भाऊ आले. तिने त्यांना पैसे दाखविले व विचारले की ते खोटे तर नाही ना. अर्शी भाऊ ने नाणे पाहिले म्हटले की ते खोटे नाही अस्सल आहेत. नंतर धावत धावत जाऊन खाऊ घेऊन आले. मला ही देत होते, मी घेतला नाही. दोघांनी खाऊ खाऊन टाकले. शी, मला नाही आवडलं. अन आई रशीभाऊ शिव्याही देतो. खोटं ही बोलतो."

मरियमला कससं वाटू लागलं. तिची खंत वाढत होती. रशाद बोलतच होता.

"आग आई, हे सर्व सकाळी खूप उशीरा उठतात. ते उशीरा उठतो म्हणून आम्हाला नाश्ताही उशीरा मिळतो.

"अरे बेटा, ते काल प्रवासाने थकले होतेना. गाडीत गर्दी होती आणि रात्री उशीरापर्यंत गप्पा मारीत होतेना म्हणून उठायला उशीर झाला. आणि हे बघ रशाद. हे सर्व आपले पाहुणे आहेत. त्यांना असं काही बोलू नकोस की त्यांना वाईट वाटेल.

'बरंय आई' असे म्हणून तो गृहपाठ करायला टेबला जवळ गेला. टेबलाची अवस्था पाहून तो हैरान झाला. टेबलावरील कांच फुटली होती, व त्याच्या खाली ठेवलेले वेळापत्रक गायब झाले होते. त्याच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. धावतच आई जवळ येऊन रडू लागला.

"काय झाले बाळा, कां रडतोय"

"आई कोणीतरी माझे वेळापत्रक काढून नेले"

"कोणी नाही नेले घरातच असेल."

"घरात कुठे आहे आई?"

"तुझ्या अर्शी भाऊ ने काढून घेतले असेल. मी पाहिले होते. त्याने त्याच्या पेटीत ठेवले आहे."

"मग मी त्याच्या पेटीतून काढून घेईन."

"नको बेटा, असं करू नकोस. ते आपले पाहुणे आहेत. त्यांची चोरी उघडकीस आली तर त्यांचा अपमान होईल. ते दुखावले जातील. असं कर तू दुसरा तयार करून घे."

आईच्या उपदेशाने रूशादचे समाधान झाले नाही. तो दिवसभर उदास राहिला. त्या दिवशी दुपारी ज़मीर साहेबांकडे जेवायला जायचे होते. राशिदसाहब आपल्या वडीलबंधु व इतर सदस्यांना घेऊन त्यांच्याकडे पोहचले. रूशाद आपल्या चुलत भाऊबहिणींच्या संगतीत वैतागून गेला होता. सायंकाळी घरी भोजनाची व्यवस्था होणार होती. मरियमने त्याला मदतीसाठी रोखून ठेवले. त्याला ही जायची इच्छा नव्हती. त्याला घरी थांबण्यातच बरे वाटले. आईने समज दिल्यावरून त्यांने निश्चय केला की कोणाला तो काही बोलणार नाही. टाईम टेबल ही दूसरा तयार करून घेईल. पण दिवसभर तो विचारमग्न राहिला. सायंकाळची नमाज पढल्यानंतर त्याने आईला आश्चर्यचकित करणारा प्रश्न विचारला "आई, हे सर्व पाहुणे लखनऊला कधी परततील?"

मरियम हात माथ्यावर आपटले. ती म्हणाली एका दिवसातच पाहुण्यांनी रूशादला कंटाळून सोडले" तिने मुलाची समज घालण्याचे प्रयत्न केले.

"मुला, हे बरे नाही, असं विचारु नये. पाहुण्यांची सर्व प्रकारे सेवासोईची व्यवस्था करायला हवी. न विचारता ही त्यांनी एखादी वस्तू घेतली असेल तर वाईट वाटून घ्यायचे नाही. त्यांची सेवा करायला हवी. तुला आठवत नाही का की प्रेषित (स) यांच्या घरी एक पाहुणा आला होता. रात्री त्यांने बिछाण्यावर घाण केली व सकाळ होण्यापूर्वी गायब झाला. प्रिय प्रेषित (स) यांनी स्वत: आपल्या हाताने बिछाणा धुऊन स्वच्छ केला.

मरियम मुलाला उपदेश देत होती पण शब्द तिच्या मनापासून निघत नव्हते. तिला खंत

होती की या असंस्कृत मुलांच्या संगतीचा रूशाद वर अपपरिणाम घडून येतील की काय? म्हणूनच ती नेहमी प्रमाणे मुलाला स्पष्ट शब्दात समज देत नव्हती. तिने सल्ला मिळावा म्हणून संपूर्ण परिस्थिती रजियाच्या आई समोर मांडली. मुल्लानीबी सुद्धा चिंतित झाल्या. त्यांना आश्चर्य वाटले की रूशादच्या सत्प्रवृत्तीचा पाहुण्या मंडळीवर काहीच परिणाम कसा झाला नाही. शेवटी त्यांनी असे मत मांडले की जोवर पाहुणे मंडळी येथे राहतील तोवर त्यांच्याशी चांगले वर्तन करण्यात यावे.

आम्ही त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत आहोत असा त्यांना भास होता कामा नये. त्यांनी ज़िझया व रूशाद ला ही समजाऊन सांगितले. मरियमला ही निक्षूण सांगितले.

मरियम सायंकाळच्या भोजनांची व्यवस्था रज़ियाच्या आईच्या सल्ल्यानुसार करीत होती. तिने सायंकाळ होता होता स्वयंपाक पूर्ण केला. ती पाहुण्यांची वाट बघत बसली होती की ते येतांच जेवण वाढण्याच्या कामाला लागता येईल. मगरिबच्या (सूर्यास्ताच्या) नमाज नंतर हवालदार राशिदखान एकटेच घरी परतले. मरियमला राहावले नाही तिने पटकन विचारले "भाऊ साहेब आदि कुठे आहेत?"

"ते सर्व सिनेमा पाहायला गेलेत. साधारण दहा वाजता घरी येतील. दोन चिमुकल्या मुलामुली व दोन स्त्रिया समोर सांगताना बराच संकोच वाटला पण करणार काय, कळविणे भाग होते!"

****

वक्रमार्ग

"काय दादा, ज़मीर साहेबांकडचे जेवण पसंत आले की नाही?"

"भोजन तर चांगले होते, पण जेवणाची पद्धत एकदम राशिदच्या घरासारखी होती. भोजनांत नाममात्र फरक होता. मुल्लानीबीचा नीटनेटकेपणा व स्वच्छ साधेपणा अनुभवल्या नंतर मरियम जणु त्यांची शिष्या आहे असे वाटू लागले.

"खरं सांगायचे म्हणजे मुल्लानीबीचा मरियमवर व ज़मीरसाहेबाचा राशिद वर प्रभाव झाला आहे. ज़मीरसाहेबांच्या सहवासाने राशिदच्या स्वभावात सौजन्य निर्माण झाले आहे. आमच्या सन्मानाला ठेच पोहचले, अशा काही संवयी ही त्यांनी स्वीकारल्या आहेत. समाजाच्या बदलत्या स्वरूपाचा परिणाम आहे. आता तर उच्च घराण्यातील लोकांना सर्व प्रकारचे उद्योग करावे लागत आहेत. आमचे राशिद साहेबानी धोब्याचा धंदा सुरू केला आहे."

"इश्श, तुम्ही पणना विषयाला उगीचच लांबणी देता. मी काय म्हणत होते व तुम्ही भलताच विषय सुरु केला."

"बरंय, तू बोल, काय बोलत होतीस ते"

"अहो ती मुल्लानीबाई घर कारभार काय झकास चालविते हो आणि इतक्याशा वयात त्यांची मुलगी रजिया पण किती तरबेज झाली आहे. पण माझं मत असं आहे की शिकवणारा कितीही मेहनत करो, शिकणारा जर ध्यान देत नसेल तर शिकविण्याचा काही उपयोग होत नाही. रजिया दहा बारा वर्षाची असेल पण आईने दिलेले वळण तिने शिताफीने अंगीकारले आहे. अजून ती पडद्यात राहत नाही, तुम्ही तर पाहिलेच आहे की ती पूर्ण स्वंयपाक करू शकते. सर्व प्रकारचे शिवणकाम तिला येते. मी तिचे काम पाहून दंग राहून गेलें. तिचं उठणे बसणे, संभाषण, वागणुक, लिहिण वाचनं सर्वच कौतुकस्पद आहे. सारांश, ती सर्वगुणसंपन्न आहे. तिच्या वयाच्या दृष्टीने ती खरोखर फारच हुशार व हुनरमंद आहे."

"अर्शीची आई तू म्हणत होतीस की विषयाला उगीचच लांबणी देतो. मला विषयांतर करायची संवय आहे मग ही तुझी कसली बडबड चालली आहे. तुझी जीभ सारखी कात्रीसारखी चालू आहे. थांबायचं नाव घेत नाही. आणि तुझ्यात एक विशेष संवय आहे की एखाद्यात जरासा गुण दिसला की बस तू कौतुकाचे पुल बांधायला लागतेस. आपल्याला काय घेणे देणे ज़मीर साहेबाच्या कुटूंबियांशी.

"अर्शीच्या अब्बा, घेणे देणे आहे म्हणून तर बोलतंय, राशिद तुमचा धाकटा भाऊ आहे. भाऊच नाही तुमच्या मुला सारखा आहे. तुमचा कृतज्ञ आहे. तुम्हाला मान सन्मान देतो. तुमच्या विरुध्द एक शब्द बोलत नाही."

"कमाल झाली तुझी आता ज़मीर साहेबांच्या घराचे कौतुक करीत होतीस आता माझ्या भावाचे गुणगाण करू लागलीस. अरे तो राशिद तर निव्वळ मूर्ख आहे. तू बोल, तुला काय म्हणायचे."

"माझं असं म्हणणं आहे की राशिद व ज़मीर साहेब यांच्यात जी मैत्री आहे ती काही तुमच्या पासून लपलेली नाही. ते दोघे एकमेकाचे सहकारी व मदतगार ही आहेत. दोघांचे विचार सारखे आहेत, दोघांचा स्वभाव सारखा आहे, दोघांचे बोलणं वागणे एक सारखं आहे.

"अरे ते सर्व ठीक आहे. पण त्यांच्याशी काय घेणे देणे?"

"अहो अर्शीचे अब्बा, पुरुषांना फक्त पैसे कमवितां येतात. घरतर बायकाच चालवितात ना?"

"म्हणजे पुरुषांना घरकारभाराची काहीच अक्कल नसते. निदान माझ्या बाबतीत तरी तुझे असेच मत आहे."

"तुम्ही पण ना.. बस विचित्र संशयी आहात. पूर्ण म्हणणं ऐकूण घेत नाही मध्येच काहीतरी विषय काढून विषयांतर करता. अहो माझं मत असे आहे की राशिद मार्फत आपण रजिया व अर्शीच्या विवाह बाबत बोलणी का करू नये?"

"हे ईश्वरा, काय तुझ डोकं आहे. तू त्यांची बाजू पाहिली आहे. स्वत:च्या बाजूचा पण थोडा विचार कर."

"माझ्यात काय कमतरता आहे? ईश्वर कृपेने आपल्याकडे सर्व काही आहे. अर्शी चौदा पंद्रह वर्षाचा असेल. दहावी पास आहे, देखणा आहे. आम्ही धार्मिक वृत्ती स्वीकारलेली नाही. एवढंच ना ती तर आपण कधीही स्वीकारू शकतो. मी कधी नमाज पढत नाही. पण मुल्लानीबीच्या सोबत त्या दिवशी सायंकाळी नमाज अदा केली ना?"

"अस्सं होय म्हणजे नमाज सुध्दा मुल्लानीबीची दिशाभूल करण्यासाठी अदा केली तुम्ही तुम्हाला रजिया हवी आहे. अहो राशिद व ज़मीर साहेबाच्या बोलण्या वरून माझ्या लक्षात आले की घरापासून बाजारा पर्यंत व बाजारापासून सर्व कार्यक्षेत्रांपर्यंतची सर्व कामे कुरआन व प्रिय प्रेषित (स) यांच्या उपदेशानुसार करायला हवीत. त्याला म्हणतात धर्म, जमीरसाहेबांनी कुरआनाच्या आधारे हेच समजाऊन सांगितले होते. त्यांचे म्हणणे ऐकून राशिद तल्लीन झाला होता.

माझं वय झालं. जे काही वाडवडिलांकडून शिकलोय त्यानुसार जीवन व्यतीत करू शकलो तर जिंकलो. ज़मीर साहेबांचा शिष्य व्हायचे असते तर इन्स्पेक्टरच्या पदावरून निवृत्त होण्या ऐवजी कामावरून बडतर्फ झालो असतो व ही मिळकत कुठून मिळाली असती जिचा निवृत्त झाल्यानंतर आपण आनंद घेत आहोत. राशिद सारखं मला काहीही करता येणे शक्य नाही."

"बरं बरं, मी मौज मजा करीत आहे. ते सोडा तुम्ही अर्शी करीता रजिया बाबत बोलणी करणार आहात की नाही?"

"अग, इतकी घाई का करतेस, हजारो मुली मिळतील. हली विचारतो कोण मुलींना? अग अर्शीसाठी शब्द टाकला की लगेच होकार मिळेल. जमीर साहेबांची मुलगी काय मोठी लागून गेली आहे?"

"तेच तर सांगतंय, हजारात एक आहे ही मुलगी. मी शेकडो मुली पाहिल्यात पण जे गुण रजिया मध्ये दिसून आलेत तसे इतर कुठे दिसले नाही. तुम्ही जर हुंड्याचा विचार करीत असाल तर लक्षात असू द्या ज़मीर साहेबांना एकुलती एक लेक आहे. आलं का लक्षांत?"

"तुझ्या अकलेची दाद द्यायला हवी?"

"ही नुसती अकलेची बाब नाही, हली. तुम्ही पाहता मुलांचे लग्न झाले की आईबापाची कवडीची किंमत राहत नाही. मात्र रज़ियाच्या बाबतीत तसं घडणार नाही. तिला योग्य शिक्षण मिळत आहे. ज़मीर सार्हेबानी घरी शिकवणीसाठी एका शिक्षकाची व्यवस्था केली आहे. आई स्वत: तिच्या अभ्यासाकडे लक्ष देते. अरबी व उर्दू ज़मीर साहेब स्वत: शिकवतात. अहो, कॉलेजातल्या पोरी वात्रट असतात?"

"तुझं बोलणे मला पटलं. तुझा तर्क ही योग्य आहे पण हे संबंध जुडण कठीण वाटते."

"का"

"माझ्या मते जे आपण अर्शी बाबत विचार करतोय तेच राशिदने त्याच्या रूशाद करिता मनोमन निश्चित केले असावे."

"अशा परिस्थितीत वेळ न घालविता त्वरित राशिदशी अर्शीच्या प्रस्तावाबाबत चर्चा करा म्हणजे त्याला रूशादचा प्रस्ताव मांडण्याची हिम्मत होणार नाही."

"मला ही असंच वाटतंय, जमीर साहेबांची रूशादवर कृपा दृष्टि असल्याचा भास होतो. कदाचित ते स्वत: आपल्या मुली बाबत राशिदशी बोलणी सुरु करतील. ज़मीर साहेब अधून मधून रूशादचे कौतुक करतात ना म्हणून माझ्या मनांत असा संशय निर्माण झाला. ते म्हणत होते की रूशाद इकडे तिकडे खेळायला जात नाही. केवळ रजिया सोबत खेळत असतो. या वरून वाऱ्याची दिशा लक्षात येते."

"तुम्ही राशिद वर आपल्या प्रभावाचा उपयोग करणे आवश्यक झाले आहे. राशिदला अधीन करून घेतल्या नंतर ज़मीर साहेब आपोआप आटोक्यात येतील."

"ठीक आहे संधि मिळताच मी विषयारंभ करीन. घाईघाईच्या कामात व्यय निर्माण होण्याची शक्यता असते. मला रजिया बाबतचा तुझा प्रस्ताव पसंत आहे."

"लखनऊला परतण्यापूर्वी हे काम झाले पाहिजे."

"पण हे बघ जोवर आपण येथे आहोत नियमितपणे नमाज पढत जा. मी पण नमाज पढायचे सुरु करतो. तू अर्शीला ताकीद करून ठेव. त्याच्या अवगुणामुळें येथील लोक बरेच नाराज आहेत असे वाटते."

"हो अर्शीनि असे काही काम केलंय की रूशादने त्याच्याशी अबोला धरलाय."

"ते काय"

"त्यांने रूशादचा टाईमटेबल चोरलाय."

"तुला कसं माहित झालंय?"

"मी त्याची पेटी तपासत होते. त्यातच ते मला दिसले. मी विचारले असता त्याने रूशादनेच त्याला दिलंय असे खोटे उत्तर दिले. मी मरियमकडे रूशादचे कौतुक केले असता सत्य घटना माहित झाली."

"हे तर फार वाईट झालंय. पोराच्या अशा कृत्यामुळे आपले काम कठीण झालंय. आले कां तुझ्या लक्षात?"

"मला कळतंय, पण तुम्ही पहाल उद्यापासून अर्शीच्या स्वभावात बद्दल झालेला असेल."

"स्त्री चमत्कार घडवून आणू शकते, तिच्या आधारे मनुष्य सर्व काही प्राप्त करू शकतो. फरहादने शीरीनच्या इच्छेनुसार डोंगर पोखरून काढला होता. कौस ने लैला करिता काय नाही केले. आपले पुत्ररत्न अजून अज्ञान आहे. पण रजिया बाबत विषय कळतांच त्याच्यात आश्चर्यकारक फरक घडून येईल. तो नमाज पढू लागेल व सर्व लोक त्याचे कौतुक करू लागतील. त्यांना सत्य कळू शकणार नाही."

"ईश्वर कृपेने आता पर्यंत झालेल्या चुका तर दुरुस्त होतील. अन हे बघा आज पासून सिनेमा जायचे बंद, लखनऊला परतल्या नंतरच सिनेमा बघायचे आले लक्षात."

"ईश्वर, वक्रमार्गापासून अलिप्त राखो"

पत्नीला आपल्या पतिचा बोचक शेरा सहन झाला नाही. पतिने गपचुप कुशी बदलून झोपण्याची तयारी केली. पत्नी नाइलाजास्तव शांत झाली. दोघे विचार करता करता निद्राधीन झाले.

****

सामंजस्य

"ज़मीर साहेब हा रूशाद काय म्हणतोय बघा" राशिद अलीने मोठ्या गंभीरपणे म्हटले रूशाद जवळच बसला होता ज़मीर साहेबानी रूशादला विचारले "काय म्हणतोस बेटा"

रूशाद म्हणाला "काका तुम्ही त्या दिवशी कुरआनाचे भाषांतर करुन मला सांगितले होते की इस्लाम हाच सत्यधर्म आहे."

"हो, मी योग्य तेच सांगितले होते.'"

"पण काका, आज शाळेत एका शिक्षकाने सांगितले की सर्व धर्मांमध्ये चांगल्या गोष्टी शिकविल्या गेल्या आहेत व सर्व धर्म सत्यधर्म आहेत. असे सांगून त्यानी एक गोष्ट अशी सांगितली की माझे मन विचलित झाले."

"काय म्हटले त्यांनी"

"त्यानी म्हटले की, ईश्वर तर सर्वांचा आहे, मात्र एका धर्माचे लोकांचा आग्रह आहे की केवळ त्यांचाच धर्म सत्य धर्म आहे व इतर सर्व धर्मांना ते खोटे व अयोग्य मानतात. किती संकीर्ण दृष्टिकोन आहे त्यांचा त्यांच्यात सामंजस्य नाममात्र ही नाही व त्यामुळेच रोजच मारामाऱ्या व भांडण होत असतात. काका, 'एक धर्माचा" उल्लेख करून इस्लामकडे इशारा केला आहे. मुस्लिमांना खोटारडे व हेकेखोर सिध्द केले आहे. हे ऐकूण मला फार वाईट वाटले. मला तुम्ही पठण केलेली कुरआनातील आयतीची आठवण झाली. मी मात्र त्या शिक्षकांसमोर आयतीचा (श्लोकाचा) उल्लेख केला नाही. त्यांनी आयतीला चुकीचे ठरविले असते व उगीचच वाद निर्माण झाला असता."

ज़मीर साहेबांनी रूशादचे बोलणे शांतपणे ऐकले नंतर त्याला सांगितले की, जा रजियाला बोलवून आण. दोघांना तुझ्या प्रश्नाचे उत्तर ऐकायला मिळेल.

रूशाद उठून आत गेला तो आंत जाताच राशिद अली ने जमीर साहेबांना शाळेतील शिक्षणाच्या विरोधाबाबतचा खुलासा केला. त्यांनी म्हटले "ज़मीर साहेब, शाळेतील शिक्षक भोळ्या भाबड्या मुलांसमोर इस्लाम विरुध्द बोलत असतात त्यामुळे त्यांच्या निर्मल मनांवर अपपरिणाम घडून येण्याची भीति निर्माण होते. म्हणून आपण आपल्या मुलांना अशा शाळांपासून दूर ठेवायला हवे. तुमचा सल्ला बहुमोल असतो म्हणुन मी मुलाला त्या शाळेत दाखल केले होते. आज अपेक्षा प्रमाणे समस्या आपल्या समोर येऊन ठेपली आहे."

"राशिदसाहब घाबरू नका, रूशादचे आताच समाधान होईल."

"अहो, एका रूशादचे समाधान केल्याने काय होणार आहे. शाळेत अनेक मुस्लिम विद्यार्थी आहेत त्यांच्या सर्वांच्या घरांत तुमच्या सारखे 'ज़मीर साहेब' तर नाहीत ना? तुम्ही रूशादचे समाधान कराल पण इतर मुस्लिम मुलांचे काय?"

ज़मीर साहेब बोलणार इतक्यात रूशाद व रज़िया येऊन एका बाजूला बसले. ज़मीर साहबने रूशादला त्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐकूण घेतला व नंतर समजाऊन सांगू लागले.

"यांत शंका नाही की प्रत्येक धर्मात काहीन कांही चांगल्या गोष्टी सांगण्यात आल्या आहेत व प्रत्येक धर्माने माणुसकीचे पाठ दिले आहेत. मात्र प्रत्येक धर्माची तत्वें कोणत्याना कोणत्या श्रध्दे वर आधारित असतात. एखाद्या धर्माच्या तत्वांवर श्रध्दा निर्माण झाली की मग तो त्या धर्माचा अनुयायी होतो. एका धर्माच्या तत्वांनुसार ईश्वर एक-नसून तीन आहेत. दुसरा धर्म सांगतो की ईश्वर दोन आहेत एक पुण्याचा व दुसरा पापाचा. एक असा धर्म आहे ज्यानुसार अनेक ईश्वर आहेत व प्रत्येक ईश्वराचे वेगवेगळ्या जबाबदाऱ्या वा अधिकार आहेत. एक जन्म देणारा, एक पालन करणारा, एक मृत्यु देणारा, एक पाण्याचा, एक वाऱ्याचा अशा प्रकारे ईश्वराबाबतच्या अनेक कल्पना विविध धर्मात दिसून येतात. एक धर्म ईश्वर एक आहे. तोच आपला सृजनकर्ता आहे, तोच अन्नदाता आहे, तोच शासक व मालक आहे. तोच जगाचा कारभार पाहतो. त्याचा कोणीच भागीदार नाही, तोच सर्वशक्तिमान आहे. सर्वकाही त्याची उत्पत्ती आहे. त्याच्या शिवाय कोणाच्याच हातात कोणतेच अधिकार नाहीत. तो कोणावर अवलंबून नाही उलट सर्व काही त्याच्यावर अवलंबून आहेत. रूशाद, समजतय ना मी काय बोलतोय ते."

"होय"

"आता मला सांगा की या साऱ्या गोष्टीतील विविधता योग्य मानली जाऊ शकते कां? ईश्वर एक आहे हे पण बरोबर आहे, ईश्वर दोन आहेत हे पण बरोबर आहे, ईश्वर तीन आहेत हे पण बरोबर आहे, ईश्वर अनेक आहेत हे ही बरोबर आहे व ईश्वर मुळी अस्तित्वात नाही हे ही बरोबर आहे? रूशाद सांग बरे या सर्व गोष्टी खऱ्या होऊ शकतात कां? या पैकी एकच गोष्ट खरी असू शकते. एखाद्या व्यक्तिची दोन तीन ईश्वरावर श्रध्दा असून तो जर म्हणत असेल की ईश्वर एक आहे तर लोक त्याला प्रामाणिक मानतील कां?

"नाही त्याला खोटारडा मानतील."

"होय, अब्बाजान एकच गोष्ट खरी आहे ती म्हणजे इस्लामची शिकवण की ईश्वर एक आहे."

"मी त्या निर्णयावर येण्यापूर्वी हे सिध्द करु इच्छितो की सर्व धर्म सत्यधर्म नाहींत. एकच धर्म खरा धर्म असू शकतो. ज्याचे मन ज्या तत्वाना योग्य मानतो त्याने ते सत्य मानावे. नंतर जर त्याने इतर धर्मांना ही सत्यधर्म मानले तर तो खोटा मानला जाईल वा बिनडोक मानला जाईल."

"काका, माझ्या लक्षात आले, मला माझ्या धर्मावर पूर्ण श्रध्दा आहे. ईश्वर एक आहे हे असे सत्य आहे की जे लोक अनेक ईश्वरांवर विश्वास ठेवतात ते ही मानतात की सर्वात मोठा एक ईश्वर आहे. शाळेत पुस्तकात एका महादेवाची कल्पना दिली जाते. तुम्ही सत्य बोलताय. कुरआनात म्हटले आहे. अलाह (ईश्वरा) जवळ इस्लाम हाच सत्य धर्म आहे. खरोखर एकेश्वरवाद सत्य आहे व अनेकेश्वरवाद असत्य आहे. जसे एकेश्वरवाद अनेकेश्वरवादा सोबत राहू शकत नाही तसेच इस्लाम व इतर धर्म एकसमान होऊ शकत नाही. माझं म्हणणं बरोबर आहे ना काका?

"अगदी बरोबर आता 'सामंजस्य' शब्दाचा अर्थ समजून घे जेणेकरून कोणतीही गैरसमज

वा चूक घडू नये. 'सामंजस्य' चा अर्थ आहे दुसऱ्यांचे बरे व्हावे अशी सदिच्छा बाळगणे. लोकांनी असं बोलावे की त्यांना ते बरे वाटावे. इतरांशी असं भेटावे की त्यांना आपलेसे वाटावे. बळजबरीने आपले मत दुसऱ्यांना मान्य करायला लावणे म्हणजे सामंजस्य नव्हे. एखाद्या खोट्या बाबीस सत्य मानून घेणे सामंजस्य नाही. काही कारणास्तव एखाद्या असत्य बाबीस सत्य मानून तोंडी मान्यता देणे की तू पण खरा व तुझा विरोधी ही खरा, निव्वळ लबाडी असून इतरांना वेड्यात काढण्यासारखे आहे.

हे बघ रूशाद, एखाद्याने तुझी कटू टीका करून तुझी नालस्ती करण्याचा प्रयत्न केला तरी तू सहन करून घे व त्याला उत्तर देतांना इतक्या मवाळ भाषेत दे की ऐकणाऱ्याला खात्री होईल की त्याच्या शब्दांनी तू नाराज झालेला नाही. "मी तुला कुरआनचा पाठ देतांना शिकविले होते ना की "धर्माच्या बाबतीत बळजबरी करता कामा नये. कुरआनची शिकवण आहे की इस्लाम स्वीकारण्याबाबत कोणावरही बळजबरी करू नका" लोकांना अत्यंत मृदू शब्दात समज द्या. आदरणीय मूसा (अ) यांना ईश्वराने प्रेषितत्व देऊन फिरऔन बादशाहला सत्य समजाऊन सांगण्याचा आदेश दिला. फिरऔन अत्यंत घमेंडीत होता पण त्याला मृदू शब्दाने समज देण्याचा सल्ला देण्यात आला होता. त्यांना सांगण्यात आले होते की असे शब्द वापरू नका की ज्याने ऐकणाऱ्याचे मन दुखावले जाईल. रूशादबेटा याला म्हणतात सामंजस्य. इस्लाम धर्मांतरा बाबत जेव्हा बळजबरी करण्यास मनाई करतो तर इतर बाबतीत सक्ति करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. जर एखादा मुस्लिम बळजबरी करीत असेल तर त्यास तो स्वत: जबाबदार आहे, इस्लामला दोष देता कामा नये."

"अगदी बरोबर काका"

"रूशाद आता ऐक, एक गंमत सांगतो तुला, हवालदार साहेब तुम्ही ही लक्षपूर्वक ऐका. जे लोक असे म्हणतात की सर्व धर्म समान आहेत. सत्य आहेत, मग त्यांना सांगा की त्यांनी थोडे दिवस हिंदू राहावे, थोडे दिवस ख्रिस्ती, थोडे दिवस पारशी, थोडे दिवस ज्यू व थोडे दिवस मुस्लिम, बघा ते मान्य करतात कां? खरं सांगायचे म्हणजे असं म्हणणाऱ्याचे मन आतून या विधानास मान्य करीत नाही. कांही चांगल्या लोकांच्या मनांत हा विचार खोलवर रूजला आहे की सर्व धर्म सत्य आहेत. त्यांनी सर्व धर्मातील थोड्या थोड्या तत्वांना एकत्र करून एक मिश्रधर्म लोकांपुढे मांडला आहे. त्यांनी सामंजस्याचे फार मोठे उदाहरण लोकांपुढे मांडले आहे. मात्र लोकांनी त्याचा स्वीकार केला नाही. शहंशाह अकबरची दिशाभूल करून 'दीने इलाही' अकबर शाही लागू करण्यात आला. पण प्रयत्न विफल झाले. कबीरदासने ही जन्मभर असेच प्रयत्न केले व लोकांत सामंजस्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तरी ही सत्य कायम राहिले. सत्यासत्याच्या मुकाबल्यात असत्याचा नेहमीच पराजय झाला आहे, आलं का लक्षात".

"हो काका, आले लक्षांत".

"हे बघ, शाळेत असे बरेच प्रसंग समोर येतील. बरेच शिक्षक, जाणूनबुजून इस्लामबाबत चुकीचे मत प्रदर्शित करतील. तू सामंजस्याने उत्तर देण्याचा प्रयत्न करावा. मात्र देता येत नसेल तर शांत राहायचे व गरज भासल्यास माझा सल्ला घ्यायचा."

"ठीक आहे काका".

त्यानंतर ज़मीर साहेबांनी रूशाद व रजियाला खेळण्याची अनुमति दिली. नंतर हवालदार साहेबांना सांगितले "हे बघा, रूशादबाबत माझा तर्क किती बरोबर सिद्ध झाला. त्याला सत्याबाबत जबरदस्त कळकळ आहे, असत्याबाबत चीड आहे. सत्य जाणून घेण्याची त्याची तळमळ कौतुकास्पद आहे. म्हणूनच मी त्याला शाळेत पाठविण्याचा सल्ला दिला होता. तेथे त्याच्या समोर बऱ्याच असत्य बाबी पुढे येतील व पुढे जाऊन तो मोठया हिंमतीने इस्लामी तत्वाचा लोकांपुढे प्रचार करील. तुम्ही त्याच्याकडून चौकशी करीत रहा की त्याला शाळेत काय शिकवलंय म्हणून.कधी कधी शालेय पुस्तक वाचायला सांगा व लक्षपूर्वक ऐका. शालेय पुस्तकांत बरंच चुकीच्या माहितीचा समावेश केला जातो, असे ऐकिवात आहे. आमच्या बालपणी असले कारस्थान होत नव्हते. हिंदू, मुस्लिम, शीख त्या पुस्तकांचे अध्ययन करीत असत. कुणाच्याच भावना दुखावल्या जात नव्हत्या. उलट चारित्र्य उंचावले जात असे. तसेच शिक्षण आजही दिले जावे अशी कामना करावीशी वाटते."

"जमीर साहेब माझ्या मनांत ही अनेक विचार घुटमळत असतात. आपण अगदी सोप्या शब्दात अत्यंत महत्वाचा विषय समजावून सांगितला. हे काम आपणच करु शकता. अशी काही व्यवस्था व्हायला हवी की शाळेतील सर्व मुस्लिम विद्यार्थ्यांना सुद्धा अशाच प्रकारचे व्याख्यान देता यावे."

"मी पण अशीच काही योजना आखीत आहे. एक योजना माझ्या मनांत आहे. आपण तास दीड तास करिता एक "नाईट स्कूल" कां सुरु करु नये ? आपण असं जाहिर करु की रात्रीच्या शाळेत मोफत शिक्षण दिले जाईल. बरीच मुले शाळेत दाखल होतील. शाळेत मुस्लिम व मुस्लिमेतर सर्व धर्मीय मुलांना प्रवेश खुला असेल. एका अशा शिक्षकाची नियुक्ति करण्यात यावी जो हिंदी भाषेत शिकवू शकेल व इस्लामचे ही त्याला पुरेसे ज्ञान अवगत असायला हवे. या शिक्षकाने निवडक पाठ शिकवावे ज्यात चुकीची माहिती देण्यात आली आहे. शिक्षकाने ते पाठ अत्यंत सौम्य व शुद्ध भाषेत इस्लामिक तत्वांना अनुसरुन विद्यार्थ्यांना समजावून द्यावेत. जेणेकरुन मुस्लिमेतर विद्यार्थी ही जे चुकीचे आहे त्यास चुकीचे मान्य करु लागतील. परंतु असा शिक्षक आणायचा कुठून ?"

"मी अशा शिक्षकाच्या शोधात आहे. शिक्षक मिळताच मी माझ्या घराच्या एखाद्या खोलीत नाईट स्कूल सुरु करुन टाकीन."

"व शिक्षकाचा पगार"

"असा शिक्षक मिळू तर द्या. त्याच्या वेतनाची ही व्यवस्था होऊन जाईल. एखादा इसम पुण्यकार्य समजून मोफत सेवा देण्यास ही तयार होईल."

"ईश्वर आम्हास सुयश देवो." (आमीन).

आशंका

ज्याअर्थी तुम्ही सर्व काही जाणून घेतले आहे व दोघींनी सत्यही स्वीकारले आहे. त्याअर्थी तुम्हास आता सांगायला काही हरकत नाही की दीर्घकाळापासून मी कुठे जात होतो. कोणाशी चर्चा करीत होतो व स्वत: काय करीत होतो. मी सकाळी न्याहारी घेतल्यानंतर नऊ मैल अंतरावरील नूरपूर गांवी जातो. त्या गांवात केवळ मुस्लिमांची वस्ती आहे. त्या गावात एक मशिद आहे. मशिदीचा इमाम सुशिक्षित व्यक्ति आहे. तो मशिदीत पांच वेळा नमाजची इमामत (नेतृत्व) करतो. एक मदरसा (पाठशाला) ही चालवितो. पाठशाळेत त्याच गोष्टी शिकवतो जे मी तुम्हाला सांगत असतो. या सर्व गोष्टी कुरआनांत आहेत. माझ्या तोंडून ऐकून 'सत्य आहे' असे शब्द तुम्ही उच्चारले. मी तुम्हास सांगितलेच आहे की या सर्व गोष्टी ईश्वराने प्रेषित मुहम्मद (स.) यांना फरिश्त्या (देवदूत) मार्फत कळविल्या होत्या व प्रेषित मुहम्मद (स.) यांनी जगातील लोकांना समजावून सांगितल्या. मी पूर्णपणे समाधान करुन घेतले आहे की प्रेषित मुहम्मद (स.) हे ईश्वराचे प्रेषित आहेत. मी तुम्हाला त्यांच्या बाबतीत बरीचशी माहिती दिली आहे. आज मी तुम्हाला त्या गोष्टी सांगेन ज्या मला या आठवडयात इमामसाहेबांनी सांगितल्या आहेत. झाले असे की आज मला कुरआनातल्या कांही गोष्टी ऐकायला मिळाल्या. त्या ऐकून मी सहज बोलून गेलो की "प्रेषित मुहम्मद (स.) यांनी फारच छान पुस्तक लिहून लोकांना दिले आहे." हे वाक्य ऐकून इमामसाहेब दचकले. मी तर प्रशंसेच्या उद्देशाने बोललो होतो. पण त्यांना दचकतांना पाहून मला काहीतरी माझं चुकल्याचा भास झाला. अन् खरोखर मी चुकीचे विधान केले होते."

"त्यात काय चुकलं होतं. मला तुमच्याकडून मिळालेल्या माहितीवरुन मला ही वाटले की प्रेषित मुहम्मद (स.) यांनी खरोखर चांगले पुस्तक लिहिले आहे."

"हाच तर आमचा चुकीचा समज आहे. इमामसाहेबांनी सांगितलंय की प्रेषित मुहम्मद (स.) यांना लेखन वाचन येत नव्हते."

"आश्चर्याची बाब आहे की एक निरक्षर व्यक्तिने इतक्या सत्य गोष्टी साध्या सोप्या शब्दात व्यक्त केल्या आहेत की मनांत खोलवर रुजल्या जातात."

"आणखी ऐका, मी इमामसाहेबांशी वाद घातला. मी त्यांना विचारले, "कुरआन ईश्वरीय ग्रंथ आहे हे खरे आहे काय ?" इमामसाहेबांशी म्हणाले जगातील लेखकानी जी पुस्तके लिहिलीत त्यांचे त्यांनी त्यांच्यात दुरुस्ती करण्याकरिता पुनर्वाचन केले व नंतर ते छापले गेले मात्र प्रेषित मुहम्मद (स.) यांना तसे करावे लागले नाही. जे शब्द त्यांच्या तोंडून वदले गेले ते सुशिक्षित लोकांनी ताबडतोब लिहून घेतले तर कांही लोकांनी मुखोद्गत करुन घेतले. तेच पुढे कुरआन झाले."

"ही तर खरोखर अत्यंत आश्चर्यकारक बाब आहे. मी जेव्हा आजोबांना पत्र लिहिले तेव्हा त्या छोटयाशा पत्राला पुन्हा पुन्हा वाचते व त्यात दुरुस्ती करते. इतका मोठा ग्रंथ जो २३ वर्षात पूर्ण झाला, आजतागायत वाचला जात आहे. मोठमोठे मुस्लिम विद्वान त्याचे वाचन करीत आहे व

कितीतरी इतर धर्मियांनी ही त्याचेअध्ययन केले आहे. आजपर्यंत कोणीही त्यात एकही चूक काढू शकला नाही."

"आशाच्या माते, याच वास्तविकतेने मला मान्य करावे लागेल की हे ग्रंथ ईश्वरीय ग्रंथ आहे व प्रेषित मुहम्मद (स.) हे ईश्वराचे प्रेषित आहेत. प्रेषिता बाबत मी तुम्हाला दोघींना समजाऊन सांगितलेच आहे की ईश्वर त्यांना लोकांच्या मार्गदर्शनासाठी पाठवीत असे व त्यांच्याकडे फरिश्ते (देवदूत) येत असत."

"बाबूजी ती गोष्ट तुम्हाला आठवते कां ?"

"कोणती गोष्ट"

"काही दिवसांपूर्वी एक कवी आपल्या गांवात आला होता. त्याने सुंदरशी कविता ऐकविली होती. सर्व लोक त्याची प्रशंसा करीत होते. दोन तीन महिन्यानंतर माहित झाले की तो कविता चोर होता. दुसऱ्या कवींच्या कविता ऐकून स्वत:चे कौतुक करुन घ्यायचा.

"आशा, त्या गोष्टींची आज आठवण कां ?"

"बाबूजी, मी विचार करीत होते की लोक दुसऱ्यांच्या कविता स्वत:च्या नांवाने ऐकवितात व ख्याति प्राप्त करण्याचा प्रयत्न करतात. मात्र प्रेषित मुहम्मद (स.) यांनी ईश्वराच्या शब्दांना आपले स्वत:चे कथन असल्याचे सांगितले नाही. त्यांनी जर ते कथन त्यांचे स्वत:चे आहे असे सांगितले असते तर ते कोणी नाकारले नसते. यावरुन असा निष्कर्ष निघतो की प्रेषित मुहम्मद (स.) प्रामाणिक तर होतेच पण त्याचबरोबर अनामतदार ही होते. ते (स.) स्वत:च्या नावाऐवजी ईश्वराचे नांव बुलंद करु इच्छित होते."

वीस बावीस वर्षाच्या मुलीच्या तोंडून इतके उदात्त विचार ऐकून आईवडील दंग झाले. आईने तिचे चुंबन घेतले. वडीलही खुश झाले. यानंतर त्यांनी आपसात विचारविनिमय सुरु केला. त्यांनी विचार केला की आम्ही मान्य केले आहे की ईश्वर एक आहे. हे ही मान्य केले की एकेश्वरवाद म्हणजे काय ? आपल्या हे ही लक्षात आले की मूर्तिपूजा न करता निराकार ईश्वराची आराधना करायला हवी व त्याला प्रसन्न करण्याचे प्रयत्न करायला हवे. आपल्या बुद्धिला हे ही पटले आहे की एक दिवस असा येणार आहे की प्रत्येक व्यक्तिला आपल्या कर्मांचा हिशोब आपल्या मालकाला द्यावा लागेल व कर्मांनुसार स्वर्ग वा नरकात प्रवेश मिळेल. प्रेषित मुहम्मद (स) हे ईश्वराचे प्रेषित आहेत या सत्या वर आमचा विश्वास दृढ झाला आहे. आता प्रश्न असा आहे की आपण पुढे काय करायचे?

"ठाकुर, मी सांगू की काय करायचे?

"हो, सांग"

"माझ्या मनात तर असं विचार येतात की आपण सत्य स्वीकारायला हवे."

"याचा अर्थ असा की आपण मुस्लिम व्हायला हवे."

अर्थात, त्याचा अर्थ असाच होतो. कान्ताने आपल्या पतिला म्हटले. ठाकुर मान खाली करून विचार करु लागला. तो हळूच बोलला. मागील किती तरी आठवड्या पासून हाच विचार माझ्या मनात घोळत आहे. माझं मन, माझी बुध्दि, माझा विवेक सर्व आग्रह करीत आहेत की मी इस्लाम धर्माचा स्वीकार करायला हवा. त्यातच माझे कल्याण आहे. मात्र आजपर्यंत मला बऱ्याच गोष्टीनी रोखून ठेवले होते.

"कोणत्या गोष्टींनी तुम्हाला रोखून ठेवले होते?"

"पहली गोष्ट अशी की मी जर मुस्लिम झालो व तुम्ही मुस्लिम झाला नाहीत तर मला तुमच्या पासून विभक्त व्हावे लागले. माझा व तुमचा संबंध तुटला जाईल."

"तुम्ही असा विचार करण्या ऐवजी मी ही इस्लाम धर्म स्वीकारून घेईन असा विचार का करीत नाही."

"व आशा तुझं काय मत आहे."

"बाबा जर तुम्ही मला विचारत असाल तर मी म्हणेन की मी सर्व प्रथम इस्लाम स्वीकारीन कारण माझ्या माहिती प्रमाणे इस्लाम धर्मात स्त्रियांना बरेच हक्क प्राप्त आहेत. आपल्या कडे तर काहीच हक्क दिले जात नाहींत."

"होय, ते तर खरं आहे, मी स्वत: किती तरी गोष्टी या संबंधात तुम्हाला सांगितल्या आहेत. पण मुस्लिम होण्याच्या मार्गात एक मोठी अडचण आहे."

"ती कोणती?"

"ती अडचण अशी की आपला लल्ला अद्याप अज्ञान आहे. आपल्या देशातील कायद्यानुसार जर एखादा मनुष्य धर्मांतर करीत असेल तर त्यांच्या अज्ञान मुलांचा धर्म कायम राहील."

हे ऐकून कान्ता व आशा विचलित झाल्या. "माझ्या लाडक्याला लोक माझ्या पासून हिराऊन घेतील." कान्ताच्या तोंडून शब्द उमटले व ती शांत बसून राहीली.

तिघेजन घरात शांत बसून होते. बराच वेळ शांतता कायम होती. तिघेजन मनातल्या मनांत काही तरी विचार करीत होते. ठाकुरने त्याहून अधिक गंभीर गोष्ट सर्वांसमोर मांडली. त्याने सांगितले.

"दुसरे विघ्न असे की आपल्या देशांत कोणीही धर्मांतर करू शकतो परंतु धर्मांतर करून कोणी मुस्लिम झाला तर त्याचे मूळ धर्मीय लोक दंगल सुरू करतात. जो धर्मांतर करतो त्याला तर त्रास दिला जातोच. इतर मुस्लिमांची प्राणहानी व मालमत्तेचा विनाश केला जातो. जर आपण मुस्लिम झालो व लल्लाला सज्ञान होई पर्यंत एखाद्या सुरक्षित ठिकाणी पाठवून ज्या गोष्टी आम्ही

मान्य केल्या आहेत त्याच गोष्टींचे त्यालाही शिक्षण मिळत राहावे. नंतर आम्ही जाहिर करू की आम्ही धर्मांतर केले आहे. कदाचित आपले भाऊबंद आपले शत्रू होतील व जवळपासच्या गांवातील मुस्लिमांना ही त्रास देतील. नूरपूरचा संपूर्ण विनाश होण्याची शक्यता आहे, कारण मी नूरपूरला जात येत असतो ना."

"ठाकुर तुम्ही जे सांगताय ते खरे आहे, असे होण्याची भीति तर आहेच."

"बाबूजी आपण हे गांव सोडून इतर कुठेतरी जाऊन राहू व नंतर धर्मांतर करु."

"होय आशा, असं करण्यास हरकत नाहीं, मात्र थोडे दिवस वाट पाहावी लागेल."

"ती कां म्हणून?"

"काय सांगू मुली, मी जन्मभर जी कृत्यें केलीत त्यामुळें अद्याप प्रत्येक रात्री पोलीस मला हाक देऊन घराबाहेर बोलावतता व समाधान करून घेतात. जो वर मी हिस्टरी शीटर आहे तोवर असंच चालायचं. मला वाटते अजून पांच सहा महिने शातंपणे घालावावे लागतील."

असे सांगून ठाकुर ने उसासा सोडला. नंतर पुन्हा बोलू लागला "ईश्वराने आम्हाला सरळ मार्ग दाखविला आहे. मला माझ्या जुन्या उपकारकर्त्याला पत्र लिहायलं हवे. तुरुंगवास संपल्यानंतर आज पर्यंत जे परिवर्तन घडून आलंय त्या बाबत संपूर्ण तपशील त्यांना माहित करायला हवा. उत्तर नूरपूरच्या इमामसाहेबांच्या नावांने मागवता येईल."

"ते कोण आहेत?" कान्ता व आशाने एकाच वेळी प्रश्न विचारला. ठाकुरने सांगितले की त्याच व्यक्तीने तुरुंगवासाच्या काळात ईश्वराच्या कायद्याकडे इशारा केला होता. मी त्यांच्या इशाऱ्या नुसार ईश्वरीय आज्ञाचा शोध घेतला परंतु त्यावर अंमल करू शकलो नाही. आता आपण काय करावे या बाबत विचार करतोय."

घरातल्या घरांत त्यांनी निश्चय केला की जोवर त्यांचे उत्तर येत नाही तो वर आपण कोणतीच हालचाल करायची नाही. मात्र त्या तिघांचे मन आंतून मुस्लिम झाले होते.

घरात चर्चा होत होती इतक्यात लल्ला धावत आला. त्यांने येताच बातमी दिली की सरपंचानी बोलविले आहे. ठाकुर उठून उभा राहिला. सरपंचाना जाऊन भेटला. सरपंचाने विचारेल

"तू जमीन विकायला काढली म्हणे"

"होय, विकायची तर आहे."

"कां"

"काका, तुम्हाला तर माहित आहे की मी आता जुना धंदा सोडून दिला आहे. मी पापकृत्यांतून मुक्त होऊ इच्छितो. तरीही येथील लोक मला "दरोडेखोरच" म्हणून ओळखतील. माझ्याकडे वक्रदृष्टीने पाहत राहतील. म्हणून इतर अनोळखी जागेत आश्रय घ्यावासा वाटतो."

"व तुझ्या नांवाचे काय करशील?"

"मी माझे नांव बदलून टाकेन, नावात काय ठेवले आहे. माणसाचे कर्म चांगले असायला हवे."

"ठीक आहे तुला जमीन विकायची असल्यास, मी विकत घ्यायला तयार आहे. दुसरे जितके पैसे देतील त्या पेक्षा एक हजार मी जास्त देईन."

"मी काही लगेच विकत नाही जमीन अजून विक्रीला वेळ आहे."

"कां, वेळ कां लावतोय"

"काका, मी हिस्टरी शीटर आहे माझ्या माथ्यावरून हे कलंक पुसल्या नंतरच मला गांव सोडता येईल. दुसऱ्या ठिकाणीही पोलीसांनी माझा पाठलाग चालू ठेवला तर स्थलांतराचा काय फायदा?"

"तू वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याला कां सांगत नाही"

"मी स्वत: सांगून काय उपयोग?"

"मग कोण सांगेल?"

"काका, तो तर तुमच्याकडे चौकशीकरीत असतो. तुम्ही स्वत: का सांगत नाही. तुम्ही जर शिफारश केलीतर तसाच शेरा वर कळविला जाईल, व माझ्यावरील पाळत ठेवली जाणार नाही."

"ठीक आहे, मी त्याला सांगेन"

"मग जमीन तुमची झाली समझा"

"मला खात्री आहे की तू मला नकार देणार नाहीस. काही म्हणा. तुझ्यांत परिवर्तन घडून आलाय, तू सद्गुणी झालास."

"तुम्हा ज्येष्ठांचा आशीर्वाद व ईश्वराची कृपा आहे."

"खरं बोललास ठीक आहे, जमीनीबाबत लक्षात असूं दे"

"अवश्य, व तुम्हीही इन्स्पेक्टरला माझ्या बद्दल शिफारस करायला विसरू नका."

"जरूर, तू निश्चिंत रहा"

या वार्तालापा नंतर घरी जाऊन ठाकुरने आपल्या पत्नी व मुलीला सरपंचाशी झालेल्या. संवादचा तपशील सांगितला व म्हटलं "ईश्वर कृपेने मी लवकरच दोषमुक्त होईन."

"ईश्वर कृपा करो, असे म्हणत तिने आकाशाकडे पाहिले."

प्रतिक्रिया

समंजस लोक सज्ञान व सुशिक्षित मुलामुलींशी त्यांच्या विवाहबाबत त्यांचे मत जाणून घेणे आवश्यक समजतात मात्र अज्ञान मुलांमुलींचे मत जाणून घेणे त्यांना आवश्यक वाटत नाही. त्यांच्या मतानुसार अज्ञान मुलांच्या विवाहाबाबत त्यांच्याशी चर्चा केल्याने त्यांच्या शिक्षण व वर्तनावर अपपरिणाम घडून येतात. अज्ञान मुलामुलींना विवाहाचे महत्व माहित नसते. त्यांना विवाह का केला जातो हे ही कळत नाही. मात्र त्यांना जेव्हा कळते की त्यांचा विवाह होणार आहे तेव्हा त्यांच्या आनंदाची सीमा नसते मात्र हा आनंद त्याना योग्य वेळे पूर्वी प्राप्त होत असल्याने अपायकारक ठरण्याची शक्यता असते. मुलगा आपल्या मित्रमंडळीना मोठ्या दिमाखाने सांगत सुटतो की त्याचा विवाह होणार आहे. तो विवाहित पुरुषांबरोबर ही चर्चा करतो व त्याला ते सगळे माहित होते जे त्याच्या वयाच्या मुलाला माहित व्हायला नको. तो असे वर्तन करु लागतो, जे त्याच्या पालकांना पसंत नसतात व मग अशी परिस्थिती निर्माण होते की विवश होऊन त्याचे विवाह करावे लागते व ते ही त्याच्या इच्छे प्रमाणे.

असेंच काही मुरशदअली यांच्या पुत्ररत्नाच्या बाबतीत घडले. त्याचे वय १६-१७ वर्षाचे होते. त्याच्या आईच्या मनांत त्याच्या लग्नाची तरंग निर्माण झाली, व तिची नजर पडली ज़मीर साहेबाच्या मुलीवर अर्थात रजिया वर त्यांनी मुरशद अलीपुढे आपली इच्छा प्रदर्शित केली. त्यांनी होकार दिला. राशिद अली खान यांचे ज़मीर साहेबांशी घनिष्ट संबंध होते म्हणून त्यांनाच मध्यस्थाची जबाबदारी सोपविण्यात आली. मुरशदअली यांचा सतत पाठलाग करून त्याच्या पत्नीने त्यांना राशिद अलींना पत्र लिहायला विवश केले. पत्नी हट्टाला पेटली होती व काही करून विवाहसंबंध निश्चित करण्याचा तिने चंग रचला. लग्न उशीरा झाल्यास हरकत नाही. मुरशदअलीच्या पत्राच्या उत्तराने आगामी संकाटची सुरुवात झाली. पत्रातील मजकूर मुरशदअली आपल्या पत्नीवर प्रकट करू इच्छित नव्हते. म्हणून बऱ्याच वेळा पत्नीने विचारणा केली तरी त्यांनी होकार दिला नाही शेवटी एके दिवशी कंटाळून हो आलंय उत्तर असे बोलून गेले.

लगेच पत्नीने विचारले "काय लिहिलय राशिदने?"

"तेच, ज्याची मला अपेक्षा होती"

"याचा अर्थ त्यांनी नकार दिला काय?"

"हो नकारच समज, तुझ्या हट्टामुळे माझा शब्द वाया गेला."

"हे कसे शक्य आहे, राशिद तुमच्या विरुद्ध जाऊच शकत नाही. जरा मला पत्र वाचून दाखवा."

मुरशद अली यांनी खिश्यातून पत्र काढले व पत्र वाचू लागले."

"आदरणीय दादा, प्रणाम (अस्सलाम)

आपले पत्र मिळाले, आपला हाल अहवाल कळाला. ईश्वराची कृपा की आपण सर्व सुखरूप लखनऊला पोहचलात. आम्ही सर्व सकुशल आहोत. आपल्या सर्वांची आठवण येते व

आपल्या सोबत घालविलेल्या क्षणांबाबत नेहमी घरांत चर्चा होते. मी सर्वांना तुमच्या प्रेमळ व आत्मीयतेच्या व्यव्हाराबाबत बऱ्याच गोष्टी सर्वाना सांगत असतो व तुमचे माझ्यावर किती उपकार आहेत याची जाणीव करून देतो. मी तुमचा सदासर्वदा कृतज्ञ आहे व ईश्वराकडे तुमच्या करिता नेहमी शुभकामना करीत असतो.

प्रिय दादा, मी तुमच्या उपकाराने इतका प्रभावित आहे की तुमच्या आज्ञाची अवज्ञा करणे पाप समजतो. तरी ही मी माझ्या विवशते बाबत आपली क्षमा मागतो. आपण चि. अर्शदच्या विवाहाबाबत जे काही लिहलंय ते योग्य वेळे पूर्वीच मांडलेले विचार आहेत. अर्शदचे वय तरी किती झालंय व रजिया तर अजून अज्ञान आहे. मी तर त्यांच्या लग्नाचा कधी विचार ही केला नाही. आताच त्यांच्या विवाह संबंध निश्चित करणे मला विचित्र वाटते. उद्याचे कोणी पाहिले आहे. मुलगी पुढे जाऊन कशी होईल व मुलाचा कल कोणत्या बाजूला असेल सांगता येत नाही. दोघे वयात आल्या नंतरच विवाहाचा विषय सुरु करावा असे माझे मत आहे. रस्ता समतल असतो तेव्हा त्यावर चालताना त्रास होत नाही.

या बाबतीत बहिणींच्या हातून एक चूक घडली. मला आश्चर्य वाटते की एका बुद्धिमान महिले कडून अशी चूक कशी झाली. कदाचित आजाणतेपणात त्यांनी चि. अर्शद समोर ह्या विषया बाबत चर्चा केली असावी किंवा कोणाशी तरी या बाबत बोलतांना त्यांने ऐकूण घेतले असेल. अज्ञान वयात त्यांने स्वत:च्या लग्ना बाबत चर्चा होत असल्याचे ऐकूण जे नको ते परिणाम त्याच्या मनावर घडून आलेत. व ते आमच्या निदर्शनास ही आलेत. एक दिवस तो तुम्हाला न कळवता येथे आला होता व तो रूशादला घेऊन रजिया बरोबर खेळायला गेला होता. त्या दिवसापासून ज़मीर साहेबांनी रजियाला पडद्यात राहण्याचे आदेश दिलेत. रूशाद व रजिया समवयीन व बालमित्र आहेत म्हणून अजून त्यांना खेळण्याची अनुमति आहे. ती ही वर्ष दीड वर्षा पर्यंत. मला वाटते त्यानंतर त्यांना ही एकत्र खेळता येणार नाही. चिरंजीव अर्शद चांगला सतरा वर्षाचा झाला आहे. ज़मीर साहेब त्याच्या सोबत रजियाला कसे खेळू देतील. अर्शदने रूशाद वर बराच दाब आणला म्हणून विवश होऊन त्यांने आपल्या आईला सांगून टाकले व तिने सर्व हकीगत मला सांगितली. मी विषय दाबून टाकला. अर्शदला गोडी गुलाबीने समज देऊन लखनऊकडे परत पाठवून दिले. माझ्या मते अर्शदच्या मनांत अशा विचारांना अधिक उसळू देऊ नये. आपणांस हे तपशील लिहून आपणांस जागृक करण्यांचा प्रयत्न केला आहे. लग्नाच्या बाबतीत योग्य वेळी चर्चा करू व सर्व बाबींचा सारासार विचार करुन निर्णय घेऊ. ईश्वराची दुनिया छोटी नाही. सर्वांना माझा सलाम व आशीर्वाद कळवावा.

आपला हाल अहवाल अधून मधून कळवीत राहावे.

आपला विनम्र

राशिद

पत्र वाचून संपल्यानंतर मुरशदअली खान साहब ने आपल्या पत्नीला उद्देशून म्हटले की अर्शदने तेथे जायला नको होते. त्यांने तर मला बतावणी केली की तो दोन दिवसा करिता सहलीला जात आहे. मला काय ठाऊक की तो सहलीच्या निमित्ताने तेथे जाऊन मूर्खपणाचे काम करील व आपल्याला खजील व्हावे लागेल.

मुरशद अली शांत झाल्या नंतर रईसा सुलतानाने उच्छवास दिला. रईसा सुलताना अर्थात मुरशद अली खान ची पत्नी उच्च खानदानातून आली होती. हुशार व अत्यंत चालाक बाई होती. मुलाने केलेल्या कृत्याने ती चिंतित झाली. तरीही "अजून लहान आहे" असे सांगून पत्रे उत्तराने भडकलेल्या भावनाना सांत्वन दिले व आपलंच चुकलं असे मान्य करून राशिदने त्यामुळेच अपेक्षेविरुद्ध नकारात्मक उत्तर दिले असे विचार मांडले. निश्चितच मला अशी आशा नव्हती मात्र त्याच्या आड मी सांगितले तेच कारण होते."

"हेच ना की राशिद रजियाला स्वत:ची सून करू इच्छितो."

"हो, मलापण असेंच वाटते. त्या साठीच मी तिकडे लक्ष देत नव्हतो. पण तूच हट्ट करून पत्र लिहायला लावले व आपल्याला असले उत्तर मिळाले."

"मग तुम्ही मूग गिळून गपचुप बसून राहणार आहात व राशिदचे सानंद अभिनंदन करणार आहात काय?"

"मी म्हणतो, कशाला या भानगडीत पडायचे. तेथे माझे मन ही रमत नाही. त्यांची आवड निवड आपल्या सारखी नाही. सोडून दे त्यांचा नाद."

"सोडायला काय, सोडून दिले असते. पण आता तर विटा चे उत्तर दगडाने द्यावे लागेल. राशिदने चांगल्याच गोड शब्दात आपली नालस्ती केली आहे."

"मग सांग आता मी काय करु."

"मी असे करते की ज्यांना मी अर्शीच्या विवाहाबाबत खुशखबर दिली होती त्यांना कळवून टाकते की अर्शी करिता दुसरे स्थळ निश्चित झालंय."

"चुकीची बातमी दिल्याने पुढे आपली जास्तच नालस्ती होईल. खबरदार जर असं काही केलेस तर."

"अहो मी तुम्हाला सांगितले नाही की शेजारच्या बऱ्याच लोकांना मी सांगून टाकलंय की तुम्ही अर्शी करिता स्थळ निश्चित करून टाकलंय. आता काही करून परिस्थिती सांभाळून घ्यायला हवी."

"हत्तिच्या, काय हट्टी बाई आहेस तू, कर तुला काय करायचे ते, मला माफ कर."

"असं बोलून कसं चालेल तुम्हालाच हे प्रकरण हाताळावे लागेल. गोड बोला किंवा लाडागुडी करा, जे जमेल ते करा"

"अरे, यशाची आशा असेल तर ना"

"मी तुम्हाला चांगलं ओळखते. अहो एकदा तुम्ही मनावर घेतलं की काम फत्ते झालेच समजा."

"अहं, मी वचन देत नाही, प्रयत्न करीन."

"तुम्ही प्रयत्न करेन असे म्हटले म्हणजे मला वचन मिळाल्या सारखे आहे. मी संतुष्ट झाले."

"संतुष्ट झाली म्हणजे काय?"

"हेच की राशिदने जे बिनधास्त उत्तर दिले आहे त्याचे त्यांना यथायोग्य उत्तर मिळायला हवे."

"मी काही सांगू शकत नाही"

"मला माहित आहे तुम्ही काही करण्यापूर्वी सांगत नाही, जे करायचे ते केल्यानंतर सांगता."

"तू पण तसच वागायला हवं होत पण.."

"असो, चूक झाली आता पुढे काय करायचे त्याचा विचार करा."

"बरंय आता झोपू दे"

"झोपा की"

"धन्यवाद.. शुभरात्री"

****

चारित्र्याची छाप

"रूशाद" "जिंदाबाद"

"हिंदू मुस्लिम शिख, इसाई भाई भाई

"एकता" "जिंदाबाद"

"सक्सेना हायरसेंकडरी स्कूल" "जिंदाबाद"

"रशाद" "जिंदाबाद"

हवालदार रोशिद अली खान हे जमीरसाहबांशी "विधवासेवाश्रमा" बाबत विचार विनिमय करीत होते. रजिया मुन्नीशी खेळत होती. मरियम पण तेथेच आली होती. अचानक घोषणा ऐकू येऊ लागल्या. "रूशाद जिंदाबाद" ची घोषणा ऐकूण सर्व आश्चर्यचकित झाले. "काय झाले" एकाच वेळी सर्वांच्या तोंडून शब्द निघाले. हवालदार व ज़मीर साहेब उठून उभे राहिले. दोघे घराबाहेर पडले. सक्सेना हायर सेंकडरी स्कूल चे मुख्याध्यापक श्री सक्सेना यांच्या नेतृत्वात एक मिरवणुक त्याच बाजुला येत होती. शाळेतील शिक्षक व विद्यार्थी तसेच सर्वच धर्माचे लोक मिरवणुकीत सामील होते. रूशाद त्याच्या शिक्षकांच्या मध्यभागी होता. त्यांच्या गळ्यात पुष्पहार दिसत होते. काही पुष्पहार त्याच्या हातात ही लोंबकळत होते.

मिरवणुकीतील लोकांनी ज़मीर साहेब व हवालदार साहेबांना समोर उभे असल्याचे पाहून घोषणांचा आवाज आणखी वाढवला. घरासमोर उभे असलेले दोघे मित्र आश्चर्याने त्या सर्वांना पाहत होते. घराच्या मुख्यदारातून दोघी स्त्रिया मिरवणुकी कडे मोठ्या उत्सुकतेने बघत होत्या. रजिया मुन्नीला घेऊन दारा बाहेर आली व वडीलांजवळ येऊन उभी राहिली.

"आई ! आई! बघ बघ रूशादच्या गळ्यात फुलांचे हार आहे व खूप लोक येता हेत." ती ओरडली.

मिरवणुक ज़मीर साहेबांच्या घरासमोर येऊन थांबली. ज़मीर साहेब पुढे आले व हेडमास्तरांशी हस्तांदोलन केले. हवालदारांनी ही हस्तांदोलन केले. त्यांनी विचारले "सर, मिरवणुक कशासाठी निघालीय?"

सक्सेना साहेबांनी त्रिपाठी यांना मिरवणुक परत घेऊन जाण्यांचा इशारा केला. इतर शिक्षकांसह ते तिथेच थांबले. ज़मीर साहेबांनी सर्वांसाठी बसण्याची व्यवस्था केली. रूशाद घरांत गेला. त्याला पाहून रजिया खूपच खुश झाली होती. ती पुन्हा पुन्हा पुष्पहाराना स्पर्श करून बघत होती. रूशादने एक दोन पुष्पहार तिच्या गळ्यात टाकून दिले.

"इश्श, रजिया चटकन मागे सरकली. नंतर मुल्लानीबी व मरियम तिला घेऊन वरांड्यात खाटेवर बसल्या. मुल्लानीबी ने रज़ियाला सांगितले "पोरी, आग पेटव व पाणी गरम कर, शाबास" नंतर रूशादला विचारले की काय हकीगत आहे. तो सांगायला लाजत होता. म्हणून त्या दोघीं

खिडकी जवळ येऊन उभ्या राहिल्या व पडदा बाजूस सारुन ऐकू लागल्या. सक्सेना म्हणत होते. "आम्हाला अभिमान वाटतो की रूशाद साहब सारखा विद्यार्थी आमच्या शाळेत शिकत आहे. आज ह्याने जे कार्य केले आहे ते आमच्याने ही होत नव्हते. आम्ही भयभीत झालो होतो की शाळेत दंगल होते की काय? ईश्वराने मोठी कृपा केली. या सत्यवादी मुलाने वैमनस्याची आग कायमस्वरूपी विझवून टाकली. आम्ही आपले आभारी आहोत की घरात रूशादला जे आपल्या कडून मार्गदर्शन मिळाले आहे त्याच्या प्रभावाने हे महत्त्वपूर्ण कार्य तो करू शकला. तुम्हाला तर माहीत आहेच की हल्ली शाळेत कशा प्रकारचे वातावरण आहे. तुमच्या आमच्या बालपणी शाळेत जे परस्पर सामंजस्याचे वातावरण होते ते आता राहिलेले नाही. शिक्षकांना मुलांची चिंता नसते व मुलांना आपल्या शिक्षकांबद्दल आदर नसतो. रोजच कोणत्या न कोणत्या कारणामुळे वादंग निर्माण होत असते. काही राजकीय चळवळींना व सांप्रादायिक तत्वांना आयती संधि प्राप्त होते. आपल्या उद्देशांच्या पूर्तिसाठी, ते मानवतेला काळीमा फासायला तयारच असतात.

ज़मीरसाहेब व हवालदार साहेब सक्सेना शुद्ध उर्दू भाषेत बोलत होते व विस्मित होऊन लक्षपूर्वक ऐकत होते. सक्सेना साहेबानी थोडे थांबून पुन्हा बोलायला सुरुवात केली. "तुम्ही आज काय घटना घडली हे जाणून घेण्यास उत्सुक असाल. तुम्हाला माहीतच आहे की हल्ली मुलांची मानसिकताच बिघडत चालली आहे. मी जर असे म्हटले की जाणून बुजून बिघडविण्यात येत आहे तर ते चुकीचे होणार नाही. झाले असे की रमेश नावांच्या मुलाचा पेन हरवला होता. झडती घेतल्या नंतर कादर कडे सापडला. रमेश लगेच म्हटला "हा तर माझाच आहे" पण कादर म्हणाला "मुळीच नाही, हा पेन माझाच आहे" प्रकरण वर्ग शिक्षकाकडे पोहचले. वर्गशिक्षक एकेकाला बोलावून विचारत होते. इतक्यात मध्यांतर झाले. मुले शाळे बाहेर पडली. पाहता पाहता मुले दोन गटांत विभाजित झाली. एक मुस्लिम मुलांचा दुसरा हिंदु मुलांचा. नंतर आम्हाला समजले की दोन्ही गटात दंगा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ही बातमी मिळताच मी त्वरित मध्यांतर संपल्याची घंटी वाजवून दिली. व स्वत: प्रकरणाबाबत चौकशी करू लागले. कादर व रमेशला मी माझ्या कार्यालयात बोलावून घेतले व शिक्षकांना मुलांवर कडक नजर ठेवायला सांगितले. रमेशने मला विनंति केली की रूशादला बोलावून शहानिशा करून घ्या. मी त्याला बोलविण्यासाठी शिपाई पाठविले तो नमाज पढायला गेला होता. तो रोजच मध्यांतरच्या वेळेत मशीदित नमाजसाठी जातो. आज इतरही मुले मशीदीत गेले होते. माझ्या लक्षात आले की मुस्लिम मुलें मशिदीत का गेली असावीत.

मशीदीत गेलेल्या मुलांनी रूशादला कादरची बाजू घ्यायला सांगितले. ते म्हणाले कादर मुस्लिम आहे व आणि सर्व मुस्लिमांनी कादरची बाजू घ्यायला हवी.

"पण मला माहित आहे की पेन रमेशचा आहे व तो कादरने चोरला आहे." रूशादने त्यांना उत्तर दिले.

"तुला मुस्लिमांबद्दल सहानुभूति नाही कां?

"नक्की आहे!" "मग मुस्लिमांची बाजू घ्यायला हवी." "मी इस्लाम विरुध्द एक शब्द बोलणार नाही. पण मला प्रथम सांगा की इस्लाम बाबत तुम्हाला किती ज्ञान प्राप्त आहे, म्हणजे मला विचारायचे आहे की मुस्लिम कोणास म्हणतात."

"वाह माहित कसे नाही, जो मुस्लिमांच्या कुटूंबात जन्म घेतो तो मुसलमान "मुलांनी मोठ्या थाटात उत्तर दिले. रूशाद म्हणाला "नाही, जो ईश्वरावर श्रध्दा ठेवतो व प्रेषित मुहम्मद (स) यांचे अनुकरण करतो व अंतिम दिनावर (कयामत) वर विश्वास करतो व ईश्वराच्या आज्ञे प्रमाणे व प्रेषित मुहम्मद (स) यांच्या उपदेशाप्रमाणे जीवन व्यतीत करतो त्याला मुस्लिम मानायला हवे. प्रेषित मुहम्मद (स) यांनी म्हटले आहे की जो खोट्याची बाजू घेऊन दुसऱ्यांशी भांडेल तो आपल्यातला नाही (अर्थात मुस्लिम नाही) प्रेषित (स) यांनी खोटी साक्ष देण्यांस अनेकेश्वरवादा समान गुन्हा मानला आहे."

रूशाद कडून वरील व्याख्या ऐकल्यानंतर मुले वरमली. सर्व मुलांनी पश्चात्ताप व्यक्त केला व सर्वांनी निश्चय केला की ते कादरची बाजू घेणार नाही. शकील नावांच्या मुलांने मला हा उपरोक्त तपशील दिला. नंतर रूशाद माझ्या कार्यालयात आला व म्हणाला.

"मी कादरशी दोन शब्द बोलू इच्छितो." मी त्याला परवानगी दिली. रूशादने कादरला बाहेर नेले. नंतर मला कळाले की ज्या प्रमाणे मशिदीत रूशादने मुस्लिम मुलांना समज दिली होती तशीच समज कादरला ही दिली. रूशादने समज दिल्यानंतर कादर माझ्या समक्ष येऊन उभा राहिला. त्याचे डोळे पाणावलेले होते. तो रडू लागला व मान्य केले की सैतानाने त्याला वाम मार्गाला लावले होते. मी खोटं बोललो. खरं म्हणजे पेन रमेशचाच आहे व मी चोरी केली आहे. मला शिक्षा व्हायला हवी."

कादरच्या कबूली जवाबाने मी गद्‌गद् झालो. त्याला आपल्या बाहुपाशात आवळून घेतले. नंतर टेबलावर ठेवलेला पेन रमेशला देऊ लागलो. रमेश इतका प्रभावित झाला की त्याने पेन कादरला देऊ केले. दोघांनी एकमेकास मिठी मारली. कादर पेन घेत नव्हता पण मी त्याला घे म्हणून सांगितल्यावर त्यांने सहर्ष स्वीकारला. नंतर मी माझ्या कडील एक सुंदरसा पेन त्याला बक्षिस म्हणून देऊ केले."

अशी आहे आजची घटना जर रूशादही सांप्रदायिक विचाराचा असता तर मारामारी व दंगल झाल्या शिवाय राहिली नसती. कांही राजकारणी मंडळीपर्यंत ही बातमी पोहचली होती व त्यांच्या विद्ध्वसंक हालचाली सुरू झाल्या होत्या. मी कार्यालयाबाहेर पडलो व शिक्षक व विद्यार्थ्यांना वस्तूस्थिति अवगत करून दिली तेव्हा सर्वांनाच आनंद झाला व अनिष्ट चिंतकांचा हेतु बारगळला गेला.

रूशादने महत्वाची भूमिका बजावली होती म्हणून आम्ही ही बाब सर्वांसमोर आणण्याचे ठरविले त्रिपाठींनी मिरवणुकीचे आयोजन केले व बातमीपत्रा करिता एकूण घटना कथनकाच्या स्वरुपात लिहून टाकली. कमाल साहेबांनी घटनेचे नाटकात रूपांतर केले. मी आपले अभिनंदन करतो की ईश्वराने आपणास असा सुपुत्र दिला आहे व आपण त्याला अत्यंत सुरेख वळण लावले आहे. मला विश्वास आहे की तुम्ही जी शिकवण त्याला दिली आहे ती जर सर्वत्र पसरली तर समाज संघर्ष मुक्त होईल. मला इस्लाम बाबतचे एखादे पुस्तक अध्ययनासाठी देण्याची कृपा कराल कां? मला उर्दू लिहिता वाचता येते. पुस्तक उर्दू असले तरी मी समजू शकेन."

"ईश्वराची लीला आहे, ज़मीर साहेब व हवालदार साहेब एकत्र उद्गारले. विषय संपला होता. सक्सेनाजी जाऊ लागले. तेवढ्यात रूशाद खोलीतून बाहेर आला व ज़मीर साहेबांच्या कानांत काहीतरी कुजबुजला व निघून गेला."

"चहा तयार आहे, कृपया चहा घेऊन जा"

ज़मीर साहेबांनी सक्सेनाजीना विनंती केली. सक्सेनाजीने विनंति मान्य केली. रूशाद चहा घेऊन आला. सोबत काही फळ व बिस्किट वगैरे ही होते. सक्सेनाजी नको नको म्हणत होते पण ज़मीर साहेबांच्या आग्रहास्तव त्यांनी काही फळ व बिस्किट ग्रहण केले. चहा घेतल्यानंतर सक्सेनाजीने ज़मीर साहेबाची आज्ञा घेतली व आपल्या शिक्षक मंडळीसह शाळेकडे रवाना झाले. जाता जाता त्यांनी जाहिर केले की आज रात्री कमाल साहेब लिखित नाटक दाखविण्यात येईल. कृपया सर्वांनी उपस्थित राहावे."

❋❋❋❋

लल्ला

"दीड महिना उलटून गेला. अद्याप उत्तर आलेले नाही. मी रोज चौकशी करते. तुम्ही आले नाही म्हणून सांगता. पत्रावर पत्ता तर बरोबर लिहिला होताना?"

कान्ताने ठाकूरला घरात प्रवेश करताच प्रश्न विचारला. ठाकूरने खिशातून एक पाकिट बाहेर काढले."

"पत्र आलेग, पत्ता बरोबर लिहिला होता. मी एक गोष्ट सांगायला विसरलो. मी ज्या काळात तुरुंगात होतो त्याच काळात त्यांची बदली झाली होती. माझे पत्र धक्के खात खात त्यांच्या पर्यंत पोहचले. ही बाब त्यानी मला कळविली आहे. त्यांनी आपल्या पत्रात सविस्तर वर्णन दिले आहे. ते वर्णन मी तुला नंतर सांगेन. सद्या त्यांनी दिलेल्या सल्ल्या बाबत बोलू या विशेषत: लल्ला बाबत चर्चा करण्याची गरज आहे. त्यांनी सांगितले की लल्लाच्या मनात शिक्षणाची गोडी निर्माण करुन त्याला शांति-निकेतन म्हणजे कलकत्ता येथे पाठवून द्या. शांतिनिकेतन येथे डॉक्टर अहमद साहब नावांचे त्यांचे मित्र आहेत. त्यांच्या देखरेखीत त्याला चांगले शिक्षण प्राप्त होईल. डॉक्टर साहेब अत्यंत जबाबदार व्यक्ति आहेत. त्यांना आपल्या सर्व अडीअडचणीची कल्पना द्यायला हवी. त्यांना संपूर्ण हकीगत माहित झाल्यानंतर ते लल्ला वर योग्य प्रकारे लक्ष ठेवतील.

पत्रात त्यांनी म्हटलंय की लल्ला बाबत त्यांची सूचना मान्य असल्यास तस त्यांना त्वरित कळविण्यात यावे. ते लगेच डॉक्टर साहेबांना शिफारशीचे पत्र पाठवून देतील, म्हणजे त्या प्रमाणे ते सारासार विचार करुन योग्य तो सल्ला देतील. आता तू सांग, तू लल्लाला शांतिनिकेतन येथे पाठविण्यास तयार आहेस ना?

"त्याला दूर पाठवायचे म्हणजे मला कसं तरी वाटतंय, पण त्याला दूर पाठवावेच लागेल !"

"ते कां बरे?"

"तुम्हीच नाही का सांगितले होते की, आपण जर धर्म परिवर्तन केले तरीही आपली अज्ञान मुले आपल्या मूल धर्मातच राहतील असा देशात कायदा आहे. जोवर ते सज्ञान होत नाहीत तोवर त्यांना धर्म परिवर्तन करता येणार नाही म्हणून मी म्हणते जाऊ द्या त्याला शांतिनिकेतनला. त्यातच त्याचे भलं आहे. बरं मला हे तर सांगा की तिथे त्याला किती खर्च द्यावा लागेल. खर्च आपल्या आवाक्या बाहेर तर नसेलना?

"हो या बाबत ही त्यांनी लिहिलंय. त्यांनी म्हटलंय खर्चा बाबत विचार करू नका. डॉक्टर साहेब मोठे दिलदार आहेत. लल्लाचे पालन पोषण व इतर सर्व खर्च स्वत:च सांभाळून घेतील. आपल्याला या बाबत काडीमात्र चिंता करण्याची गरज नाही. मी पहारेकऱ्याला सांगून टाकतो की मी एका आठवड्यासाठी कलकत्याला जात आहे व गांवकऱ्यांना कळवितो की लल्ला आता शांतिनिकेतन येथे पुढील शिक्षण घेणार आहे.

"लोकांना आश्चर्य वाटेल नाही कां?"

"निश्चितच त्यांना आश्चर्य तर वाटणारंच"

"ईश्वर, तुम्हाला पोलिसांच्या रोजरोजच्या कटकटीतून मुक्त करो. तुम्हाला रात्री निश्चिंतपणे झोपता यावे. नंतर आपण अशा ठिकाणी स्थायिक होऊ जेथे आपल्या सर्व कुटूंबियाशी लोक आत्मियतेने वागतील."

"हे सर्व ईश्वराच्या कृपेने घडून आले आहे. तोच आपला सृजनकर्ता व पालन करणारा आहे."

"आज तुम्ही लल्लाला विचाराल ना?"

"होय, मी त्याला समजाऊन सांगेन"

"तुम्ही त्याला इतकी सूट देऊन ठेवली आहे जणु तो तुमचा काहीच लागत नाही. त्याच्याशी प्रेमाचे दोन शब्द कां बोलत नाही?"

"आज मी सारे प्रेम त्याच्यावर ओथंबून टाकेन."

पति-पत्नीत गप्पा होत होत्या. आशा ही सर्वकाही शांतपणे ऐकत होती. मात्र ती मनातल्या मनात विचार करीत होती "ते किती चांगले लोक आहेत!"

अचानक लल्लाने घरात प्रवेश केला. घराच्या एका कोपऱ्यात "विट्टी दांडू" पडले होते. त्यांने ते पटकन उचलले व बाहेर जाऊ लागला. वडिलांनी त्याला हांक मारली. "अरे लाडक्या लल्ला"

लल्ला गाडीला ब्रेक लागल्या समान गचकन थबकला त्याने वडिलांकडे पाहिले.

"ये पोरा माझ्या जवळ बस"

"लल्लाला वडिलांच्या स्वरांत आज नाविन्य अनुभवास येत होते. त्यांने विट्टीदांडू बाजूला टाकून दिले."

"बेटा, इकडे ये, तुझ्या कडे बूट नाहींत ना? लल्लाला आठवले त्याने राजन बाबूच्या मुलामुलींकडे सुंदर बूट व चपला असल्याचे सांगितले होते व त्याला ही तसे बूट घ्यावेसे वाटते अशी इच्छा प्रगट केली होती. वडील त्या दिवशी संतापले होते. आज ते स्वत:च बुटांबाबत बोलत होते. तो हळूच वडिलांजवळ येऊन उभा राहिला. वडिलांनी त्याला प्रेमाने आपल्या जवळ बसवून घेतले. त्याला आज पर्यंत वडिलांनी इतक्या प्रेमाने जवळीक दिली नव्हती. त्याला वडिलांच्या स्पर्शात ही वेगळ्याच आनंदाचा अनुभव होत होता.

वडिलांनी विचारले बेटा, तुला लिहिणं वाचनं शिकावंसे वाटत नाही कां?

"ऊहू मला नाही शिकायचे"

"कारे बाबा, कां शिकावेसे वाटत नाही तुला?"

"शिकलेली माणसे खराब असतात?"

"असं कसं बोलतोस, लेका!"

"तुम्ही बघा, राजन बाबू, रमेश भैय्या हे आपल्या गावांत सर्वात जास्त शिकलेली माणसे.

राजनबाबू तर पंचायतीचे मेंबर झालेत. ते दिल्लीला जातात. मोठ्या खोलीत राहतात त्यांनी गजू राजधरला त्या दिवशी खूप बदडले व सामानासह स्टेशनवर घेऊन गेले. फार वाईट आहेत राजनबाबू रमेश भय्या बी.ए. पास आहेत. केदारी म्हणत होता रमेश भय्या गरीबांना खूप छळतो. अत्यंत निर्दय आहे तो बाबा, मला असे काही नाही करायचे."

लल्लाला बोलण्याची संधी मिळाली होती. तो मनसोक्त बोलत होता. सर्वच त्याचे बोलणे लक्षपूर्वक ऐकत होते. त्याचे बोलणे संपताच ठाकूर म्हणाला.

"तसले शिक्षण न घेता एक चांगला माणूस होण्यासाठी तर शिकशील ना?"

"चांगले शिक्षण कुठे दिले जाते?"

"त्या करिता तुला कलकत्त्याला जावे लागेल."

"कलकत्त्याला?"

लल्लाने कलकत्त्या बाबत खूप ऐकले होते. कलकत्ता मोठे शहर आहे. तेथे मोठे समुद्र आहे. समुद्रावर मोठमोठ्या बोटी तरंगतात. त्याला बोट पाहण्याची खूप इच्छा होती. तो उद्‌गारला.

"कलकत्त्याला ? मी जाईन तेथे."

"रेल्वेने प्रवास करावा लागेल." हे ऐकूण त्याचा आनंद द्विगुणित झाला.त्यांने रेल्वे ट्रेन पाहिली नव्हती त्याला रेल्वेने प्रवास करावयाची हौस होती. तो लगेच म्हणाला मी कलकत्त्याला जाईन"

"तेथे जाऊन घरी परतण्याचा हट्ट तर करणार नाहींस ना?"

"घराची आठवण आली की धाऊन परत येईन."

"पळून येशील? मग शिकशील कसा?

"सुट्यां मिळत नाहीं कां?"

"मिळतात तर ! मग मन लाऊन शिकशील नां?"

"होय, खूप मनापासून शिकेन."

"मग सांग बरे कधी जायचे?"

"तुम्ही सांगाल तेंव्हा!"

मग लाग तयारीला, तुझ्या करीता काही कपडे शिऊन घेतो. तुला बूट ही घेऊन देतो. टोपी व पुस्तकांसाठी बॅग सुध्दा हवीना!"

हे सर्व ऐकूण लल्लाचा आनंद गगनांत समावेना. त्याला इतका आनंदीत कोणीच पाहिले नव्हते. तो उठला विट्टी दांडू उचलली व चुलीत टाकून दिले. परत आला व म्हणाला यापुढे मी विट्टीदांडू खेळणार नाही.

ठाकूर व घरच्या इतर सदस्यांना आनंद झाला. एका समस्येचे समाधान झाले. सर्वांनी ईश्वराचे उपकार मानले.

पुढचे पाऊल

पत्नीशी चर्चा केल्या नंतर मुरशदअली खान साहेबाने आपल्या मुलाच्या विवाहाबाबत पुन्हा पुन्हा विचार केला. विचारांती त्यांच्या लक्षात आले की भावाने दिलेला सल्ला योग्य आहे. त्यांना ही पटले की आता लगेच अर्शीच्या लग्नाबाबत ज़मीर साहेबांशी बोलणी करणे योग्य होणार नाही. विवाहाबाबत विषयारंभ केल्यास ते कदाचित नकार देतील. ते म्हणतील रजिया अजून लहान आहे. तिचे खेळण्याचे व शिक्षण प्राप्त करण्याचे वय आहे. त्यांचे हे उत्तर म्हणजे नकारच ठरेल व नंतर हा विषय पुन्हा छेडता येणार नाही. दोन तीन वर्षानंतरच त्यांच्याशी या विषया बाबत बोलणी करणे योग्य ठरेल. या कालावधीत अर्शीच्या मानसिकतेत बदल होईल किंवा होणार नाही मात्र त्याचा चेहरा व वर्तन मुस्लिमांसारखे दिसू लागतील असे प्रयत्न करता येतील. चार दोन मुस्लिमांच्या सोबत बसून इस्लाम बाबत चर्चा करू लागला की त्याच्या बद्दल लोकांचे मत बदलता येईल. मुरशदअली खान यांनी या बाबत अर्शी बरोबर चर्चा करण्याचा निर्णय घेतला. एके दिवशी त्यांनी आपल्या मुलाला बोलावून चर्चा सुरु केली.

''हे बघ मुला, आता तू काही लहान राहिला नाहीस. आता तुझ्याशी तुझ्या भावी जीवनाबाबत चर्चा करायला हवी. मला तुझ्या भावी जीवनाबद्दल बरेंच निर्णय घ्यावयाचे आहेत. पहला प्रश्न असा की तू उदरनिर्वाहाचा कोणता मार्ग स्वीकारणार आहेस. जर तुला शिक्षक व लिपिक व्हायचे असेल तर त्या करिता आवश्यक शिक्षण प्राप्त करायला हवे. जर डॉक्टर वा इंजिनियर व्हायचे असेल तर त्यानुसार अभ्यासक्रम निवडावा लागेल. जर तुला एखाद्या कंपनीत नोकरीस लागायचे असेल तर बी. कॉम. केल्यास चालेल. मला तुझे मत हवंय. तुझ्या मतानुसार मग बाकीची व्यवस्था करता येईल.

दुसरं असं की मी माझ्या जीवनकाळांतच तुला विवाहबद्ध करु इच्छितो. माझ्या गैरहजेरीत तू आपल्या मर्जीनुसार एखाद्या घराण्याशी संबंध जोडशील व स्वत:चे जीवन कष्टमय करून घेशील. वाटेल तेवढ्या मुली लग्नासाठी मिळू शकतील. एकाहून एक सुंदर मुलीचे स्थळ शोधता येतील. मात्र माझ्या मते वैवाहिक जीवन यशस्वीरित्या व्यतीत करण्यासाठी इस्लामी शिक्षण प्राप्त असलेली मुलगीच निवडावी. ती पावित्र्य व स्वच्छतेकडे लक्ष देईल. ती पतिव्रता व कुटूंबातील वडीलधारी सदस्याचा आदर व सेवा करणारी असेल. त्याच बरोबर तिने आपल्या कुटूंबाला साजेशे शिक्षणही प्राप्त केलेले असावे. तुझ्या आईने तुला जे तीन चार वर्षानंतर सांगायला हवे होते ते आत्ताच सांगून टाकले आहे. आता तुझे वय सतरा अठरा वर्ष असेल. या वयात तुला लग्ना बाबत योग्य अयोग्य विचार करता येणार नाही. या वयात चुकीचा निर्णय घेण्याचे भय असते. असो, तुझ्या आईने तुझे लग्न ज़मीर साहेबांच्या मुलीशी म्हणजे रजियाशी करण्याची आयोजिले आहे. तुला ही मुलगी पसंत आहे असे माझ्या लक्षात आले आहे. तू तिला भेटण्यासाठी गेला होतास. हल्ली कॉलेजातली मुलंमुली स्वत:च्या जीवन साथीची निवड स्वत:च करू लागले आहेत. मात्र मुस्लिम समाजात अजून इतका बेशिस्त पणा आलेला नाही. तुला जर रजिया पसंत असेल तर तू तिचा पति होण्यास पात्र व्हायला हवे. निदान ज़मीर साहेबांच्या नजरेत तू योग्य वर आहेस अशी

दर्शनी पात्रता तरी तू अवगत करायला हवी. आता तुला निर्णय घ्यायचा आहे व त्याप्रमाणे मी प्रयत्न करीन. तुला या सर्व गोष्टी सांगण्यास तुझ्या आईने मला विवश केले आहे. आमचं म्हणणे असं आहे की लग्न चार वर्षानंतर झाले तरी चालेल, मात्र स्थळ आताच निश्चितच व्हायला हेव. रजिया हातातून जाता कामा नये. मग लाग आता कामाला. मी एक दोन दिवसात बरेलीला जाऊन राशिद मार्फत ज़मीर साहेबांना राजी करण्याचा प्रयत्न करीन."

मुर्शिदअलीनी मुला समोर सर्व गोष्टी स्पष्टपणे सांगून टाकल्यामुळे पाश्चात्य संस्कृतीत वैध मात्र पौर्वात्य संस्कृतीत अभद्र व अवैध मानल्या जाणाऱ्या बाबीचा उल्लेख करण्याचे मुलगा धैर्य करू शकत नव्हता. तो वडीलांना म्हणाला.

"बाबा, ज़मीरसाहेब रज़ियाचा विवाह रूशादशी करू इच्छितात व राशिदकाकांचीही हीच इच्छा आहे. याच कारणास्तव राशिद काकांनी मला बरेलीत दोन दिवस ही थांबू दिले नाही. लगेच परत जा म्हणून सांगितले.

"बेटा, तुला हेही माहित झाले ना? तुझ्या आईने सांगितले असणार ! चांगली शिकवण आहे तुझ्या आईची ! लवकरच चांगल्यापैकी तरबेज होशील.

अर्शीने वडीलांचा रागिष्ट चेहरा पाहून हळूच तेथून काढता पाय घेतला व लगेच आईला सर्व माहिती दिली. आई संतापली "अरे कारट्या तू वडिलांना हे सर्व कशाला सांगितलेस?" रईसा सुलताना तणतणून उठली व आपल्या पतिच्या खोलीकडे गेली. पतिच्या चेहऱ्यावरील शिरा अजून ताणलेल्या होत्या. तिने हळूवारपणे म्हटले "घ्या, पानाचा विडा" व पानांची डबी त्यांच्या पुढ्यात केली. मुरशद अलीने पान तोंडात कोंबले व बोलू लागले "बरं झाल तू आलीस मला काही गोष्टी सांगायच्या आहेत."

"सांगा, मी समोरच विराजमान झाली."

"हे बघ तू अर्शीला रजिया बाबत जे काही सांगितले आहे ते योग्य नव्हते. या कोवळ्या वयातच अर्शीच्या मनांत रूशाद विषयी द्वेष निर्माण होईल व रागाच्या भरात तो काय करेल याचा नेम नाही. तो त्याला ठार मारायला सुध्दा तयार होईल. मी पोलीस खात्यात नोकरी केली आहे. माझ्या समोर असली बरीच प्रकरणे येऊन गेलीत. फार भयानक परिणाम घडतात अशा प्रकरणांचे !

रईसा गपचुप ऐकत होती. पण ते काय सांगतात ह्या कडे लक्ष न देता नवऱ्याचा रागाचा पारा खाली कसा आणावा या बाबत विचार करीत होती. ती हळूच म्हणाली. "अहो मला कुठे कळतात मानसिकतेच्या बारीक सारीक गोष्टी. मला वाटलं की मुलाला खऱ्या परिस्थितीची जाणीव करून द्यावी म्हणून सांगून टाकले. आणि हे बघा जर आपल्या मुलाने दुसरी कडे काही लफडं सुरु करून टाकलं तर? मग तर आपले प्रयत्न निष्फळ ठरतील ना?

बायकोचे म्हणणे ऐकूण मुरशदअली स्तब्ध झाले. ते काही क्षण तिच्याकडे टक लाऊन पाहत राहिले.

''तुम्ही कांहीसे गोंधळलेले दिसता, थांबा चहा घेऊन येते.''

चहाच्या निमित्ताने ती स्वंयपाकघरा कडे निसटली तिच्या लक्षात आले की इन्स्पेक्टर साहेबांचा तर्क विचारांत विलीन झालाय.

चहा पिऊन झाल्यावर इन्स्पेक्टर साहेब म्हणाले ''मी रविवारी बरेलीला जाईन व तुझ्या म्हणण्याप्रमाणे ज़मीर साहेबांना आपला प्रस्ताव मंजूर करावा म्हणून गळ घालीन. या कामी मला राशिदची मदत घ्यावी लागेल. तू असं कर की अधून मधून अर्शीला मौलाना हलालींकडे पाठवत जा. त्यांच्या संगतीत त्याला इस्लाम बाबत बरीच माहिती मिळेल, जर ज़मीर साहेबांशी टक्कर झालीच तर तो इस्लाम मध्ये रुचि असल्याचा ढोंग तर नक्कीच करू शकेल. कांही करून आपल्याला या कामी यश मिळावे अशी ईश्वराकडे प्रार्थना करतो.

''असं हताश झाल्या सारखं कां बोलत आहात'' ''मग काय करूं, तू इतका गुंता निर्माण करून ठेवलंय की कार्य सिध्दीस नेण्याकरिता ईश्वराची प्रार्थना करायला हवी.''

''ठीक आहे, ईश्वर आपल्याला यश देओ''

''एक काम कर, रूशाद व नन्हीसाठी चांगल्या भेट वस्तूची व्यवस्था कर आपण मागच्या वेळी चूक केली. ती व्हायला नको. नुसतं गुलाब जामुन व दहा पांच रुपयांनी काम भागणार नाही. रशादसाठी शेवानी व नन्हीसाठी फ्रॉक व कानाचे डूल घेऊन जाईन. तुझं काय मत आहे?''

''छान, अगदी योग्य विचार आहे. ठीक बाजारातून हवं ते खरेदी करून आणा. मला पण दाखवा. फ्रॉक करिता कापड घरीच घेऊन या, मी स्वत: शिवून देईन. एक तोळा जरी ही घेऊन या.''

''अन रजिया करिता पण भेट वस्तू घेऊन जाऊ काय?''

''मला वाटतं कानांतले डूल किंवा रिंग घेऊन जायला हरकत नाही. असं करा दोन जोडी रिंग घेऊन जा व रूशादच्या आईला सांगा की दोन पैकी जी पसंत असेल ती नन्ही साठी ठेवून घ्या व योग्य वाटल्या एक जोडी रजियाला किंवा मरियमला देऊन टाका. तिला ही खुश करायला हवंय ना?''

''अगदी बरोबर''

''मग जाताय ना बाजाराकडे?''

''अरे रिकाम्या हाती जाऊ काय''

''किती पैसे हवेत''

''कमीत कमी चारशे हवेत''

''आता घेऊन येते, हे घ्या विडा''

''अग काय नखरे लावलेत''

''अहो घ्या की माझ्या खातर''

''बरं दे''

''घ्या''

''धन्यवाद''!

कलकत्याहून परतल्या नंतर

बऱ्याच दिवसाच्या प्रवासानंतर ठाकूर घरी परतला. कान्ता व आशाने त्याचे स्वागत केले. लगेच न्याहारी ची व्यवस्था करण्यात आली. न्याहारी घेतांना थोड्या फार गप्पा झाल्या. ठाकूर खूप थकला होता. कान्ताने बिछाना स्वच्छ केला व ठाकूर त्यावर पडताच झोपी गेला.

दोनच्या सुमारास ठाकूरला जाग आली तेव्हा कान्ता समोरच उभी होती. ती म्हणाली.

"दोन वाजलेत, उठा व स्नान करून घ्या."

"ठीक, चांगली आरामशीर झोप झाली. प्रवासात आरामशीर झोप कुठे मिळते." ठाकूर उठला व स्नान गृहाकडे निघून गेला.

स्नान आटोपल्यानंतर ठाकूर सोबत सर्वजण जेवायला बसले. जेवता जेवता गप्पा सुरू झाल्या.

कान्ताने पतिला विचारले "लल्लाची शाळेत प्रवेशाची व्यवस्था झाली काय?"

"हो जवळ जवळ निश्चित झाले आहे. माझी डॉक्टर अहमद साहेबांशी भेट झाली. अत्यंत सुस्वभावी व्यक्ति आहेत. मला त्यांनी परिचय विनाच ओळखले."

"त्यांना तुमच्या हवालदार साहेबांचे शिफारस पत्र मिळाले असेल ना?"

"होय, ते बऱ्याच दिवसापासून माझी वाट बघत होते. त्यांच्या सोबत राहिल्या नंतर तीन दिवसात आमच्या अत्यंत आपुलकीचे संबंध निर्माण झाले. खूप मोठे अधिकारी आहे दीड हजार रुपए पगार घेतात पण माझ्याशी फार जुने संबंध आहे अशा अविर्भावाने वागत होते. त्यांनी तुम्हा सर्वांबाबत खोल माहिती विचारली. मी माझे भूतकालीन जीवनाबाबतची सविस्तर माहिती त्यांना दिली. आता आपण किती काळजीपूर्वक योजना आखत आहोत त्या बाबत ही माहिती दिली. ते म्हणाले "ठाकूर, तुम्ही फार समंजस व्यक्ति आहात." मला व लल्लाला तीन दिवस कलकत्त्याचे दर्शन घडविले. लल्ला त्यांच्या सोबतच राहत असे. ते एका पित्यासमान त्याच्याशी प्रेमाने वागत होते."

"ठाकूर तुम्ही जाताना त्यांच्या मुलाबाळांकरिता काही भेट वस्तू नेल्या होत्या कां?"

"अग जाताना मी फळं, मिठाई व शर्टचे कापड वगैरे घेऊन गेले होतो. पण तेथे पोहचल्या नंतर माहित झाले की ते अद्याप अविवाहित आहेत."

"गमंत झाली."

"आम्ही दोघे खूप हंसलो"

"काय वय असेल त्यांचे?"

"साधारण तीस बत्तीस वर्ष वय असेल तसे वय जास्त नाही मात्र शांतिनिकेतनमध्ये त्यांच्या योग्यते बाबत बरेच कौतुक होत आहे. हिंदू मुस्लिम सर्व त्यांचा आदर करतात. मी तुला

पूर्वीच सांगितले होते की शांतिनिकेतन मध्यें नावाला ही जातीवाद नाही. तेथे सर्वांना समानतेची वागणुक दिली जाते. त्यानी आपल्या एका मित्राशी परिचय करून देताना. 'हे माझे मोठे भाऊ आहेत'' असे सांगितले, त्यांच्या मित्राने माझ्याकडे पाहिले व पाहतच राहिला. अजून माझ्या मिशा, माझा चेहरा माझी भाषा व एकूण वागणुक तर जशीच्या तशी आहे. त्यात हळू हळू बदल होईल. त्यांच्या मित्राच्या लक्षात आले असावे. पण तो काही बोलला नाही. भेटंताना आनंद व्यक्त केला.''

''लला त्यांच्याशी खेळामेळीने वागतोय ना?''

''अगदी, आपुलकीने, मी परतलो तेव्हा ते त्याला स्टेशनवर सोबत घेऊन आले. मी मुद्दाम विचारले ''चल, येतोना घरी माझ्या सोबत'' तो म्हणाला ''नाही, मी येथे राहीन'' हे ऐकूण डॉक्टर साहेबांना खूप आनंद झाला व त्यांनी त्याला उचलून घेतले. तू बिलकुल निश्चिंत रहा. त्याला इथे तेथल्या पेक्षा जास्त सुख मिळत आहे. मला खात्री आहे की जेव्हा तू डॉक्टर साहेबांना भेटशील, तेंव्हा तू त्यांचे कौतुक केल्या शिवाय राहणार नाही.''

''आपल्या कडे येणार आहेत कां ते?''

''ते येथे तर येणार नाहीत मात्र इथून स्थलांतर केल्या नंतर जेथे राहायला जाऊ तेथे ते निश्चित येतील. मला सांगत होते की मी सुटी सुरू झाल्या नंतर स्वत:च ललनला घेऊन येईन.''

''डॉक्टरांना दीर्घायुष्य लाभो, आई वडीलांना त्यांचा विवाह पाहण्याचा योग लाभो.''

''माझ्या मनात ही त्यांच्या करिता शुभाशीर्वाद निर्माण होता. अग त्यांच्या सारखा सदाचारी तरुण माणूस मी पाहिलेला नाही.''

''ईश्वर कृपेने मी पण त्यांना भेटेन''

''मी पण त्यांना पाहायला उत्सुक झाले आहे.''

आशा उद्‌गारली व अचानक तिच्या चेहऱ्यावर लज्जेच्या छटा उमटल्या.

''अरे, तो पर्यंत तर तू बुरखा पांघरू लागशील तू मुस्लिम झाली की तुला पडदा करावा लागेल.'' डॉक्टर साहेबांसमोर कशी जाशील. तू पुरेसे शिक्षण ही घेतलेले नाही. ते तर विद्वान आहेत अरबी उर्दू इंग्रजी व हिंदी सर्वच भाषा येतात त्यांना?''

ठाकुरांचे शब्द ऐकूण आशा लाजली. तिचा चेहरा पाहून आई म्हणाली.

''अहो असं काय बोलताय, माझ्या लाडकीचे मन दुखावले जाते. आशा तू डॉक्टर साहेबांना पाहू शकशील. त्यांची मन:पूर्वक सेवा करायला विसरू नको. आता तू शिक्षणाकडे लक्ष दे. अहो, एक काम करा, हिला काही चांगली पुस्तके आणून द्या.''

ठाकूरने हळूच म्हटले ''ईश्वरकरो व आपण सर्वांना शक्य तो लवकर येथून प्रस्थान

करण्याची संधि प्राप्त होओ. आशाला कुरआन शरीफचे पाठ देणे आवश्यक आहे व अशा सर्व गोष्टी शिकवायच्या आहेत ज्या एका मुस्लिमांकरिता आवश्यक असतात. तुझं काय मत आहे कान्ता?"

"कशा संबंधी?"

"माझं जेवण झालंय, ताट उचलून घे"

"आशा, बेटी ताट उचलून घे व परत येऊन बस. बघ बाबा काय बोलताहेत."

"नको राहू दे, भांडी धुऊन नंतर आरामशीर ये असे बोलून ठाकूरने पत्नीला डोळ्यांने इशारा केला. पत्नीच्या लक्षात आले ती म्हणाली "बघ, भांडी घासून स्वच्छ करून ठेव व नंतर येऊन बस."

आशा भांडी घेऊन गेली. ठाकूर बोलू लागला. "कान्ता, डॉक्टरांचे दर्शन झाल्यानंतर मी क्षणभर ही त्यांना विसरू शकलो नाही."

"अहो तुम्ही सारखं डॉक्टर साहेबांचे गुणगाण करताय. तुम्हाला जे सांगायचे ते सरळ सरळ सांगत का नाही."

"अग मी कलकत्याला जातांना ईश्वर, जो सर्वांचा पालनकर्ता आहे, त्याची आवर्जून प्रार्थना केली होती की, ईश्वरा लल्लाची कलकत्यात राहण्याची योग्यती सोय करून दे. ईश्वराने माझी प्रार्थना मान्य केली. तेथून परत होताना मी दुसरी प्रार्थना केली की ईश्वरा डॉक्टर साहेबांच्या मनात माझ्या मुली करिता......"

आशाला येताना पाहून ते गप्प झाले. मात्र आशाने डॉक्टर साहेब व तिच्या नावाचा उल्लेखाचे अर्धवट वाक्य ऐकूण घेतले होते. ती विचार करू लागली की वडील काय बोलताहेत. कान्ताच्या लक्षात आले की पति काय बोलू इच्छित आहेत. अचानक सर्व जनाना शांत झाल्याचे पाहून आशाने विचारले "बाबा, तुम्ही माझ्या बाबत काय बोलत होता. डॉक्टरांचे नाव ही तुम्ही घेतले होते?"

"ते असे की डॉक्टर साहेब विचारत होते की घरांत लल्लन शिवाय कोण राहते. मी सांगितले फक्त आशा नावाची एकच मुलगी आहे मला."

"मग डॉक्टर काय म्हणाले, आशाने विचारले, "काय विचारणार ते, तुला शुभाशीर्वाद दिला की तू एक चांगली मुस्लिम महिला सिध्द होओ."

"खरोखर बाबा, मी एक चांगली मुस्लिम महिला होईन?"

"शाबास बेटा, ईश्वर तुझं भलं करो!"

"बरंय तर आता आपण तिकडच्या ऐवजी इकडच्या गोष्टी करू. आता आपण काय करायचे ते सांगा."

"आता काय करायचे आहे?" कान्ता बोलली "अहो जमीन तर सरपंचाने घेतलीच आहे. पैसे बँकेत जमा करून टाकलेत. हे तुम्ही फार चांगले केलंत. पैसे घरी ठेवले असते तर भलताच त्रास झाला असता. अहो डॉक्टर साहेबांनी तुम्हास "हुशार आहात" असे उगीचच म्हटलेले नाही.

"पुन्हा डॉक्टर साहेब "ठाकुर उद्‌गारला व हसूं लागला. आशा ही खदकन हंसली" कांता म्हणत होती "आता अवजड वस्तू कमी जास्त किंमतीत विकून मोकळे व्हा. आपण शक्य तितक्या लवकर गांव सोडून निघून जाऊ."

"कान्ता एक गोष्ट सांग"

"काय ?"

"आशाच्या जन्माचा दाखला तर तुझ्या कडे आहे ना?"

"हो आहे, आणू कां?"

"हो घेऊन ये"

"जन्माचा दाखला कशाला हवंय? वर शोधायचा आहे काय तिच्या करिता?" आईचे उद्‌गार ऐकूण आशा थोडीशी लाजली. खाली मान करून पदराने चेहरा झाकून घेतला."

कान्ता आशाच्या जन्माचा दाखला घेऊन आली.

"हा सांभाळून ठेव"

"अशी ताकीद कां करत आहांत?"

"सांगू, माझ्या मनांत एक शंका अजून बाकी आहे. लला तर सुरक्षित ठिकाणी पोहचला आहे मात्र आपण इस्लाम धर्म स्वीकारीत आहोत हे उघड झाल्यावर आशाला अज्ञान सिध्द करण्याचा कांही लोक प्रयत्न करतील. तेव्हा या दाखल्याची गरज भासेल."

"ठाकूर, तुम्हीना फार लांबचा विचार करता. माझं ऐका आपण इस्लाम स्वीकारण्याबाबत येथे कांहीच जाहिर करणार नाही. तुम्हीच तर सांगत होता की आपण दिल्लीच्या जामा मशीदीत ही गोष्ट जाहिर करु व लगेच बरेलीला निघून जाऊ व दुसऱ्या दिवशी तुमच्या मित्राच्या घरी पोहचू ईश्वराच्या इच्छेनुसार."

"इन्शा अल्लाह" बेटा, तू ही म्हण "इन्शा अल्लाह" आशा उद्‌गारली "इन्शा अल्लाह" पण याचा अर्थ काय?" "याचा अर्थ असा की जर ईश्वराची ईच्छा असेल तर "बेटा ईश्वराला कोणत्याही चांगल्या नावाने हाका दिला की त्याला ऐकू जाते. आलं तुझ्या लक्षात."

"हो बाबा, मी या पुढे अल्लाह म्हणत जाईन"

"इन्शा अल्लाह"

इच्छा नसून ही

मुरशद अली खान चार पाचशे रुपयाच्या भेट वस्तू घेऊन धाकट्या भावाकडे पोहचले. राशिद अलीने भेट वस्तू स्वीकारल्या पण त्यांना आश्चर्य वाटले. ते कांही दिवसापूर्वी एका दीर्घ मुदतीनंतर भेटीस आले होते त्या वेळी नुसते दहा वीस रुपयाचे फळ व मिठाई वगैरे घेऊन आले होते. या वेळी त्यांनी काहीतरी विशेष उद्देशाने इतका खर्च केला असावा असा दाट संशय राशिद अलीच्या मनांत निर्माण झाला.

आणि शंका योग्यच होती. एवढा खर्च उगीचच करण्यात आला नव्हता. अशा प्रकारच्या उपकाराच्या ओझ्या खाली मनुष्याला नाइलाजास्तव इच्छा नसतांना ही काही कामे करावी लागतात. मुरशदअली खानने पित्या समान राशिदअलीचे पालनपोषण केले होते. मुरशद अलीने काका या नात्याने रूशाद व नन्हीला भेंट वस्तू दिल्या तेव्हा दबकत दबकत राशिद अली खान त्यांना म्हणाले "दादा, तुम्ही एवढाँ खर्च कां केला. माझ्यावर तुमचे अगणित उपकार आहेत व ते आज पर्यंत मी फेडू शकलो नाही."

"वेडा आहेस, रिकाम्या हाती येणे मला शोभले असते कां? ह्या चिमुरड्यांशी माझे कांही नाते नाही कां?"

राशिदअली कडे या प्रश्नाचे उत्तर नव्हते. ते कांही बोलले नाही. दिवसभर एकच प्रश्न त्यांच्या मनांत घोळत राहिला की कांहीतरी विशेष कारणास्तव भाऊ आले असावे. पत्नी मरियमकडे विचारपूस केली पण कांही उत्तर मिळाले नाही. मरियमच्या मनात ही शंका कुशंकानी थैमान घातला होता. राशिद अली कोणतीही पूर्व सूचना दिल्या विना येऊन ठेपलेत अर्थात ते विना उद्देश आले नसतील. शेवटी सांयकाळी सत्य बाहेर पडले. रात्री जेवणानंतर दोघा भावांमध्ये चर्चा सुरु झाली. मुरशद अली खान भावाला संबोधून म्हणाले,

"हे बघ राशिद, अर्शीची आई पण येणार होती. म्हणत होती रूशादला बघावेसे वाटते."

"मग कां नाही आणलं त्यांना आम्हा सर्वांच्या आनंदात भर पडली असती."

"अरे राशिद, ते खरे आहे पण तुला माहित आहे ना. त्या निघाल्या की त्यांच्या सोबत संपूर्ण लष्कर ही निघाले असते. कसा बसा मी निसटून येथे आलो आहे.

"मुलंतर शाळेत नियमितपणे जातात ना?"

"होय, मी प्रयत्न करतोय, अर्शी मन लाऊन शिकतोय आता तो धार्मिक शिक्षण ही घेत आहे. तो मौलाना हलालीकडे शिकण्यासाठी जात असतो. ईश्वरकृपेने नमाज पढू लागला आहे."

"छान, ईश्वराकरो सर्व मुलांना सुबुद्धी प्राप्त होओ."

"ईश्वर करो, नि असेच घडो"

"राशिद तू जितके पत्र लिहिलेत त्यापैकी केवल एक पत्र वगळता कोणत्याच पत्रात मी विचारलेल्या मुद्या बाबत तू खुलासा केलेला नाही."

"कोणता मुद्दा, माझ्या लक्षात नाही"

"अरे भाऊ अर्शीच्या विवाहा बाबत"

"अरे हो, आलं ध्यानांत मी लिहिले होते की आताच हा विषय काढणे योग्य होणार नाही."

"होय, तू तर तसा सल्ला दिला होता मात्र तुझ्या बहिणीला वाटते की त्यांचा इरादा माहित झाला असता तर समाधान झाले असते. लग्न सवडीने करता येईल."

"ज़मीर साहेबांशी या विषयी बोलण्याचे धैर्य झाले नाही माझे. मी तर तुमच्या पत्राचा ही अद्याप उल्लेख केलेला नाही."

"ठीक आहे, आता विषयारंभ कर?"

"मला अजून ही उत्तर मिळण्याची आशा नाही"

"एक फायदा आहे, राशिद"

"तो कसा?"

"अर्शी वर त्यांचा चांगला परिणाम घडून येईल. जर त्याला येथील स्थळ निश्चित झालंय असे कळाले तर तो सन्मार्गाला लागेल. त्यांने येथील परिस्थिती जाणून घेतली आहे. नाहींतर तो बहकला जाण्याची शक्यता आहे. तुम्हा सर्वांना ही त्याचे भलं व्हावेसे वाटते ना? त्याने ही तुमच्या वळणावर जावे असे नाही कां वाटत तुम्हाला?"

"दादा, हे तर तुम्ही आमच्या मना सारखे बोललात मी संपूर्ण कुटुंबाच्या कल्याणासाठी ईश्वराकडे प्रार्थना करीत असतो. अहो, तुमचे माझ्यावर किती उपकार आहेत?"

"मग संकोच का बाळगतोस, ज़मीर साहेबां कडे शब्द टाक, मला खात्री आहे की ते तुला निराश करणार नाहीत."

"मला वाटते की ते रजिया अज्ञान आहे ही सबब सांगून या विषयी ते उत्तर देण्याचे टाळतील. एका अर्थाने नकार देतील. नंतर आपल्याला संधि मिळणार नाही. आपण योग्य वेळी या विषयी त्यांच्याशी बोलणी करू."

"तुझी वहिणी सारखा हट्ट करतंय. एकदा होकार मिळाल की तिचं समाधान होईल. दूसरं स्थळ पाहण्याची गरज राहणार नाही. लग्न उशीरा झालं तरी चालेल."

"माझ्या मतानुसार थोडं थांबून वार्ता करणे योग्य ठरेल"

"हो, पण आताच शब्द टाकून ठेवायला काय हरकत आहे? तू मध्यस्थीला असल्या नंतर मला चिंता करण्याची गरज नाही."

"मला वाटते, घाई करणे योग्य होणार नाही."

"मला तर वाटते की जर आता विषयारंभ केला नाही तर मग कधीच संधी मिळणार नाही."

"कां"

"अरे भाऊ, मी हयात आहे, तू मध्यस्थीला आहेस, उद्या काय घडेल सांगता येते कां? दूसरा कोण आहे खटाटोप करायला. हा संबंध निश्चित झाला की मग मी या न त्या निमित्ताने येत जात राहीन. कामा शिवाय कोण येतो एक दुसऱ्याकडे?"

"मी आता पर्यंत जे काही ज़मीर साहेबांना सांगितले, ते त्यांनी मान्य केले आहे. पण कां कुणास ठाऊक या बाबतीत मला वाटते ते होकार देणार नाहीत."

"हे तर तुझ्या प्रस्तावावर अवलंबून आहे. तुझे त्यांच्याशी फार घनिष्ट संबंध आहेत म्हणूनच मला होकाराची खात्री आहे."

"पण हा तर वैयक्तिक प्रश्न आहे व अद्याप या गोष्टीकडे आम्ही कधीच लक्ष दिलेले नाही."

"लक्ष तर द्यायलाच हवे उद्या करायचे ते आजच करू या. हे बघ मी याच कामासाठी मुद्दाम येथे आलो आहे. म्हणून तुला माझे हे काम करायलाच हवे."

"तुम्ही माझी कठीण परीक्षा घेत आहांत"

"मला तुझ्या कर्तृत्वावर पूर्ण विश्वास आहे"

राशिद अली खान ने मुरशद अली खानचा दुराग्रह टाळण्याचा खूप प्रयत्न केला मात्र मुरशद अलीने पिच्छा सोडला नाही. विवश होऊन राशिदअली खानला दुसऱ्या दिवशी विवाहा बाबतचा प्रस्ताव ज़मीरसाहेबा पुढे मांडण्याची जबाबदारी मान्य करावी लागली.

दुसऱ्या दिवशी मोठ्या भावास सोबत घेऊन राशिदअली ज़मीर अली खान यांच्या घरी पोहचले. प्रस्ताव मांडतांच ते चकित झाले. त्यांना सर्व परिस्थितीचा अंदाज झाला. त्यांच्या लक्षात आले की मोठ्या भावाने त्यांना विवश केले आहे. तरी ही ते मुरशद अली खान समोर स्पष्टपणे नकार देऊ शकले नाही. उत्तरले "या विषयी मी विचार करुन उत्तर देईन."

नंतर इकड तिकडच्या गप्पा सुरू झाल्या. त्यांनी मुरशदअली खानच्या कुटूंबियांचा हाल अहवाला बद्दल चौकशी केली. मुलांच्या शिक्षणा बाबत विचारणा केली. मुरशदअलीखान ने बराच प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला. विशेष करून अर्शी हा अत्यंत धार्मिक वळणाचा आहे ह्या बाबत

खात्री करून देण्याचा कसोशीने प्रयत्न केला.

मुरशद अली खान हजर असे पर्यंत ज़मीर साहेबांनी त्यांना असा आभास ही होऊ दिला नाही की त्यांना ह्यांचा प्रस्ताव पसंत नाही. मुरशद अली खान यांनी आपल्या धाकट्या भावाला इशारा केला की ज़मीर साहेब कडून त्यांची प्रतिक्रिया वदवून घ्यावी म्हणजे मन शांत होईल. मात्र ज़मीर साहेबांनी इतके मोजके करुन उत्तर दिले होते की अधिक चर्चा करणे शक्य नव्हते. बैठक लवकरच संपली. घरी परत येताना मुरशद अली खान यांनी राशिद अली ना म्हटले "मला वाटते की मी तीनच्या गाडीने लखनऊकडे निघून जावे. ज़मीर साहेबांचे उत्तर मला त्वरित कळवावे. आणि हे बघ, मला बरीच आशा आहे की उत्तर होकारार्थी मिळेल."

या सूचनेच्या उत्तरात राशिद अली खानने "ईश्वराची इच्छा" असे सांगून मुरशदअली खान यांना शांत केले. मुर्शिदअली खान तीनच्या गाडीने लखनौला निघून गेले.

लखनऊ पोहचल्या नंतर ते पत्नीच्या आग्रहास्तव राशिद अली खान ना सतत पत्र पाठवीत राहीले. सततच्या पत्रांनी राशिद अली खान त्रस्त झाले. कंटाळून पत्रांचा गठ्ठा ज़मीर साहेबांसमोर ठेवून केविलवाण्या स्वरात सांगितले की भावाला काय उत्तर देऊ? ज़मीर साहेबांनी सांगितले "यांत घाबरण्याचे कारण नाही त्यांना कळवून टाका की मी त्यांच्या प्रस्तावाशी संतुष्ट नाही."

त्याच दिवशी राशिद अली खान यांनी नकारात्मक उत्तराचे पत्र पाठवून दिले. त्यात त्यांनी निक्षूण लिहिले की त्यांनी ज़मीर साहेबांना समजाऊन सांगण्याचा भरपूर प्रयत्न केला. दीर्घकालीन संबंधाचा उल्लेख केला, पण त्यांनी जरा सुध्दा दाद दिली नाही."

****

रात्रभर झोप कां येत नाही?

"तुम्ही दिवसा काहीतरी सांगता सांगता राहून गेलात"

"कधी?"

"जेवल्यानंतर डॉक्टर अहमद साहेबांबद्दल बोलत होता. आशा येताच तुम्ही गप झालात."

"अरे हो, आलं लक्षात तुझ्या लक्षांत नाही आलं?"

"थोडं समजलं. थोडं नाही"

"अरे असं अर्धवट समजण्यासारखं काय त्यांत?"

"मला वाटतं तुम्ही डॉक्टर अहमद व आशा संबंधी काही तरी बोलत होता?"

"थांब, आशा झोपी गेली काय?"

"हो, ती झोपली आहे. म्हणूनच मी विषयारंभ केलाय. मला काय समजत नाही काय? मला कळतयं की आशा समोर लग्नाचा विषय काढायला नको."

"मग ऐक, मी प्रार्थना करतो की ईश्वर कृपेने डॉक्टर साहेबांशी आशाचा विवाह निश्चित करता यावा. दोघे वर वधू म्हणून शोभून दिसतील. आशा बावीस वर्षाची झाली आहे व आपल्या समाजात या वयाच्या मुलीला वर कुठून मिळणार आपल्या जातीत तर लहान वयातच विवाह रचले जातात. लग्न नाही तर साखरपुडा तरी करून ठेवतात."

"हे सर्व तुमच्या मुळे झाले. तुम्ही ज्या प्रकारे जीवन जगत होता त्या प्रकारच्या माणसाच्या मुलीशी कोण लग्न करणार?"

"अगदी खरं आहे, मी गुन्हा मान्य करतो व मी ईश्वराकडे क्षमा याचना करतो. ईश्वर दया करणारा आहे. तो सर्व शक्तिमान आहे. तोच सन्मान देतो व तोच अपमानजनक जीवन देतो. मी पालनकर्त्या ईश्वराचा कृपाभिलाषि आहे."

"पण एक शंका वाटते डॉक्टर साहेब तर मूळचे मुस्लिम आहेत व आपण नव मुस्लिम ते आपली मुलगी स्वीकारतील कां? ते शिकले सवरलेले व आपल्या मुलींना हिंदी शिवाय काही येत नाही. जोड जमेल कां?"

"मला ईश्वरावर विश्वास आहे. मला ईश्वराने बुद्धि दिली आहे. येथून निघाल्या नंतर तिला इस्लामी शिक्षण देण्याची व्यवस्था करीन. इस्लाम मध्ये मूळचा मुस्लिम व नवमुस्लिम असा भेदभाव केला जात नाही. कुरआनात म्हटलंय की जो इस्लाम धर्माचे पालन करतो त्याच्याशी

विवाह करा. धर्मांचे पालन करणारी दासी धर्माचे उल्लंघन करणाऱ्या धनवान सौदर्यवती पेक्षा चांगली मानली जाते. इस्लामची शिकवण किती मौल्यवान आहे ? इस्लामने महिलांना बरेंच हक्क दिलेत. इस्लाम स्त्रियांना मिळकतीत वाटा देतो. इस्लामनुसार मातेच्या चरणाखाली स्वर्ग असते असे म्हटले आहे. आम्ही धर्माच्या बंधनाचे मजबूतीने पालन केले तर ईश्वर आपली आवश्य मदत करील. तो या जन्मीही सन्मान देईल व मरणोपरांत ही यश देईल. तो मरणोपरांत आपल्या कर्माचा मोजमाप करणारा आहे."

"आम्ही किती भाग्यवान आहोत. ईश्वराने आम्हाला किती महान धर्म दिला आहे. हे बघा, आता शक्यतो लवकर निघण्याची व्यवस्था करा. आता येथे आपलं कोणतेच काम उरलेले नाही. ज़मीन तुम्ही विकून टाकली. घर सामान थोड फार शिल्लक आहे. ते सर्व मी शेजारच्यांना देऊन टाकीन. ते नेहमी विचारतात. ठकुराईन सर्व सामान का विकताय?" मी तुम्ही सांगितल्या प्रमाणे त्यांना समजाऊन सांगते. त्यांना सांगते की जरी ठाकुर साधू संत बनून राहिले तरी त्यांच्यावर कोणी विश्वास करणार नाही. आता आम्ही अशा ठिकाणी जाऊन आश्रय घेऊ जिथे आमचा कोणी ओळखीचा नसेल. मी त्यांना सहज सांगून दिलंय की मी त्यांना नेहमी पत्र लिहित राहीन.

"ललृा पण सुरक्षित ठिकाणी पोहचला आहे. ईश्वर त्याचा पाठीराखा आहे. पण माझ्या लक्षात येत नाही की तुम्ही उशीर का करत आहात."

"कान्ता, मी जेंव्हा जेंव्हा निघण्याची तयारी करतो तेव्हा तेव्हा अस वाटतं की अजगर मला गिळून घ्यायला आ वासून समोर उभा आहे. मला वाटते काही तरी भयंकर घटना घडेल. अशी रूखरूख लागून असते. आता पर्यंत मी अत्यंत जपून जपून पावले उचललीत. सर्व संकटाना टाळत आलो आहे. तरीही मन विचलित आहे. ज्या ईश्वरावर आपली श्रध्दा निर्माण झाली आहे तो आमची जणु परीक्षा घेत आहे."

"ठाकूर, तुमच्या इतकी मला बुध्दिमत्ता नाही. पण एक गोष्ट सांगावीशी वाटते, जर ईश्वराला आपली परीक्षा घ्यायचीच असेल तर तो काहीही करून घेईलच. जे व्हायचे आहे ते टळणार नाही. आपण पुढचे पाऊल पुढेच टाकायला हवे. परीक्षा ही तोच घेणार आहे व उत्तीर्ण ही तोच करणार आहे व तोच आम्हाला उच्च दर्जा ही देणार आहे. या बाबतीत तुम्हाला माझ्या पेक्षा अधिक ज्ञान आहे."

"शाबास कांता ! तू तर कमालच केलीस. कोण म्हणतो की स्त्रियांना बुध्दि नसते. किती छान बोललीस ईश्वर तुला यश देओ. बस्स आता तयारीला लागायचे. पर्वा सकाळी आपण प्रस्थान करू. ईश्वर आमची सुरक्षा करणारा आहे."

"ठाकूर आता तुम्ही किती गोड बोलू लागलात "अल्लाह, मालिक, हाफिज, रहमान, रहीम, रब, परवरदिगार किती मधुर शब्द आहेत. मी पण प्रयत्न करीत आहे. मला पण शिकवा की जे तुम्ही प्रेषित मुहम्मद साहब यांच्या नावा नंतर म्हटले जाते."

"हो, ते तू पाठ करून घे व आशाला ही पाठ करायला लाव. मी तुला सांगितले आहे ना की मुहम्मद (सल्लाहो अलै हो सल्लम) यांचे आम्हा मानवांवर फार उपकार आहेत. त्यांनी बहकलेल्या व वाटचुकलेल्यांना सरळ मार्ग दाखविला आहे. ईश्वराच्या इच्छे प्रमाणे जीवन व्यतीत केले. ईश्वराचे आदेश आमच्या पर्यंत पोहचविले. हे बघ आशा, आपले वडीलधारी माणसे आपले पालनपोषण तर करू शकतात. आपल्याला चांगले भोजन देउ शकतात. चांगले वस्त्र नेसायला देऊ शकतात, पण हे सर्व या जगापूर्ते मर्यादित आहे. मरणोपरांत न्याय निवाड्याच्या दिवशी ते आपली मदत करू शकत नाही. तेथे यशस्वी होण्याकरिता मुहम्मद (स) यांनी दाखविलेला मार्गच अवलंबवावा लागेल. त्यांच्या उपकाराची आम्ही जाणीव ठेवायला हवी. त्यांच्यावर आम्ही आपल्या माता पित्यापेक्षा जास्त प्रेम करायला हवे. कुरआनात ईश्वराने म्हटले आहे की मुहम्मद (स) चे उपकार माना. मुहम्मद (स) यांनी ते शब्द आम्हास माहित करून दिले आहे. तेच शब्द प्रेषित मुहम्मद (स) यांच्या नावा सोबत मुस्लिम उच्चारतात. ते शब्द असे आहेत तू पण म्हण प्रेषित मुहम्मद सल्लल हो अलै हो सल्लम. अन हे बघ जेव्हा जेव्हा प्रेषित मुहम्मद (स) चे स्मरण करशील तेव्हा म्हणत जा "अल्लाहुम्मा सल्ले अला मुहम्मदिन व आला आले मुहम्मदिन व बारिक व सल्लिम" याचा अर्थ असा की हे ईश्वरा प्रेषित मुहम्मद (स) यांच्या वर दरुद व सलामती पाठव व त्यांच्या वर श्रध्दा असणाऱ्यांवर सुध्दा सलामती व बरकत (विपुलता) अवतरित कर."

ठाकूर कान्ता व आशाला दरूद पाठ करवीत होता. पति पत्नीला झोप येत नव्हती. दोघांना वाटले की आशा झोपी गेली आहे. हो ती झोपली होती पण दोघांच्या गप्पांमुळे ती जागी झाली होती व तिने आईवडिलांच्या तिच्या लग्ना बाबतचे सर्व विचार ऐकूण घेतले. आशा अज्ञान बालिका तर नाही. ती सर्व गपचुप ऐकत होती. त्या नंतर तिला झोप आली नाही. ती झोपली नाही मात्र गोड गुलाबी स्वप्न पाहत राहिली. ती हळू हळू दरूद शरीफ पाठ करीत राहिली..

❋❋❋❋

प्रस्थान

गाडीच्या महिलांच्या डब्यात बहुतेक स्त्रियांनी बुरखा पांघरला होता पण डब्यातील दोन स्त्रियावर सर्वांचे लक्ष केंद्रित होते. त्या दोघी एका कोपऱ्यात बसल्या होत्या. दिल्लीहून गाडी निघाल्या नंतर अर्ध्या दिवसाचा प्रवास होत आला होता. कितीतरी स्टेशन निघून गेले होते. कितीतरी प्रवासी आले व गेले. किती तरी प्रवाश्यानी स्टेशन वरील खाद्यपदार्थ विकत घेतले. बऱ्याच महिला आपसात गप्पा ही मारीत होत्या. मात्र या दोन बुरखाधारी महिलांनी आपसांतल्या कुजबुज शिवाय इतरांशी गप्पा मारण्यांचे धैर्य केले नाही. स्टेशनवरील खाद्य पदार्थ खरेदी ही केले नाही व काहीही खाल्ले नाही की प्याल्या नाहीत. हो मात्र अधून मधून एक व्यक्ति येऊन त्यांच्याशी कुजबुजत होता व फळादि आणून देत होता. ही काही विशेष बाब नव्हती. काही लोक प्रवासात गपचुप बसून असतात इतरांशी बोलत नाही की कांही घेत देत नाही. परंतू या दोन बुरखाधारी महिलांच्या एका विशेष कृत्याने डब्यातील सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या दोघींनी महिलांच्या डब्यात बसून ही आपला बुरखा चेहऱ्यावरून सरकू दिला नव्हता. या कृति मुळे प्रवाश्यांच्या मनांत संशय निर्माण केला. ह्या महिलां आपला चेहरा का लपवीत आहेत. या घरून पळून आल्या आहेत काय? काही असो या दोघी संशधित महिला आहेत. डब्यातील सर्व स्त्रियांची खात्री झाली. सर्वच स्त्रियां त्याना संशय, आश्चर्य व भयभीत होऊन पाहत होत्या. काही स्त्रियांनी आपसांत कुजबुज केली. शेवटी एक वयस्क मुस्लिम महिलेला राहावले नाही. तिने दोघीना उद्देशून म्हटले.

"तुम्ही अशा कशा बुरखाधारी आहात की महिलांसमोर ही चेहरा उघडा करीत नाही."

हे शब्द कानावर पडताच दोघा महिलांनी झटकन बुरखा बाजूस सारला. डब्यातील स्त्रियाँनी पाहिले की दोहो पैकी एका २३ वर्षीय सुंदर तरुणीचे टपोरे डोळे, भोळाभावडा कोमल चेहरा पाहून सर्वांच्या मनातले संशय क्षणार्धात लुप्त झाले. त्या त्यांच्याशी बोलू लागल्या.

"कुठून येत आहात?"

"दिल्लीहून?"

"दिल्लीतच राहता"

"नाही, जिल्हा बस्तीच्या राहणाऱ्या आहोत."

"मग दिल्लीला कां गेला होता?"

या प्रश्नाने त्या दचकल्या स्त्रियांच्या मनांत पुन्हा शंका जागृत झाली.

वयस्क महिलांने पुन्हा विचारले "तुम्ही दिल्लीला कां गेला होता?"

"आम्ही जामा मशीद बघायला गेलो होतो."

"तुम्ही जिल्हा बस्तीहून दिल्लीला जामा मशीद बघायला गेल्या होत्या. लाल किल्लाही पाहिला असेल?"

"नाही, लाल किल्ला नाही पाहिला?"

"आग्र्याचा ताजमहाल पाहिला की नाही?"

"नाहीं, तेथे ही गेलो नाही"

"व अजमेर शरीफ"

"तेथे ही नाहीं"

"म्हणजे जिल्हा बस्तीहून केवळ जामे मस्जिद पाहण्याकरिता दिल्ली पर्यंत प्रवास केला होता?"

स्त्रियांनी पुन्हा आश्चर्य व्यक्त केले. तीच महिला पुन्हा बोलू लागली.

"ही मुलगी तुमची कोण लागते?"

"ही माझी मुलगी आहे"

"हिचे नांव"

"आशा"

"आशा की आयशा, तुम्ही मुस्लिम आहात ना?"

"होय आयशा" ती गोंधळून गेली होती.

"तुमचं नांव काय आहे."

"कान्ता"

"पुन्हा तेच अरे तुमचं नांव कानेता आहे ना?"

"हो हो कानेता तर म्हणतय मी बुरखाधारी महिलेच्या घाबरेलल्या चेहऱ्याकडे डब्यातील स्त्रिया आश्चर्याने न्याहळत होत्या. सर्वजणी लक्ष देऊन ऐकत होत्या. वृध्द महिला सारखे प्रश्न विचारत होती."

"तुमच्या मुलीचा चेहरा फारच कोवळा वाटतो. हिचा विवाह केलाय की नाही?"

"अजून विवाह झालेला नाही. तिच्या नशीबी जिथे व्हायचं असेल, होईल."

स्त्रियांना पुन्हा संशय वाटू लागला. त्यांना बुरखाधारी महिलेच्या भाषनेही शंकेत भर घातली. मुस्लिम तर आहेत मात्र भाषा मुस्लिमेतरां सारखी बोलतात. वृद्धा म्हणाली "मला तर काहीतरी गडबड आहेशी वाटते. असं बोलून ती शांत झाली मात्र इतर स्त्रियां शंकाग्रस्त झाल्या. मुरादाबाद स्टेशन जवळ येत होते. प्रवासी उतरण्याची तयारी करीत होते. स्टेशन आले. येथून बरेलीकडे जाणारी गाडी उभी होती. त्या गाडीने प्रवास करणाऱ्या प्रवाश्यानी गाडीकडे धाव घेतली.

बुरखाधारी महिलांना त्यांच्या सोबत आलेला पुरुष प्रवासी त्यांना महिलांच्या डब्यात बसवीत होता. त्याच वेळी प्लॅटफार्म वरील एका महिलेने इशारा करून एका पुरुषाला त्यांच्याबद्दल काही तरी सांगितले. पुरुषाने मान हालवली व नोट बुक काढली त्यावर काही गोष्टींची नोंद घेतली व तो स्टेशन मास्टर च्या कार्यालयकडे गेला.

काही वेळे नंतर गाडी चालू लागली. रामपूर स्टेशन निघून गेला. पुढील स्टेशन मिल्कवर गाडी थांबताच चार पोलीस महिलांच्या डब्यात शिरले व त्यांनी दोन्ही बुरखाधारी महिलांना प्रश्न विचारायला सुरुवात केली. दोन्ही महिला घाबरून गेल्या. कारवाई सुरु होण्यापूर्वीच बाजूच्या डब्यातून पुरुष प्रवासी हजर झाला व पोलिसांना विचारु लागला "काय झाले?"

पोलिसांन सांगितले की आम्हाला मुरादाबादहून संदेश मिळाला आहे की एक पुरुष व एक महिला एका तरुण मुलीचे अपहरण करुन घेऊन जात आहेत. तुम्हीच यांच्या सोबत आहात?

"हो, मीच ह्यांच्या सोबत आहे विचारा तुम्हाला काय विचारायचे आहे"

"आपले नांव?"

"माझे नांव इस्लामुद्दिन आहे"

"या महिलां कोण आहेत?"

"ही माझी पत्नी व ही माझी मुलगी आहे"

"आपण कुठून येत आहात?"

"जिल्हा वस्तीचे राहणारे आहोत"

"दिलीला का गेला होता"

"आम्ही इस्लाम स्वीकारण्यासाठी दिल्लीच्या जामे मशीदीत गेलो होतो"

"म्हणजे तुम्ही तिन्ही नव मुस्लिम आहात"

"होय"

"तुम्ही आमच्या सोबत पोलीस स्टेशनला येऊन आपला जाब देण्याची मेहेरबानी करावी."

"आम्ही पोलीस स्टेशनला का म्हणून जावे आम्ही धर्मांतर केल्याने काही गुन्हा घडलाय काय?"

"तुमच्या प्रश्नाचे उत्तर तुम्हाला तेथेच मिळेल."

"तुमच्याकडे आम्हाला अटक करण्याचा वारंट आहे काय?"

"वॉरट नाही, मात्र आम्ही मुरादाबादहून आलेल्या संदेशानुसार आपणास पोलीस स्टेशनला घेऊन जात आहोत."

"पण आम्हाला बरेलीला जायचे आहे. वाटल्यास आमचा पत्ता टिपून घ्या."

"नाहीं आम्हाला जे आदेश मिळाले आहे तेच आम्ही करू शकतो. बऱ्या बोलाने गपचुप आमच्या सोबत येताय की नाही."

पोलिसांना महिलांच्या डब्या जवळ चौकशी करत असल्याचे पाहून बरेंच लोक गोळा झाले काही लोक म्हणत होते. "अरे तुम्ही जर गुन्हा केलेला नाही तर पोलीस स्टेशनला जायला कां भीत आहात"

परिस्थितीचा विचार करता बिचाऱ्या प्रवाशांना पोलीस स्टेशनकडे जावे लागले. त्यांने पोलिसांना डब्यातून सामान काढून घेण्याची परवानगी मागितली. पोलीसाने परवानगी दिली. त्याने सामान काढून घेतले. आपल्या पत्नी व मुलीला डब्यातून उतरायला सांगितले. पोलीसाने सामान ताब्यात घेतले.

पोलिसांनी त्यांना मलक पोलिस ठाणे येथे नेले. व थानेदारासमोर उभे केले. त्याने त्यांची जबानी घेतली. शेवटी विचारले गेले. इस्लाम धर्म स्वीकारण्यापूर्वी तुमचे नांव काय होते."

"झेंडासिंग"

"झेंडासिंग ! कुप्रसिध्द डाकू झेंडासिंग!"

"होय, तोच मी ईश्वराने मला सुबुद्धि दिली. आता तरी मला जाण्याची परवानगी द्याल कां?"

"नाहीं, आता आपणास अटक करण्यात येत आहे उद्या पोलीस सुपरिन्टेन्डट समोर तुम्हाला हजर केले जाईल."

"आम्हाला आमचा अपराध तर कळू द्या"

"आता पर्यंत आम्हाला तुमच्या बद्दल संशय होता. आता खात्री झाली आहे की तुम्ही या बायकांचे अपहरण केले आहे."

"हे बघा हवालदार साहेब, इस्लामुद्दिनला पुन्हा झेंडासिंग बनवू नका."

"आपली आज्ञा" हवालदाराने चेष्टेच्या स्वरांत म्हटले व हवालदाराला हांक मारून इशाऱ्याने सांगितले की यांना कोठडीत टाकून द्या.

****

हत्या

हवालदार राशिद अली खान यांनी मध्यरात्री नंतर येणाऱ्या जनता व दहेरा एक्स्प्रेस या दोन्ही गाड्यांचे सर्व डब्यांची पाहणी केली. "इस्लामुद्दिन" अशा हाका ही मारल्या मात्र दुपारी येणाऱ्या गाड्यां प्रमाणेच निराश व्हावे लागले. ते हताश होऊन परतले. सरळ ज़मीर साहेबांच्या घरी पोहचले. चारचा सुमार होता. ज़मीर साहेब जागे होते व तहज्जुद ची नमाज पढ़त होते. दारात पोहचताच हांक मारली. ज़मीर साहेबांनी नमाज पूर्ण केली. उठले व दार उघडले. राशिद अली खान एकटेच समोर उभे होते. त्यांच्या लक्षात आले की पाहुणे पोहचले नाहींत. तरीही विचारणा केली.

"इस्लामुद्दीन आले नाहीतं का?"

"नाहीं, या गाड्यांनी ही ते आले नाहींत"

"कदाचित ते दिल्लीहून अद्याप निघाले नसतील."

"कदाचित दिल्लीचे दर्शन करीत असतील. आज कोणत्याही गाडीने नक्की येतील."

"कदाचित रस्त्यात एखादी घटना घडली असेल?"

"इस्लामुद्दीन यांने चांगला दूरदर्शीपणाचा निर्णय घेतला आहे व विवेकशील प्रमाण दिला आहे. सर्वात नाजूक समस्या अज्ञान मुलाची होती. तो आता ईश्वर कृपेने सुरक्षित ठिकाणी पोहचला आहे. मुलीच्या जन्माचा दाखला त्यांच्या जवळ आहे. त्यावरून सिध्द होते की ती चांगली बावीस तेवीस वर्षाची युवती आहे. तिच्या बाबतीत कोणतीच हरकत घेता येणार नाही. ज्या पद्धतीने पूर्ण सावधगिरीने ते गपचुप घरातून बाहेर पडलेत व दिल्लीला पोहचले. ते दाखवण्या जोगे आहे. हे सर्व एक निष्णात व्यक्तीच करू शकते. मग रस्त्यात कोणते विघ्न निर्माण झाले हे लक्षात येत नाही. गाडीच्या दुर्घटने बाबत ही कोणतीच बातमी मिळालेली नाही."

"परंतु बंधु, घटनातर कोणाच्याच काबूत नसते. 'घटना' योजने अंतर्गत घडत नाही. मनुष्य आपल्या परिने प्रयत्न करीत असतो. पण जे घडायचे ते घडतेच. माझ्या मते काहीतरी समस्या निर्माण झाली असावी. कदाचित त्यांच्या बाबतीत कोणाला तरी संशय निर्माण झाला असावा व त्याने त्यांच्या बाबतीत एखाद्या जातीयवादी व्यक्तीचे कान भरले असेल. त्यांना कदाचित रस्त्यातच अडवण्यांत आले असावे.

"ईश्वर त्यांची सुरक्षा करो."

"ईश्वर आपली प्रार्थना कबूल करो. (आमीन)"

"आता आपण काय करायला हवे?"

"सकाळ होताच त्या बाजूने येणारे वृत्त पत्र प्राप्त करा. जर रामपूर येथे काही घटना घडली असेल तर लगेच बातमी मिळेल. इतर वृत्त पत्रात ही बातमी येण्याची शक्यता आहे."

“हे तर मी करेनच पण का कुणास ठाऊक माझ्या मनात चलबिचल होत आहे?”

“माझ्या मनात ही संशय निर्माण होतोय. काही असो ईश्वर पाठीराखा आहे.”

हवालदार राशिद अली खान व ज़मीर साहेब यांच्यात वार्तालाप चालू होते तेवढ्यात पहाटेची अज़ान (बांग) ऐकू आली. हवालदार साहेबांनी तेथेच वजू (परक्षालन) केले. सुन्नत नमाज अदा केली व ज़मीर साहेबा बरोबर मशीदीकडे रवाना झाले. सर्वांसोबत फर्ज नमाज अदा केली. इमाम साहेबांनी नमाज पूर्ण करताच रूशादने जवळ येऊन हवालदार साहेबांच्या कानांत काही तरी म्हटले हवालदार साहेब उठले. ज़मीर साहेबांना इशारा केला व घाई घाईने मशीदी बाहेर पडले. घरी पोहचताच एका पोलीसाने त्यांना नमस्कार केला व म्हटला

“लगेच मिल्कठाण्यावर चला.” एक पत्र त्याने हवालदारांना दिले.

“काय झाले?” असे म्हणत हवालदार साहेबांनी पत्र घेतले व त्यावर नजर फिरवली.

हवालदार साहेब, तुम्ही त्या नालायक कादरयार खान ठाणेदार यास ओळखताना? त्यांने आज भयंकर दुष्कृत्य केले?

“अरे बाबा झाले काय ते सांग? या पत्रात तर मला ताबडतोब हजर व्हायला सांगितलंय व लिहिलंय की खून झाला आहे. याच्याशी माझा काय संबंध?”

“काय सांगू साहेब, या नालायकाने एका मुलीला पकडले व रात्रभर खोलीत डांबून ठेवले. त्या मुलीला त्याचे पिस्तूल सापडले. मुलगी खानदानी होती तिने हवालदार वर बिनधास्त गोळ्या झाडल्या. आता ती दरवाजा बंद करून बसली आहे. तिची अट अशी आहे की तिचे आई वडील, पोलीस सुपरिन्टेडंट व तुम्ही प्रत्यक्ष हजर झाल्या नंतरच ती दरवाजा उघडेल. ती मान्य करते की तिने ठाणेदाराची हत्या केली आहे. तिने ताकीद केली आहे की जर तिच्या म्हणण्याप्रमाणे सर्वजण हजर नसतांना कोणी दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केल्यास तिच्या हातातील पिस्तुलाचा सामना करावा लागेल. दरवाजा खोलण्यास मृत्यूस सामोरे जावे लागेल.”

पोलीस बोलत असतानाच ज़मीर साहेबांचे आगमण झाले. त्यांना सर्व तपशील सांगण्यात आला. ज़मीर साहेबांनी मुलीचे नांव विचारले. त्यांने सांगितली” ती आपले नांव आयशा सांगतेय. पण तिच्या उच्चारावरून ती ‘आशा’ असावी असे वाटते.

“व तिचे आईवडील कुठे आहेत?”

“ते कालपासून पोलीस कोठडीत आहेत. ठाणेदार कादरयार खान या भागात विषयासक्त म्हणून कुप्रसिद्ध आहे. म्हणून लोक मुलीची बाजू घेत आहेत. चला लवकर चला मला तुम्हाला त्वरित घेऊन येण्याचे आदेश देण्यात आले आहेत.”

“कॅप्टन साहेबांना घेण्यासाठी कोणी गेला आहे काय?”

“ते अगोदरच पोहचले आहेत व त्यांनीच मला आदेश दिला आहे.”

"ठीक आहे मी लगेच निघतो."

हवालदार साहेबांनी रूशादला सांगितले "बेटा, घरी जाऊन आईला सांग की तू माझ्या सोबत मिल्क पोलीस ठाण्याला जात आहे. जा लवकर परत ये माझ्या सोबत जायचे आहे तुला."

रूशाद धावत घरात गेला. आईला जे काही सांगता आले ते सांगितले व परत आला. तो म्हटला "बाबा, आई म्हणते चहा घेऊन जा, उपाशीपोटी जाऊ नका."

हवालदार साहेबांनी ज़मीरसाहेब व पोलीसाकडे एक नजर टाकली व रूशादला म्हटले जा लवकर घेऊन ये" सर्वांनी लगेच न्याहरी घेतली. गरम गरम चहाचे घोट घेतले व जायला निघाले. ते शिपायाला उद्देशून म्हणाले "जा टॅक्सी घेऊन ये" शिपाई टॅक्सी घ्यायला गेला. टॅक्सी येई पर्यंत ज़मीर साहेब व हवालदार आपसांत गप्पा मारीत राहिले.

शिपाई टॅक्सी घेऊन आला व सर्वजन मिल्क पोलीस ठाण्याकडे रवाना झाले. ज्यावेळी टॅक्सी मिल्क ठाण्याला पोहचली त्यावेळी पोलिस सुपरिन्टेडट श्री शर्मा शिपायांकडून काही माहिती घेत होते. ते अत्यंत शांत व सुस्वभावी व्यक्ति होते. कादरयारखानच्या दुष्कृत्या बाबत त्यांना कल्पना होती. ते त्याची बदली करण्याचा विचार करीत होते की अचानक ही घटना घडली.

"मुलीचे आईबाप कुठे आहेत? त्यांनी मुन्शी इकबाल बहादुरकडे विचारणा केली. मुन्शी कातर स्वरात बोलले."

"साहेब, ते दोघेही पोलीस कोठडीत आहेत."

"जा घेऊन या त्यांना"

मुलीचे आईवडील कॅप्टन शर्मा समोर हजर झाले. त्याच क्षणी हवालदार राशिद अली खान आपल्या ताफ्यासह येऊन पोहचले. कॅप्टन साहेबांना नमस्कार केला. त्यांनी त्याचे उत्तर दिले. त्यांच्या चेहऱ्या वर स्मित हास्य होते ते म्हणाले.

"अरे हवलदार साहेब अभिनंदन आहे तुमचे तुम्ही आरोप मुक्त झालात."

"हो साहेब, आपला आशीर्वाद व ईश्वराची कृपा आहे."

"मग चार्ज घेतला कां?"

"नाही साहेब, आता मला नोकरी नाही करायची"

"एक खुशखबर सांगू? तुमच्याएका परिचिताने सांगितले की तुमचे संपूर्ण थकित वेतन याच आठ दिवसात अदा केले जाईल."

"आभारी आहे साहेब"

"केवळ तोंडी आभाराने काम भागणार नाही, मिठाई हवी आहे मिठाई!"

"आवश्य, पण साहेब आता मला कशाला बोलावले गेले आहे."

"मी नाही बोलावले या खोलीत बंद मुलीने तुम्हा आम्हास आज्ञा दिली आहे म्हणून मी हजर आहे. आम्ही बदनाम झालो आहोत."

कॅप्टन साहेबांनी इस्लामुद्दिनला इशारा केला की त्यांने दार उघडावे. इस्लामुद्दिन ने मुलीला हांक मारली व मुलीने त्वरित दार उघडला. लोकांनी पाहिले की एक बावीस तेवीस वर्षीय सुंदर व सुशील तरुणी हातात पिस्तूल घेऊन दारा बाहेर पडत आहे. तिच्या चेहऱ्यावर राग झळकत होता. तिने आपला चेहरा झांकून घेतला. पिस्तूल कॅप्टन साहेबांसमोर ठेवून दिले व इशारा मिळताच आई जवळ जाऊन बसली. ठाणेदारचा मृतदेह आंत पडला होता.

कॅप्टन साहेबांनी खोली समोर खुर्च्या ठेवण्याचे आदेश दिले. हवालदार साहेबांनी ज़मीर साहेबांचा परिचय करून दिला. नंतर हळूच रूशादच्या कानांत काहीतरी सांगितले. तो इस्लामुद्दिन व त्यांच्या पत्नीकडे बघत राहिला. नंतर त्यांच्या जवळ जाऊन म्हटला "काका, मी रूशाद आहे. इस्लामुद्दिनने त्याच्याकडे क्षणभर पाहिले व त्याला आपल्या जवळ ओढून घेतले. ते रूशादशी काही बोलू शकले नाही. कारण कॅप्टन साहेबांनी त्यांना बोलाविले व त्यांचा जाब समक्ष लिहून घेतला. इस्लामुद्दिन ने संक्षिप्त जाब लिहून दिला. त्यांने सांगितले "मी आपल्या पत्नी व मुलीसह जामे मशीद दिल्ली येथे इस्लाम स्वीकारला व तेथून बरेलीकरिता निघालो. हवालदार यांचा जुना परिचय असल्यामुळे भेटण्याची इच्छा झाली. त्यांनी मला डाकूच्या स्वरूपात पाहिले होते. आता माणसाच्या स्वरूपात बघून घेतील. मुरादाबादहून कोणी तरी काहीतरी कळविले व आम्हाला बळजबरी या स्टेशनला उतरून घेतले. आम्हाला कोठडीत बंद करण्यात आले. आमचे सर्वसामान पोलिसाच्या ताब्यात आहे. रात्री उशीरा मला बोलविण्यांत आले सांगण्यांत आले की कॅप्टन साहेब आलेत व त्यांनी बोलाविले आहे. मला आश्चर्य वाटले. म्हटले की, कॅप्टन साहेब इतक्या लवकर कसे आलेत व हे काही इतके गंभीर प्रकरण तर नव्हते की त्यांनी इतक्या रात्री येण्याची तसदी घेतली. तरीही आदेशानुसार मी गेलो. खोलीत काही खुर्च्या पडल्या होत्या व एका बाजूला पलंग होता. पलंगावर आपण नव्हता कोणीतरी दूसरीच व्यक्ति बसली होती. त्याने कॅप्टनचे रूप धारण केले होते.

"तुम्ही त्या व्यक्तीला ओळखू शकाल कां? या शिपायांपैकी तर कोणी नव्हता ना?" कॅप्टन साहेबांनी जवळ उभ्या असलेल्या पोलिसांकडे इशारा केला."

"नाहीं, या पैकी कोणीही नव्हता. माझ्या नंतर माझ्या पत्नीस बोलविण्यात आले. तिला काही उलट सुलट प्रश्न विचारण्यांत आले. नंतर माझ्या मुलीला बोलाविण्यात आले. ती घाबरली मी म्हटले "घाबरू नकोस, कॅप्टन साहेब, ठाणेदार व मुन्शीजी वगैरे हजर आहेत. तू जाऊन खरं आहे ते सांगून टाक" साहेब अविवाहित तरुण मुलगी, तिने आजपर्यंत परपुरुषाशी कधी वार्तालाप केला नव्हता. ती घाबरली होती. या नंतर काय झाले हे तिलाच विचारा."

"ठीक, मुली आता तू सांग पुढे काय झाले? कॅप्टन साहेबांनी विचारले."

"इस्लामुद्दिनच्या मुलीने अर्थात आयशाने बोलण्याचा प्रयत्न केला. पण ती बोलू शकली नाही. समोर मोठ मोठे लोक बसले होते. लोकांची गर्दी जमली होती. ती बावचळून गेली. तिने हळूच पाणी मागितले. तिला पाणी देण्यांत आले. राशिद अली खान तिला उद्देशून म्हणाले. "हे बघ मुली, कॅप्टन साहब बरेच कृपाळू आहे. फारच सज्जन गृहस्थ आहेत. जे काही घडले ते निर्धास्तपणे सांगून टाक. ईश्वर कृपेने तुझं काहीच बिघडणार नाही."

हवालदार साहेबांनी हे सर्व सांगितल्या नंतर इस्लामुद्दिन ने ही तिला धीर दिला. कॅप्टन साहेबांनीही सांत्वन केले. हळूहळू तिने धीर एकवटून बोलण्यास आरंभ केला.

"ज्या वेळी मी खोलीत पोहोचले त्यावेळी खोलीत पोलीस इन्स्पेक्टर शिवाय कोणीही नव्हता. जो पोलीस मला घेऊन आला होता त्याने दारबंद करून बाहेरून कडी लाऊन घेतली. मी एकट्या इन्स्पेक्टरला खोलीत पाहून घाबरून गेले. कप्तान साहेब कुठे निघून गेले या बाबत विचार करीत होते तेवढ्यात बाहेरून कडी लावण्याचा आवाज आला. माझ्या लक्षात आले की मला तेथे कां बोलाविण्यात आले होते. मी घाबरून गेले. ईश्वराचे स्मरण केले. मी खोलीत एकटी आहे याची खात्री झाल्यानंतर ते उठले. साहेबाच्या मृत देहाकडे लक्ष द्या. सदरा व लुंगी नेसली आहे. तो पलंगावरून उठला माझ्याकडे येऊ लागला. माझ्या दयनीय अवस्थेचे मी वर्णन करू शकत नाही. मी ओरडू इच्छित होते पण घशातून आवाज निघत नव्हता. मी ईश्वरांचे स्मरण करून त्याच्या मदतीची प्रार्थना करीत होते. माझी नजर इन्स्पेक्टरच्या हालचालीवर होती. अचानक माझी नजर पिस्तुल वर पडली. पिस्तुल पलंगावर उशीजवळ ठेवलेले होते. मी इन्स्पेक्टरला सांगितले मला तहान लागली आहे प्यायला पाणी हवंय.

तो म्हणाला "पाणी काय पितेस, सरबत घे" असे सांगून तो दारूच्या बाटलीकडे वळला. स्वत: दारू ढोसली. मनातल्या मनांत तरुण पोरगी मिळाल्याचा त्याला आनंद होत होता. स्वत: दारू पिऊन झाल्यानंतर मला ही दारू पाजण्याचा तो विचार करीत होता. मी संधी साधून पिस्तुल उचलले व त्याच्या दिशेने गोळ्या झाडल्या. त्यानंतर जे काही झाले ते तुमच्या समोर आहे."

ती जाब देऊन शांत झाली. कॅप्टन साहेबांनी विचारले. ज्या पोलिसांने तुला खोलीत आणून सोडले होते त्याला ओळखशील?"

"हो साहेब!"

"या पैकी कोण आहे?"

जवळ उभे असलेल्या पोलीसांवर तिने नजर फिरवली व म्हणाली "यांच्या पैकी कोणीच नाही."

नंतर कॅप्टन साहेबांनी इस्लामुद्दिन व आयशाच्या आईला ओळखा म्हणून सांगितले.

त्यांनी ही ह्यांच्या पैकी कोणीच नाही "असेच उत्तर दिले. नंतर कॅप्टन साहेबांनी मुन्शी इकबाल बहादुर यांना विचारले."

"एखादा पोलीस गैरहजर तर नाही."

"नाही साहेब सर्व हजर आहेत." मुन्शी इकबाल बहादुर ने उत्तर दिले.

"मग तो कोणीतरी कादरयार खानचा मित्र असेल."

कॅप्टन साहेबांच्या चेहऱ्यावर भीति व चिंतेची चिन्हे दिसत होती. सर्व जाब जबानी ऐकूण त्याच्या मनावरील ताण निवळल्या सारखे वाटले. त्यांनी बाहेर उभे असलेल्या काही प्रतिष्ठित नागरिकांना पोलीस थाण्यात बोलाविले. संपूर्ण वृत्तांत त्यांना सांगितला व मुलीला तिच्या वडीलधारी पालकांच्या स्वाधीन केले.

ही सर्व कारवाई संपल्या नंतर कॅप्टन साहेब हवालदार राशिदअली खान यांना एका बाजूला घेऊन गेले त्यांना काही सूचना दिल्या व निघून गेले. हवालदार साहेब इस्लामुद्दिन व त्यांच्या कुटूंबियांना घेऊन ज़मीर साहेबांसह रामपूरहुन येणाऱ्या बसने बरेलीकडे रवाना झाले.

****

इस्लामुद्दिनचे आत्मकथन

"इस्लामुद्दिन साहेब, आता आम्हाला सांगा की आपण कशा प्रकारे मुस्लिम झालात. इस्लामकडे तुम्ही कसे आकर्षित झालात व कोणत्या घटनांमुळे तुम्ही मुस्लिम होण्यास विवस झालात?"

ज़मीर साहेबांनी हवालदार राशिदअली खान व साजिद साहेबांच्या हजेरीत इस्लामुद्दिन साहेबांना प्रश्न विचारला व मोठ्या आतुरतेने त्यांच्याकडे पाहत राहिले. हवालदार राशिदअली खान पण लक्ष देऊन ऐकण्याच्या तयारीत दिसले. इस्लामुद्दिनने म्हटले. "रूशादला ही बोलावून घेतल्यास बरं होईल. इस्लामकडे आकर्षित करण्यात ह्या बालकाला माझ्या बाबतीत सर्व प्रथम श्रेय जाते.

"ते कसे काय?" दोघेजन एकदम उद्गारले.

"रूशाद आल्यावर सांगतो"

इस्लामुद्दिनच्या विनंतिवरून रशादलाही बोलाविण्यात आले. रशादला अचानक बैठकीत बोलविल्या वरून मरियमची ही उत्सुकता वाढली. तिने ही बुरखा पांघरला व जायला निघाली. मुन्नीं आता पायी चालू लागली होती. तिला सोबत घेऊन ती ज़मीर साहेबांच्या घरी पोहचली. तिने मुल्लानीबीला विचारले की कसली महफिल जमली आहे. त्यावरून मुल्लानीबीने चौकशी करून माहित केले की इस्लामुद्दिन साहेब मुस्लिम कां झाले याबाबत स्वत: सविस्तर माहिती देणार आहेत. विषयाचे गांभीर्य जाणून रज़िया, आयशा व कानेता ना घेऊन त्या बैठकीच्या खोलीला लागून असलेल्या खिडकीजवळ विराजमान झाल्या. पुरुष मंडळीला जेंव्हा माहित झाले की घरातील महिलां ही कथानक ऐकू इच्छितात तेंव्हा इस्लामुद्दिन ने आपली खुर्ची खिडकी जवळ सरकावून घेतली व कथानक सुरु केले.

"माझ्या प्रिय बंधू व भगिनीनो, ईश्वरच स्तुतीस पात्र आहे. मी त्याचा आभारी आहे की त्यांने मला इस्लाम स्वीकारण्याची संधि दिली. हे जे काही घडले ते त्याच्या मर्जीनुसार व त्याच्या कृपेमुळे घडून आले आहे. जर ईश्वराची मजवर कृपादृष्टि झाली नसती तर कदाचित मी तर नरकाच्या अगदी जवळ पोहचलो होतो. मी सर्व प्रथम ईश्वराचे आभार मानतो. परंतु आपणांस माहित आहे की ईश्वर प्रत्येक कामा करिता कोणाला तरी मध्यस्थ नियुक्त करतो. माझ्या बाबतीत सांगायचे झाल्यास मला इस्लामकडे आकर्षित करण्यास रूशाद हा सर्वप्रथम कारणीभूत ठरला."

हवालदार साहेब तुम्हाला माहित असेल की रूशाद पांच सहा वर्षाचा होता त्यावेळी मी तुरूंगात होतो. मी एका दरोड्याच्या खटल्यात गुंतलो होतो. मला त्या आरोपा अंतर्गत तीन वर्षाची शिक्षा झाली होती. मी ज्या काळात शिक्षा भोगत होतो, त्याकाळी त्रिवेदीजी तुरूंग अधिकारी म्हणून आले होते. जे सद्या रायबरेली येथे आहेत व कदाचित लवकरच निवृत्त होणार आहेत. त्यांनी येताच आदेश दिला की त्यांच्या गस्ती (पाहणी) च्या वेळी सर्व कैद्यानी रांगेत उभे

राहावे. हा कांही तुरुंगाचा कायदेशीर नियम नव्हता. हा त्यांनी (जेलरने) दिलेला आदेश होता. त्यांनी इतर काही कडक आदेश ही जारी केले. सर्व कैदी त्यांच्या वागणुकीने नाराज झाले होते. सर्वजन कांहीतरी कारण शोधत होते. त्याच काळात मला मुकादमच्या हुद्द्यावरून बाजूस सारून इतरांबरोबर काम करण्याचे आदेश झाले होते. मला वाईट वाटले. मी तुरुंगाधिकाऱ्याच्या आदेशांने दुखावला गेला होतो. मी म्हटले की हा तुरुंगाचा कायदेशीर नियम नाही की जेलर ज्या ज्यावेळी पाहणीला येतील सर्व कैद्यानी रांगेत उभे राहावे व गुलामा सारखे त्यांच्या समोर माना खाली कराव्यात. मी सन १९४७ पूर्वी जमीनदार होतो. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शासनाने माझ्याकडे पन्नास बिघा (२५ एकर) जमीन ठेवून बाकीची जमीन जप्त करून घेतली. मी श्रीमंतीत वावरणारा माणूस केवळ ५० बिघा जमीनीत माझा खर्च भागणे कठीण होते. माझ्या सारखे इतर बरेंच जमीनदार होते ज्यांची जमीन हिरावुन घेण्यात आली होती. आम्ही सर्वजन दरोडेखोर झालो. आम्ही पुढाऱ्यांना त्रस्त करू लागलो. ज्या पुढाऱ्यांना आम्ही पायी फिरतांना पाहिले होते ते काँग्रेस पक्षाच्या शासनात धनवान झाले. त्यांचे बंगले बांधले गेले. त्यांचा मान सन्मान होऊ लागला. एक दिवस जेंव्हा जगन बाबू गावांत आले तेंव्हा त्यांनी आम्हा सर्वांना सलामीसाठी पाचारण केले. ठाकूर दिग्जयसिंग, कॅवलपुरचे दुर्गामलजी व सान्वालीचे ठाकूर प्रसादजी यांनाही बोलविण्यात आले. आम्ही हे सहन करू शकलो नाही. आम्ही सर्वांनी एकमत होऊ उत्तरे कडील बनूचा मार्ग घेतला. रात्री ते भाषण देत होते. भाषणांत जमीनदारांच्या विरुध्द बोलत होते. आमच्यापैकी एकाने बंदूकीची गोळी झाडली. गोळी त्यांच्या घशांत शिरली व ते जागीच ठार झाले. सर्वत्र अफरातफर निर्माण झाली. गोळी कोणी झाडली या बाबत चौकशी सुरु झाली. कोणी खून केला हे सिध्द होऊ शकले नाही. मात्र आमच्या बंदूकी जप्त करण्यांत येऊ लागल्या. आमच्या पैकी कांही जनांनी बंदूका जमा करून टाकल्या. मात्र आम्ही चार ठाकुरांनी बंदूका देण्यास इन्कार केला. नंतर आमच्या साथीदारांची संख्या वाढत गेली व आम्ही बऱ्याच पुढाऱ्यांची वाट लावली. शेवटी मी एकदा पकडला गेलो. खटला चालवला गेला. खून केल्याचा आरोप सिध्द झाला नाही. मात्र मला तुरुंगात डांबण्यांत आले. मी तुरुंगवासी तर झालो, माझा स्वभाव जमीनदारांसारखा राहिला. मी जेलरचा नादिरशाही आदेश शिरोधार्य कसे मानले असते. मी आदेशा विरोधात उपोषण सुरु केले. माझ्यावर अतिरेक सुरु करताच मी जात्याचे पाट उचलून मारायला धावलो. मी रागाने वेडावला गेलो होतो. हा तमाशा चालू असताना कोणास ठाऊक कुठून रूशाद माझ्या जवळ पोहचला. तुरुंगाचे कर्मचारी भयभीत होऊन दूर उभे होते. रूशाद अधून मधून माझ्याकडे खेळायला येत असे. माझा मुलगा लल्ला रूशादहून लहान आहे. रूशादला पाहून मला लल्लाची आठवण येत असे. मी रशाद ला लल्ला लावत गेलो. मी तासन तास रशादशी खेळत असे. तो ही माझ्यावर फिदा झाला होता. त्याच्या गोडगोड गप्पानी माझं मन हळू हळू मृदू होत गेले. बघा बघा आता कसा मिस्किलपणे हंसत आहे. त्या दिवशी तो मला समज देत होता. मोठा मौलवी बनून

बोलत होता. मला सांगत होता. भोजनास नकार देऊ नये. त्यांने प्रेषित मुहम्मद (स) चे पुन्हा पुन्हा नाव घेतले. ज्या प्रमाणे घरात त्याला शिकवले जात असे त्याचा कित्ता माझ्या समोर मोठ्या गोंडस भाषेत तो गिरवत असे. मी जात्याचे पाट एका बाजूला टाकून दिले. रूशाद बेटा तुला आठवते कां? त्या दिवशी तू मला केळ भरवलं होतं. अरे लाजतोस कां? तुला तर अभिमान वाटायला हवे. तुझ्या बाळपणातील गोंडस शब्दांनी माझ्या मनांवर खोलवर परिणाम झाल्याने आज मला हे पुण्य प्राप्त झाले आहे.

इस्लामुद्दिन पुढे काही बोलणार तेवढ्यात रजियाने खोलीत प्रवेश केला व तिने रूशादला काही तरी संदेश दिला. रशाद उठून आंत गेला. तेथे इस्लामुद्दिनची पत्नी कानेता ने त्याला आवळून घेतले. त्याला प्रेमाने जवळ बसवून घेतले व इस्लामुद्दिनचे आत्मकथन ऐकू लागली.

त्या नंतर हवालदार साहेब आपण धावत आलांत. आपणांस वाटले की मी रूशादला पाय्याने चिरडून टाकेन. नंतर तुम्ही मला समजाऊन सांगण्याचा प्रयत्न केला. त्या दिवशी तर सर्व सारवासारव झाली. मात्र सर्व कैद्यांनी हडताल करण्याचा निश्चय केला. याच अवधीत आपण मला छोट्या व मोठ्या सरकारांचे उदाहरण देऊन ईश्वरीय कायद्याकडे लक्ष वेधविले. आपल्यास आठवत असेल की आपण मला सांगितले होते की शासनाच्या कायद्या पुढे जेलरचा आदेश अर्थहीन असतो. त्याच प्रमाणे सर्वश्रेष्ठ व सर्वशक्तिमान सृजनकर्ता ईश्वराच्या कायद्याच्या विरोधात असले मानवी कायद्यांचे पालन करणे ही योग्य होत नाही. तुम्ही असच काहीतरी सांगितले होते. ज्याकडे माझे लक्ष वेधले गेले. मी हवालदार साहेबांना विचारले "ईश्वरीय कायदाकुठे सापडेल." त्यांनी माझी जिज्ञासा जागृत केली. मात्र उत्तर दिले. "तू स्वत:च शोधून काढ."

ठीक आहे मी स्वत:च शोधून काढीन. मी मनातल्या मनात ताब खाऊन पुटपुटलो. त्यानंतर जेलर व हवालदार साहेबात वैमनस्य निर्माण झाले. ते अधिकारी हे त्यांचे अधीन असलेले कर्मचारी. विटेच्या तुकड्यावर खडक पडल्याने विटेचाच चुरा होणार. जेलरने हवालदार साहेबांविरुध्द उच्च अधिकाऱ्यांकडे रिपोर्ट पाठवून दिला. त्यांची बदली ठहरी-गढवाल येथे झाली. नंतर माझा त्यांचा संपर्क तुटला रूशाद तुरूंगात येईनासा झाला.

मी विचार मग्न राहू लागलो. मी स्वत:च्या स्वभावाला बदलण्याचा प्रयत्न केला. जेलर त्रिवेदीची बदली झाली व शर्माजीनी चार्ज घेतला. त्यांनी माझ्या बाबत चांगला अहवाल पाठवून दिला. परिणामत: मला दोन वर्षातच सोडून देण्यात आले. मी आपल्या गावाकडे गेलो. माझ्या स्वभावात परिवर्तन झाले होते. कानेता मला नेहमी विचारत असे. असे शांत शांत का असता?" मला उत्तर सुचत नसे. मी का शांत आहे. मला जे हवे होते ते प्राप्त झाले असते तर मी तिला उत्तर दिले असते. मी मुस्लिमांना भेटून विचार विनिमय करण्याचा निश्चय केला.

माझ्या गावाजवळ नूरपूर नावाचे एक गांव आहे. तेथे मुस्लिम मोठ्या संख्येने राहतात. एक मशीद आहे. एक मदरसाही आहे. मदरश्या चे मौलवी मशीदीचे इमाम आहेत. ज्ञानी माणूस आहे. मी त्यांना जाऊन भेटलो. त्यांनी मला एक पुस्तक दिले. पुस्तकाचे नाव होते "इस्लामी कायदे" त्या पुस्तकाचे प्रस्तावना अशी होती.

"हे विश्व ईश्वर-निर्मित आहे. हे जग ईश्वराचे आहे. तोच पृथ्वीचा शासक आहे. तोच या वर राज्य करतो. त्याच्याच आदेशानुसार पृथ्वी व आकाशातील घटना घडत असतात. ही पृथ्वी त्याच्या साम्राज्याचा एक भाग आहे. म्हणून येथे ही त्याच्याच आदेशांचे पालन व्हायला हवे."

"हा परिच्छेद मी तोंड पाठ केला आहे. मी मोठ्या गोडीने संपूर्ण पुस्तकाचे अध्ययन केले. माझी इस्लाम बाबत ज्ञान प्राप्त करण्याची उत्सुकता वाढत गेली. मी रात्रंदिवस वेड्यागत इस्लामचा अभ्यास सुरू केला. रोज दहा बारा मैलाचा पायी प्रवास करीत असे. मला जितके इस्लामी साहित्य प्राप्त झाले सर्व वाचून काढले. एक दिवशी मौलवी साहेब म्हणाले "किती पुस्तके वाचशील. एक काम कर ज्या पुस्तकाच्या आधारावर सर्व पुस्तकें लिहिली गेलीत त्या एकमेव पुस्तकाचे अध्ययन कर" मी विचारले "कोणते पुस्तक ?" ते म्हणाले "कुरआन शरीफ" मी लगेच उत्सुकतेने म्हणालो "द्या आणून !"

"भाषांतरासह कुरआन शरीफ मला प्राप्त झाले. मी मौलवी साहेबांना अरबी शिकवण्याचा आग्रह केला. ईश्वर मौलवी साहेबांना सुख समृध्दी व दोन्ही जगात यश प्रदान करो. त्यांनी माझ्या करिता खूप कष्ट घेतले. सहा महिन्यांत मी कुरआन वाचू लागलो. मात्र हे घडले नूरपूर येथे. मी आयशा व कानेताला कळू दिले नव्हते. मात्र माझ्या आचार व विचारात जो बदल होत होता त्याची दोघींना जाणीव होती. कानेताला राहावलं नाही. ती सारखी विचारू लागली. मी मोठ्या शिताफीने तिच्या समोर एक गोष्ट मांडली. आशा ही ऐकत होती. आशा हुशार आहे. कान्ता तर माझ्या दुर्वर्तना मुळे अकालीच म्हातारी झाली आहे. तिच्या लक्षात लवकर येत नाही पण....

अचानक खिडकी जवळ बसलेल्या महिलांच्या हंसण्याचे आवाजाने हॉलमध्ये बसलेल्या पुरुषांचे लक्ष त्या बाजूला वळले. तितक्यांत खोलीच्या दारातून रजिया आंत आली तिच्या हातात आरसा होता. तिने आरसा इस्लामुदिनच्या हातात दिला व म्हटले की कानेता काकू ने सांगितलंय जरा आरश्यात आपलं चेहरा पाहून घ्या."

पुरुषांनाही हसू आवरता आले नाही. सर्वजन मनसोक्त हंसले. इस्लामुदिन ही हंसले. रूशाद चहा घेऊन आला. ज़मीर साहेब म्हणाले चहा घेता घेता कथानक ही चालू ठेवा. सर्वजण कथानक ऐकण्यास आतुर होते. इस्लामुद्दिन ने एक पेला चहा घेतल्या नंतर पुन्हा कथानक सुरु केले.

''संक्षिप्त वर्णन असे की वर्ष दीड वर्ष निघून गेले. एकूण पांच वर्षाचा काळ लोटला गेला. इस्लामचा माझ्या मनावर खोलवर प्रभाव अंकित झाला. कान्ताने मला इस्लाम स्वीकारण्याचा सल्ला दिला. परंतु माझ्या समक्ष काही समस्या होत्या. कानेताला त्यांची कल्पना नव्हती. मला माहित होते की इस्लाम धर्म स्वीकारल्या नंतर समाज सहजा सहजी त्यांना सहन करून घेणार नाही. मी अशा प्रयत्नात होतो की सांप ही मारला जावा व काठीही साबूत राहावी. मी कान्ताच्या मर्जीनुसार लल्लाला कलकत्ता येथे सोडून आलो. ईश्वर कृपेने हवालदार साहेबांकडून मला सल्ला मिळाला. मी त्यांना पत्र पाठविले होते. दीर्घ काळानंतर मला उत्तर मिळाले. त्या पत्रामुळेच मला माहित झाले की हवालदार साहेबांची बदली झाली आहे व आता ते कुठे आहेत. माझ्या पत्राने त्यांचा पाठलाग केला व शेवटी त्यांच्या पर्यंत पोहचला. त्यांनी ज़मीरसाहेबांशी सल्ला मसलत करून मला मार्गदर्शन दिले. योगायोग असा की शांतिनिकेतन मध्ये डॉक्टर अहमद साहेब त्यांचे मित्र निघाले. आपणांकडून पत्र मिळाल्यानंतर लल्लाची समस्या सहजरित्या निकाली निघाली. आता मला माझ्या विरुध्द असलेले चार्ज शीट संपुष्टात आणायचे होते. जमीन विकायची होती. ईश्वर कृपेने सर्व कामें पटापट पूर्ण झाली. मग लगेच आम्ही दिल्लीला जाऊन जामा मशीदीत इस्लाम स्वीकारण्याचे ठरवले व तेथून तुमच्या भेटीला यायचे ठरविले. धर्मांध लोकांना चाहूल न देता सर्व गोष्टी अमलांत आणावयाच्या होत्या नाहीतर त्यांनी कहर केला असता. मनात आशंका होती म्हणून आशाचा जन्माचा दाखला काढून घेतला. नाहींतर तिला आमच्या कडून तिला हिसकाऊन घेतले असते. आम्ही आमच्या बुध्दि-नुसार सुरक्षेसाठी जितकी काळजी घेता आली घेतली. ईश्वराला आमची परीक्षा घ्यायची होती. त्याने आमची परीक्षा घेतली व त्यांने त्याच्याच कृपेने आम्हाला सुयश प्रदान केले. आयशाने जी हिम्मत दाखविली ती आम्ही पुरुषही दाखवू शकलो नसतो. ईश्वर कृपेने आपण सर्व येथे एकत्र बसलो आहोत. येथे येऊन आम्हाला वाटते की आम्ही आमच्या भाऊबांधवात आलो आहोत. कान्ता व आशालाही असेच कांही वाटते. आता या पुढे आपण जो सल्ला द्याल त्यानुसार आम्ही अंमल करू. माझी इच्छा आहे की, आयशाला इस्लामी शिक्षण देऊन इतके सज्ज करण्यांत यावे की लोकांनी तिचे कौतुक करावे. या कामी मी माझी संपूर्ण कमाई खर्च करण्यास तयार आहे. हीच सर्वात मोठी अभिलाषा आहे. मला आशा आहे की आपण सर्वांच्या सहकार्याने माझी इच्छा पूर्णत्वाला पोहचेल.

सर्वांनी एकमुखाने ''ईश्वर यशस्वी करो'' असे शब्द उच्चारले, नंतर बैठक संपली.

****

कठीण परीक्षा

इस्लामुद्दिन व त्यांच्या कुटूंबियांच्या आगमनामुळे जमीर साहेब व हवालदार साहेबांच्या व कुटूंबियांना त्यांच्या बद्दल खूप आत्मीयता वाटू लागली कारण इस्लामुद्दीन, त्यांची पत्नी व मुलगी आपले सर्वस्व, घरदार, नातेवाईकांना सोडून ईश्वरा खातर त्यांच्याकडे आले होते. ज़मीर साहेब व हवालदार इस्लामुद्दिनच्या भूतकालीन घटना ऐकूण घेत व त्यांच्या बाबतीत त्यांना योग्य ते मार्गदर्शन करीत. ज़मीर साहेब व हवालदार साहेबांच्या लक्षात आले की इस्लामुद्दिन ची सर्वात मोठी चिंता आहे आयशाला इस्लामी शिक्षण देणे व तिचा विवाह करून देणे. त्यांना आश्वासन देण्यांत आले की चिंता करण्याची गरज नाही. ईश्वराच्या कृपेने कार्य सिध्दीस जाईल.

घरांत मुल्लानीबी व मरियमने कानेताला एक एक गोष्ट समजून देण्याचा प्रयत्न सुरू केला. तिचे भरपूर आदरातिथ्य व सेवा करण्यांत आली. तिला त्यांनी आपल्या मैत्रिण व बहिणीचा दर्जा दिला. आता पर्यंत आम्ही दोघी होतो आता ही तिसरी त्यांच्या घरांत सामील झाली आहे या बाबत प्रसन्नता व्यक्त करीत राहिल्या. त्यांनी तिला खात्री करून दिले की येथे ती सुरक्षित व आनंदात राहू शकेल व ते तिला सर्व प्रकारची मदत देत राहतील. मुल्लानीबी व मरियम यांच्या ही लक्षात आले की कानेता आयशाच्या लग्नाची चिंता लागून राहिली आहे. एके दिवशी मरियम कानेताला उद्देशून म्हणाली.

"अहोताई, तुम्ही दोन दिवसापूर्वीच आलात, इतक्या लवकर मुलींच्या जबाबदारीतून मुक्त होऊ पाहताय!"

"तसं नाही हो, मुली पासून दूर होण्याबाबत कोणतीच आई विचार करणार नाही. पण समाजाची हीच रीत आहे. आणि मी ऐकले आहे की प्रिय प्रेषित मुहम्मद (स) यांनी ताकीद केली आहे की मुलगी वयात येताच शक्य तितक्या लवकर तिचे विवाह करून टाकायला हवा. जर तिच्याकडून काही चूक घडल्यास आईवडीलांना ईश्वर विचारणा करील. याच करिता मी चिंतित असते."

मरियमने विषय काढला होता मात्र कानेताच्या उत्तराने विषय गंभीर झाला. दोघींनी कानेताला धीर दिला व आश्वासन दिले की त्या आपल्या पतींना सांगून लवकरच योग्य अशा वराचा शोध घेण्याबाबत प्रयत्न करायला सांगतील.

पुरुष मंडळी व महिलांमध्ये योजना आंखल्या जात होत्या. मुलांमुलीमध्ये ही सख्य वाढत गेले. रूशाद व रज़िया अभ्यास आटोपून आयशाच्या संगतीत वेळ व्यतीत करीत. आयशाला ते आपल्या आईवडीलांकडून ऐकलेल्या प्रेषितांच्या गोष्टी सांगत. तिच्या कडून ही कथा व गोष्टी ऐकत. आयशाच्या गोष्टी विचित्र असत. ती चोरांच्या दरोडेखोऱ्यांच्या चांगल्या व वाईट राजांच्या गोष्टी सांगत असे. देवी व देवतांचे कथानक ऐकवीत असे व सांगत असे की या कथानकांना हिंदू धर्मात पौराणिक कथा म्हणतात व यांचे धर्माशी संबंध जोडला जातो.

आयशाच्या हळूहळू लक्षात आले की रूशादला हिंदी भाषेचे अपूरे ज्ञान आहे. तिने आपल्या फावल्या वेळेत त्याला हिंदी शिकवणी देण्यास सुरुवात केली. रूशाद व रजिया आयशाला "बाजी" (अर्थात ताई) म्हणू लागले. थोड्याच दिवसाने रूशादला चांगल हिंदी बोलता येऊ लागले. त्याने स्वत:ची इतर विद्यार्थ्यांशी तुलना केली. तेंव्हा त्याला आपले हिंदीचे ज्ञान इतरांपेक्षा बेहत्तर असल्याची जाणीव झाली. त्याचा आत्मविश्वास वाढू लागला व आशा वाढू लागली की वार्षिक परिक्षेत तो वरच्या क्रमांकाने उत्तीर्ण होईल.

आयशाच्या कर्तबगारीची दोन्ही कुटूंबियांना जाणीव झाल्या शिवाय राहिली नाही. जमीर साहेबांनी आपल्या अमूल्य वेळेतून एक तासाची वेळ काढून आयशाला अरबी व उर्दू शिकवू लागले. ज़मीर साहेब व आयशा यांच्यामधे कापडाचा पडदा टांगला जात असे. इस्लामुद्दिन व कानेताने म्हटले की आयशा तुमच्या मुली समान आहे पडद्याची काय गरज आहे. ज़मीर साहेब म्हणाले "आपले आपुलकीचे संबंध व विचारांच्या शुध्दतेचा विश्वास करता प्रेषित मुहम्मद (स) यांच्या उपदेशांकडे दुर्लक्ष करता येत नाही. प्रेषित (स) ने पडदा करण्याचा उपदेश दिला आहे म्हणजे त्यानुसार पडदा करणे अनिवार्य आहे. यात आपलाच फायदा आहे. सैतान मानवांचा उघड शत्रू आहे. तो मानवाला अनेक प्रकारे वाम मार्गावर नेण्याचा प्रयत्न करीत असतो."

हे सर्व ऐकूण इस्लामुद्दिन व कानेताच्या मनांत इस्लामच्या तत्व व नियमां बाबतचे मत अधिक उंचावले गेले व ज़मीर साहेबांबद्दल अधिक आदर वाटू लागला. त्यांनी स्वत:च्या सौभाग्यासाठी ईश्वराचे उपकार मानले व आपण अंधारातून निघून प्रकाशाकडे आलोत याबद्दल समाधान मानले.

एके दिवशी रूशादला भूमितीचा एक प्रश्न सोडवता आला नाही. आयशाने विचारले "काय झाले?" त्यांने भूमितीचा प्रश्न तिच्या समोर ठेवला. आयशाने प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला व चटकन् उत्तर काढून दिले. रूशाद चाकित झाला तो म्हणाला "आयशा बाजी, तुम्ही सुध्दा परीक्षा कां देत नाही. अगदी सहज यशस्वी व्हाल !"

आयशाच्या मुखावर स्मित झळकले ती म्हणाली, "वडिलांना सांग ते जे सांगतील ते मी करीन !"

रूशादने त्याच दिवशी हवालदार साहेबांना सांगितले व हवालदार साहेबांनी ज़मीर साहेबांना ज़मीर साहेब म्हणाले "परिक्षेंस बसण्यासाठी आठवीच्या सार्टीफिकेटची गरज भासेल व ते सहजा सहजी मिळणार नाही. कारण शाळा सोडून बराच काळ उलटला आहे. ते लोक सर्टीफिकेट देतील किंवा देणार नाहीत."

समजा सर्टीफिकेट मिळाले तरी त्या वर नांव असेल "आशा" मग आपल्याला धर्मांतर केल्या बाबत तीन वेळा वर्तमान पत्रात जाहिरात द्यावी लागेल. मग मॅजिस्ट्रेट कडून नवीन नावांची मंजूरी घ्यावी लागेल. कोण करणार हा सगळा खटाटोप. मला इतर गोष्टींची चिंता ही वाटते.

अद्याप सर्व गोष्टी गुप्त आहेत. आपल्या घरांत नवमुस्लिम राहत आहेत याची कोणालाच कल्पना नाही. आपणच आपल्यावर आपत्ती कां ओढवून घ्यायची. मिल्क ठाण्यावर कॅप्टन साहेबांनी आपणांस काय समज दिली होती. त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की सर्व प्रकारावर पडदा टाकून द्या. माझ्या जबाबदारी वर मी प्रकरणाची वाट लावेन. त्यांनी आपणांस जाणीव करून दिली होती बरेली धर्मांध लोकांचे केंद्र आहे. ही बाब उघड करण्याची काय गरज आहे?''

''बरं केलं तुम्ही मला आठवण करून दिली. प्रकरण नाजुक आहे. हवालदार साहेबांनी ज़मीर साहेबाच्या स्मरणशक्तीचे कौतुक केले व हसत हसत म्हणाले 'अहो साहेब एक गोष्ट तुमच्या लक्षात आली नाही. तुमची इच्छा असेल तर सांगतो.

''सांगा''

''एक दिवस गप्पा मारता मारता मरियमने आयशाच्या विवाहाचा प्रश्न उपस्थित केला, तेव्हा आयशाच्या आईने सांगितले ''मला काय विचारता, अहो हवालदार साहेब व ज़मीर साहेब जे कांही सल्ला देतील त्याप्रमाणे पावले उचलले जातील. आता मी चिंता करण्याचे सोडून दिले आहे.''

यानंतर हवालदार साहेब म्हणाले की जर डॉक्टर अहमद साहेब आयशाशी विवाह करण्यास राजी झाले तर समस्या सहज सुटण्या सारखी आहे.

''असे आहे काय, तुम्ही तर खूप दूरदर्शी आहात. म्हणूनच की काय तुम्ही आयशाला परिक्षेसाठी तयार करीत होता. हल्लीच्या तरुणांना शिकली सवरलेली बायको हवी असतेना? पण माझ्या माहिती प्रमाणे डॉक्टर साहेब त्यातले नाहीत. जर त्याना सुशिक्षित पत्नी हवी असती तर त्यांनी टागोर कुटूंबातील एखाद्या एम. ए. पास मुलीशी लग्न करून घेतले असते. मुलीने व मुलीच्या बापाने सिव्हिल मॅरेजसाठी बरेंच प्रयत्न केले. परंतु डॉक्टर साहेब राजी झाले नाही. डॉक्टर साहेब अशा मुलीशी लग्न करू इच्छितात जी सर्वात कठीण परीक्षा देण्याची तयारी करीत असेल.''

''सर्वात मोठी परीक्षा कोणती? संशोधनाचे काम असेल तर ते शक्य नाही. मी आजच मरियमला सांगेन की आयशाचा डॉक्टर साहेबांशी लग्नाचा विचार डोक्यातून काढून टाक म्हणून ईश्वराची इच्छा असेल तर येथेच योग्य वर शोधून काढू.''

''हवालदार साहेब, माझं म्हणणं पूर्णपणे ऐकूण घ्या. सर्वात मोठी परीक्षा म्हणजे ज्या परीक्षेने मनुष्याला सर्वोच्च दर्जा प्राप्त होतो. अर्थात हे आपले जीवन ज्याचे यश आपल्याला मरणोपरांत प्राप्त होणार आहे. तेथे सर्वांचे पेपर तपासले जातील. जो उत्तीर्ण होईल तो स्वर्गात जाईल व जो अनुत्तीर्ण होईल तो नरकात जाईल. आयशाला या परीक्षेसाठी तयार करा. जर डॉक्टर साहेबांच्या लग्नाच्या प्रस्तावाबाबत माझे मत जाणून घ्यायचे असेल तर मी म्हणेण की दोघांची

जोडी शोभून दिसेल. वय, चेहरा मोहरा, वागणुक व कला कौशल्याच्या दृष्टीने आयशा अगदी योग्य वधु वाटते. ते वार्षिक सुटीच्या काळात येथे येणार आहेत. मी स्वत: लग्नाचा प्रस्ताव त्यांच्या समोर मांडेन. प्रयत्न करणे आपले कर्तव्य आहे. ईश्वराला मान्य असेल तेच घडून येईल.''

ज़मीर साहेबांची विचार शैली व समाजात त्यांचा सन्मान-जनक दर्जा यांचा विचार करता हवालदार साहेबांच्या मनात विश्वास निर्माण झाला की आयशाच्या लग्नाची समस्या ज़मीर साहेबांच्या सहकार्याने सहज सुटू शकेल. ही वार्ता त्यांनी मरियमला सांगून टाकली. त्याच बरोबर त्यांनी हे ही सांगितले की ज़मीर साहेबांचे विचार अत्यंत चांगले असून ते प्रत्येक समस्येचे उत्तमारित्या निरसन करतात. माझी इच्छा आहे की आयशाने परीक्षा उत्तीर्ण करून घ्यावी. परीक्षेच्या निमित्ता ने मुलं सर्व विषयांचा सखोल अभ्यास करतात माझी इच्छा आहे की आयशाने साऱ्या विषयांचा अभ्यास करावा. आम्हाला मुलींची शाळा सुरु करावयाची आहे. त्यासाठी तिच्या सहकार्याची गरज भासेल.

''तुम्ही पण ना काही तरी बोलता, 'मरियम बोलत होती ''अहो डॉक्टर साहेबांशी लग्न झाल्या नंतर ते तिला घेऊन जातील. इथे शाळेत शिकविण्यासाठी सोडतील कां ?''

''ते कांही असे मला वाटते की तिने परिक्षा उत्तीर्ण करून घ्यावी. तिला सांगा की तयारीला लाग. मी प्रवेशाच्या वेळे पर्यंत ज़मीर साहेबांना राजी करून घेईन. रूशाद म्हणत होता की त्याची आयशा बाजी सर्व प्रथम स्थान प्राप्त करील. हे बघ मरियम, सन १९४७ अगोदर दर्जेदार शिक्षण होते. आता तर परिस्थिति पार बदलून गेली आहे. आयशा त्याच काळात शिकली आहे. शिक्षणांचा दर्जापार खालावला गेला आहे. अभ्यासक्रमांत फक्त इंग्रजीचा समावेश करण्यात आला आहे. आयशाला अभ्यासात कोणतीच अडचण येणार नाही. ज़मीर साहेब प्रयत्न करून तिला परीक्षेत प्रवेश मिळवून देतील. पण एक गोष्ट लक्षात ठेव. लग्नाचा विषय निघाल्यास डॉक्टर साहेबांशीच तिचं लग्न निश्चित झालंय असं न सांगता आम्ही प्रयत्नशील आहोत असे सांगायचे.

'आलं लक्षात मी आताच मुल्लांनीबीला जाऊन सांगते की लग्नासाठी सामानाची जुडवा जुडव सुरु करा, हवालदार साहेबांनी आयशाचे लग्न डॉक्टर साहेबांबरोबर निश्चित करून टाकलंय.''

हवालदार साहेब हसूं लागले. इतक्यात रूशाद येताना दिसला. आयशा पण सोबत येत होती. आयशाने हवालदार साहेबांना पाहताच बुरख्याने चेहरा झाकून घेतला. सलाम करून मरियम काकू जवळ जाऊन बसली.

''रूशाद बेटा, आयशा बाजीला सोबत कां घेऊन आलास.''

''बाबा मी आयशा बाजीला परीक्षा देण्यासाठी राजी करून घेतले आहे. तुमचे काय मत आहे?''

"हायस्कूल करून काय करशील?"

"काय करेल? अन मी काय करणार आहे? मला पण तुम्ही हायस्कूल ला पाठवीत आहातना?"

हवालदार साहेब निरुत्तर झाले. ते म्हणाले

"रूशाद बेटा, मला वाटते की तू सर्वात कठीण परीक्षेची तयारी करावी."

"बाबा, प्रथम छोट्या छोट्या परीक्षा उत्तीर्ण करायला हव्यात. त्या नंतर मोठ्या परीक्षा देता येतील. प्रथम ही परीक्षा नंतर इंटर, बी.ए. नंतर एम.ए. नंतर"

"त्यानंतर रूशादमियाँ"

"बाबा, तुम्ही मला कोणातरी मोठ्या मौलाना कडे अरबी शिकण्यासाठी पाठविणार होता ना?"

"बेटा, त्यापेक्षा ही एक मोठी परीक्षा आहे?"

"कोणती परीक्षा पी.एचडी?"

"त्या पेक्षा ही मोठी परीक्षा."

"त्या पेक्षाही मोठी परीक्षा ? बाबा, तुम्ही काय बोलताय माझ्या लक्षात येत नाही. सरळ सोप्या भाषेत बोला ना?"

'हे बघ, आपले जीवन सुध्दा एक परीक्षा आहे. या परीक्षेचा निकाल मरणोपरांत मिळेल. तेथे दोन दर्जे दिले जातील. एक दर्जा आहे स्वर्ग व दूसरा आहे नरक. स्वर्गात सुखच सुख प्राप्त होईल व नरकांत यातना ! यातना आले लक्षात?"

"हो बाबा, आले लक्षात एक दिवस काका ही असंच सांगत होते. ते म्हणत होते की जगातील परीक्षांची प्रश्न पत्रिका दाखविली जात नाही. मात्र जीवनाची प्रश्नपत्रिका अगोदरच दाखवून दिली जाते की मरणोपरातं कोणते प्रश्न विचारले जाणार आहेत."

"ठीक आहे. त्या परीक्षेची चिंता बाळगा. जगातल्या परीक्षांबाबत सांगायचे झाल्यास मला सांगायचे की आयेशासाठी मी प्रयत्न करीन. आयशा बेटी तू रूशाद सोबत परीक्षेची तयारी सुरु कर."

हे ऐकूण आयशा प्रफुलित झाली. त्या दिवशी ती तेथेच राहिली. मरियमने म्हटले "आयशाबेटी, आज मी तुझी एक परीक्षा घेऊ इच्छिते. हे बघ येथे सर्वसामान ठेवले आहे. हा मसाला आहे. आज तू स्वयंपाक करशील व आज सर्वजन तुझ्या हातचे जेवण जेवणार आहेत. मी रजियाच्या आईला सांगायला जात आहे. सोबत रजियाला घेऊन येईन. ती तुला मदत करील.

आनंदी आनंद

ज़मीर साहेब आपल्या विशेष शैलीत बोलत होते "मी सांगू शकत नाही की मला रूशाद व आयशाच्या जवळीक मुळे मला जास्त आनंद होत आहे की डॉक्टर अहमद साहेब व लाल अहमदच्या आगमनामुळे."

ज़मीर साहेब तुम्ही तर अगदी माझ्या मनातंल बोललात. माझ्या मनांत ही असेच विचार निर्माण होतात. एक तर रूशादने सर्वाधिक गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक पटकावल्याचा आनंद आहे व आयशा अल्पावधीत द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाली आहे. हे तिच्या मेहनती व बुध्दिमतेचे द्योतक आहे. दुसरं असं की डॉक्टर अहमद साहेब आले आहेत व दीर्घ काळानंतर लालची भेट झाली आहे. आनंदात दोन्ही कारणांनी भर पडली आहे. इस्लामुद्दिन तुमचं काय मत आहे?"

"राशिदभाई, मी माझे आनंद शब्दांत व्यक्त करू शकत नाही. मी ईश्वराचे कितीही आभार मानले तर ते कमी पडतील. आयशा व तिच्या आईची हीच मनोभावना आहे. दोघी पुन्हा पुन्हा ईश्वरासमोर नतमस्तक होतात. सतत ईश्वराची आराधना व आभार प्रदर्शन करीत असतात. मी ही त्यांच्या करिता प्रार्थना करीत असतो. ईश्वर त्याना दोहो जगात येथे व मरणोपरांत सुयश प्रदान करो. मी डॉक्टर साहेबांना सदिच्छेशिवाय काय देऊ शकतो.?"

"नि:संशय हा विचित्र योगायोग आहे. आम्ही आयशा व रूशादच्या यशाने प्रसन्नता व्यक्त करीत होतो. डॉक्टर अहमद साहेब लालला घेऊन आल्याने आनंदात अधिक भर पडली. मी इस्लामुद्दिन यांचे विशेष अभिनंदन करतो."

"आपण योग्यते बोललात. इस्लामुद्दिन सर्वाधिक अभिनंदनास पात्र आहेत. इस्लामुद्दिन व त्यांच्या पत्नीने या वेळी सर्वात अधिक आनंद व्यक्त केला आहे. त्याला कारण ही तसे घडले आहे. त्यांच्या पुत्राशी अर्थात लाल अहमदशी त्यांची एका वर्षानंतर भेट झाली आहे. ते डॉक्टर अहमद साहेबांचे अत्यंत आभारी आहेत. माझ्या मते हा त्यांचा मूळ स्वभावगुण आहे. एके काळी ते अत्यंत धनवान होते. उदार मताचे व खुल्या मनाचे श्रीमंत गृहस्थ होते. प्रेषित मुहम्मद (स) यांनी म्हटले आहे की जो इस्लाम स्वीकारण्यापूर्वी सद्गुणी असेल तो धर्मांतरानंतर ही सद्गुणी राहील. प्रेषित मुहम्मद (स) यांची उक्ति इस्लामुद्दिन साहेबांच्या बाबतीत पूर्णता खरी ठरते. डॉक्टर साहेब तुम्ही सुद्धा काहीतरी बोला की."

"नि:संशय मी इस्लामुद्दिन साहबच्या आदरातिथ्याने व त्यांच्या आत्मयितेने अत्यंत प्रभावित झालो आहे. कलकत्ता येथील भेटीतच मला त्यांच्या स्वभावाची कल्पना आली होती. मला कळत नाही की असं काय विशेष कार्य केले आहे की त्यांनी माझे कृतज्ञ व्हावे. आपल्या पत्रातील मजकूरानुसार कार्यवाही करणे माझे कर्तव्य होते. मी आपले कर्तव्य बजावले मला तर उलट खूप आनंद झाला कारण तिथे मी एकटा होतो. लल्ला आला त्याच्या सहवासाने मला खूप

आनंद प्राप्त झाले. जणूं मला एक खेळणं प्राप्त झाले असावे. आपण एकमेकांचे आभार मानण्यापेक्षा ईश्वराचे उपकार जानले पाहिजे.''

''अगदी बरोबर मी आपल्या विचारांशी सहमत आहे. पण एक सांगू मी बऱ्याच विचारांति लल्लाला तुमच्या सुपुर्द केले होते. ईश्वराच्या कृपेने माझा तर्क खरा ठरला. तुम्ही एका वर्षाच्या अवधीत त्याचे जे मार्गदर्शन केले आहे ते खरोखर वाखाणण्या जोगे आहे. रूशाद लवकर कोणाला जवळीक देत नाही. मात्र लालला तो आपल्या भावा समान आत्मीयतेने वागवितो.''

''भावा समान असे शब्द का वापरताय तुम्ही लालला आपला मुलगा मानत नाहीं कांय तुम्ही? मी तर तुम्हाला आपला सख्खा भाऊ मानतो.''

''इस्लामुद्दिन साहब तुम्हाला एक गोष्ट सांगू. काही वर्षापूर्वी माझे सख्खे भाचाभाची आले होते रूशाद त्यांच्या वागणुकीने एक आठवड्यातच त्रस्त झाला होता. तो वेडा एक दिवस आपल्या आईला विचारू लागला, 'हे सर्व लखनऊला परत कधी जातील?'' मात्र काल हाच रूशाद हट्ट करत होता की त्याला लाल बरोबर कलकत्त्याला जायचे आहे व आता डॉक्टर साहेबांकडेच राहून पुढील शिक्षण घेईन. या वरून तुम्हाला जे समजायचे ते समजून घ्या.''

असो, या बाबत आपण नंतर विचार करु. आता आपल्याला निर्णय घ्यायचे आहे की रूशादला पुढील शिक्षणासाठी कुठे पाठवायला हवे. जर डॉक्टर साहेबांनी मान्य केले तर कलकत्ता येथे पाठविण्यात एक फायदा असा की तो त्यांच्याकडे अरबी शिकून घेईल व बाकीचे शिक्षम शांतिनिकेतनात पुरे करता येईल. तेथे त्याला इतर धर्मांचे ज्ञान प्राप्त करता येईल. डॉक्टर साहेबांच्या मार्गदर्शनात तो नक्कीच एक कार्यकुशल व्यक्तिमत्व प्राप्त करील.''

''खरोखर, ज़मीर साहेब तुमची योजना शिरोधार्य. आपण रूशाद बाबत विचार विनिमय करणार होतो व तुम्ही स्वत:च प्रस्ताव डॉक्टरांसमोर मांडलाय.''

''ज़मीर साहेब माझ्याशी नि:संकोचपणे बोलू शकतात. ते माझे आदरणीय गुरु आहेत व अत्यंत मुत्सद्दी आहेत. त्यांचे शब्द माझ्या करिता आज्ञे समान आहेत. मला रूशाद जसा मुलगा मिळत असेलतर हे माझे सौभाग्य मानायला हवे.''

जिवलग मित्रांमध्ये गप्पा सुरु होत्या इतक्यात आतून लाल धावत आला व डॉक्टरांच्या कानांत काही तरी कुजबुज केली व त्यांच्याकडे प्रश्नार्थी मुद्रा करून उभा राहिला जणू त्याला कुढल्यातरी प्रश्नाचे उत्तर हवे होते. डॉक्टर साहेबांनी त्याच्या कडे पाहिले व म्हटले बेटा लाल जा रूशाद बरोबर खेळ.

उत्तर मिळाल्यावर लाल थोडा थबकला व विचार करत निघून गेला. डॉक्टराना विचारले गेले की ही कुजबुज कशा बाबत होत होती? डॉक्टर हसले व म्हणाले लाल व रूशाद मध्ये वाद झाला की दोहोपैकी मला कोण अधिक प्रिय आहे. लाल मला याच प्रश्नाचे उत्तर विचारायला आला होता. त्याचे मी उत्तर दिले.

"शाबास, डॉक्टर किती छान उत्तर दिले तुम्ही याला म्हणतात बुध्दिमत्ता यास म्हणतात चाणाक्ष उत्तर वाहवाह ! ईश्वर तुम्हाला सुयश प्रदान करो."

डॉक्टर साहेबांच्या उत्तराने सर्वांना मनस्वी आनंद झाला. डॉक्टर साहेबांचे मित्र नसीम साहेब जे आजच सकाळी शाहजहाँपूरहून त्यांच्या भेटी साठी आले होते, बैठकीत हजर होते व शांतपणे सर्वांच्या गप्पा ऐकत होते. त्यांना ही राहवले नाही, ते म्हणाले,

"अहमद साहब, आम्ही तर आपल्या हजर जवाबी बद्दल अलीगड येथे असतांनाच परिचित झालो होतो. ते ज़मीर साहेबांना उद्देशून म्हणाले "मी फक्त तीन दिवसाची रजा घेतली आहे. मला वाटतं की आपण ज्या विषया बाबत चर्चा करण्याकरिता मला बोलविले आहे, त्या विषयाकडे वळू या"

सर्व आश्चर्याने ज़मीर साहेबांकडे पाहू लागले. ज़मीर साहेब काही क्षण स्तब्ध राहिले व नंतर बोलू लागले. आपण डॉक्टर साहेबांच्या स्वभावाबद्दल अल्पवधीतच परिचित झाला आहात. त्यांची लहान मुलांवर लगेच छाप पडते व ते अल्पावधीतच त्यांना आपलेसे करून घेतात. तुम्ही आयशाला एक वर्षापासून पाहत आहात. तिचे वागणे, आचार, विचार, बुध्दिमत्ता, सुशील चारित्र्य इत्यादि सर्व गोष्टी आपल्या समोर आहेत. तिने ज्या प्रकारे रूशादला हिंदी भाषा शिकवून प्रथम श्रेणी मिळवून दिली त्या कामगिरीचे अवश्य कौतुक करायला हवे. रूशादला हिंदी भाषेवर मुळीच प्रभुत्व नव्हते. त्यामुळे तो प्रिन्सीपल साहेबांच्या मुलाला कधीच मागे टाकू शकला नसता.

आपण चर्चेचा मुख्य विषय जाणून घेण्याकरिता उत्सुक असाल. विषय असा आहे की मला नसीम साहेबाच्या मध्यस्थीने डॉक्टर साहेबांच्या विवाहबाबत चर्चा करावयाची आहे. मी या बाबत त्यांच्याशी थोडीफार चर्चा केली आहे व तेच आता या विषयी आपले मनोगत व्यक्त करतील.

ज़मीर साहेबांच्या प्रास्तावाने बैठकीत हजर व्यक्तीना चर्चेच्या विषयाची कल्पना आली. इस्लामुद्दिन थोडे बेचैन दिसत होते. त्यांची मन:स्थिती आनंद व आशंकेच्या दोन टोकामध्ये डोलायमान होत होती. ते नसीम साहेबांकडे आतुरतेने लक्ष देऊन त्यांच्या कडे स्तब्ध पणे बघत होते. नसीम साहेब म्हणाले.

"मी डॉक्टर साहेबांशी या विषयी चर्चा केली. आम्हा दोघांचे एकमत आहे की आपण ईश्वराची भीति बाळगणारे व मानवांचे हिताचा विचार करणारे लोक आहातं. आपण आमच्या बाबतीत जे निर्णय घ्याल ते निश्चितच आमच्या हिताचे असेल."

इतके बोलून नसीम साहेब शांत झाले. इस्लामुद्दिन श्वास रोखून एक एक शब्द टिपत होते. नसीम साहेबांच्या वक्तव्या नंतर त्यांनी एक दीर्घ नि:श्वास सोडला. ज़मीर साहेब त्यांना उद्देशून बोलू लागले.

"इस्लामुद्दिन साहेब, तुम्ही एका उच्च परिवाराशी संबंध ठेवता. पण इस्लामशी संबंध असणे सर्वश्रेष्ठ संबंध आहे. मला आशा आहे की आपण डॉक्टर साहेबांचा आयशाशी विवाह संबंध जोडण्यास सहर्ष सम्मति द्याल."

"मी तर स्वत:ला तुमच्याच परिवाराचा एक सदस्य मानतो. माझी मुलगी डॉक्टर साहेबांची जीवन संगिनी बनण्याइतकी लायक नाही. मात्र त्यांनी तिला प्रशिक्षित केल्यास ती निश्चितच योग्यता प्राप्त करील अशी खात्री वाटते."

"मग या पुण्य कार्याला प्रलंबित ठेवण्यात काय अर्थ आहे." नसीमसाहेबांनी डॉक्टर साहेबांकडे स्मित मुखाने पाहत हवालदार साहेबांना उद्देशून म्हणाले.

"मी डॉक्टर अहमद यांच्या वतीने विवाहसंबंधाचा निर्णय निश्चित झाले समजून ही आंगठी भेट करतो व रूशादच्या आईला विनंती करतो की त्यांनी आयशाच्या बोटात अंगठी चढवावी व माझी इच्छा आहे की हे शुभ कार्य आताच पूर्ण करण्यांत यावे. डॉक्टर अहमद उद्या माझ्या सोबत शाहजहाँपूरला रवाना होतील.

प्रस्ताव सर्वच उपस्थितांना मंजूर होता. कोणताच संकोच न बाळगता विवाहाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. नसीम साहेब व हवालदार राशिद अली डॉ. अहमद साहेबाचे साक्षीदार नियुक्त झाले व जमीर साहेबांनी डॉक्टर अहमद व आयशाना विधीवत निकाहबध्द केले. इस्लामुद्दिन यांनी एक वर्ष अगोदर केलेली प्रार्थना ईश्वराने आज पूर्ण केली. निकाहची विधी संपन्न झाली याची माहिती सर्वांना व्हावी म्हणून नसीम साहेबांनी ज़मीर साहेब व राशिद अली खान साहेबांच्या मित्रांना सायंकाळी स्नेह भोजनास आमंत्रित केले. प्रत्येक निमंत्रितास या स्नेह संबंधाने आनंद झाला. दुसऱ्या दिवशी नसीम साहेब डॉक्टर साहेब व आयशाला सोबत घेऊन शाहजहाँपूरला जाण्याच्या तयारीस लागले. रूशाद व लाल या दोघांनी आयशा बाजी बरोबर जाण्याचा हट्ट सुरु केला. रजियाला ही राहावले नाही ती ही जाण्यास तयार झाली.

व हा छोटेखानी ताफा शाहजहाँपूरकडे रवाना झाला.

****

घटना

देरहा एक्स्प्रेस शाहजहाँपूरहून एक मैल अंतरापर्यंत पोहचली असेल. अचानक झटक्यासह गाडीला ब्रेक लाऊन थांबविण्यात आले. प्रवाशामध्ये चर्चा होत होती. "कोणीतरी साखळी ओढून गाडी थांबविली वाटते" जो तो खिडक्यांतून इथे तिथे पाहत होता. रात्रीच्या अंधारात काही दिसत नव्हते. अचानक महिलांच्या डब्यातून आरडाओरड ऐकू आला. पुरुष मंडळी, ज्यांच्या महिलां त्या डब्यात होत्या घाबरले व महिलांच्या डब्याकडे धावू लागले.

डॉक्टर अहमदही याच गाडीने बरेलीकडे जात होते. त्यांनी आयशाला रूशाद, रजिया व लालसह महिलांच्या डब्यात बसविले होते व स्वत: जवळच्याच डब्यात बसले होते. नसीम साहेब बरेली स्टेशन पर्यंत पोहचवायला येत होते. ते बरेलीहून त्याच रात्री परत येणार होते. हे सर्वजन या घटनेने धास्तावले गेले. त्यांचा डबा महिलांच्या डब्याला लागून होता. डब्यातील महिला प्रवासी ओरडत होत्या. "धांवा धांवा पकडा पकडा" डॉक्टर साहेबांना रजिया, रशाद व लाल डब्यात त्यांच्या बसल्या जागी दिसले नाही. ते ही घाबरून गेले. डब्यात आरडाओरड व रडण्याचा आक्रोश ऐकू येत होता. डॉक्टर साहेबांनी पाहिले की कांही स्त्रियां कोणाला तरी चपलांनी बदडत आहेत. आयशा खिडकी जवळ बसली होती ती घाबरलेली होती व तिच्या डोळ्यात अश्रु दिसत होते. तिने शक्य तितक्या शक्तीने खिडकी बंद करून ठेवली होती. तिला त्रस्त पाहून डॉक्टर 'खबरदार' असे दरडाऊन म्हणत डब्यात शिरले. एक सशक्त सद्गृहस्थास आंत येताना पाहून लोकांनी रस्ता मोकळा करून दिला. मात्र सर्वजणी आयशाला ओरडून सांगत होत्या की खिडकी उघडता कामा नये, नाही तर हा गुंड पळून जाईल. या गोंधळात सर्वांचे बुरखे इकडे तिकडे झाले होते. आयशाचा बुरखा ही ठिकाण्यावर नव्हता. स्त्रिया बाजूला झाल्या नंतर डॉक्टर आयशाजवळ पोहचले. "काय झाले?" डॉक्टरांनी विचाराणा केली. त्यांनी पाहिले की एक लठ्ठ माणूस खाली उलटा पडला आहे. त्याचे पाय रूशाद व लालने धरून ठेवले आहे. रूशादच्या डोक्याला जखम झाली होती व त्यातून रक्त ठिपकत होते. खाली पडलेल्या माणसाची कंबर खिडकीत अडकली होती व तो हालचाल करू शकत नव्हता. डॉक्टरांनी आयशाला आपल्या जागी जाऊन बसायला सांगितले. आयशाने स्वत:ला सावरले. तिने रडक्या स्वरांत म्हटले या हरामखोर गुंडाने रजियाला डब्याबाहेर फेकून दिलंय. व रशादला जमीनीवर आपटले. त्याच्या डोक्याला मार लागलाय आयशाला रडू आवरता आले नाही. लाल उठून उभा राहिला. तो ही रडत होता. रूशाद उठून बसला मात्र तो रक्त बंबाळ झाला होता. बरेच लोक डब्याच्या बाहेर व आतं उभे होते. डॉक्टर साहेबांनी खिडकी उघडली. गुंड मोकळा झाला त्यांने कुशी बदलली. मोठा सुस्कारा सोडला. मात्र उठू शकला नाही. रस्ता मोकळा झाला नसीम साहेबानी खिडकीतून बाहेर उडी घेतली व अंधारात गडप झाले त्यांच्या पाठोपाठ बरेच तरुण ही धावले. डॉक्टर साहेब पहात होते की आता गुंड काय करतो. मात्र तो जमीनीवर पडून राहिला. हे राम माझी कंबर !" तो किंचाळला. त्यांने

एका पेटीवर आपले डोके टेकले. डॉक्टरांनी खिडकी बंद केली.

या अवधीत गाडीच्या रक्षक (गार्ड) व इतर कर्मचारी ही डब्याजवळ पोहचले. त्यांनी प्रवाश्यांना विनंति केली की त्यांनी आपापल्या डब्यात जाऊन बसावे. चौकशी करता लक्षात आले की गाडी थांबताच गुंड डब्यात शिरला व रजियाला उचलून डब्या बाहेर फेकून दिले. बाहेर काही लोक उभे होते. त्यांनी रजियाला हातावर झेलून घेतले व तिला घेऊन पळ काढला. ती केवळ एकदाच किंकाळू शकली नंतर तिचं तोंड बंद करण्यात आले असावे. हा गुंडही गाडीतून पळ काढत होता की रूशादने त्याची कंबर घट्ट धरून ठेवली. त्यांने रशादला खाली आपटले. लालने त्याचे पाय धरून त्याला रोखले. त्याचे पाय झटक्याने ओढल्याने तो खाली कोसळला तो घसरत घसरत बाहेर जाऊ पाहत होता पण आयशाने खिडकी बंद करून घेतली. गुंडाची कंबर खिडकीत अडकली गेली.

हे सर्व तपशील ऐकल्यानंतर डॉक्टर साहेबांनी गार्डशी इंग्रजीत चर्चा केली. त्याने उत्तरादाखल "यस" म्हटले व डब्यातून खाली उतरला. त्यांने दोन कर्मचाऱ्यांना इशारा केला. त्यांनी गुंडाला ओढले व गार्डच्या डब्याकडे नेले. डॉक्टर साहेब ही त्यांच्या सोबत निघून गेले. महिला भयभीत झाल्या होत्या. नातेवाईक त्यांना धीर देत होते. आयशा व लाल फारच बेचैन दिसत होते. गाडीचा ड्रायव्हर सारखा शिटी वाजवीत होता. उद्देश असा की लोक रजियाला आणण्यासाठी गेले होते त्यांनी परत यावे. गाडी जवळजवळ अर्धा तास थांबली होती. शोध घेणारे परत आले. नसीम साहेबांनी डॉक्टर साहेबांना सांगितले की अद्याप रजिया सांपडलेली नाही. डॉक्टराच्या डोळ्यात अश्रू भरून आले. त्यांनी ईश्वराचे स्मरण केले व तिच्या सुरक्षेसाठी प्रार्थना केली. नसीम साहेब गार्डच्या डब्यातच बसून राहिले. गाडी शाहजहाँपूरकडे परतली. नसीम साहेबांनी डॉक्टरांना विचारले "रूशाद कसा आहे?"

"त्याच्या डोक्याला जबर जखम झाली आहे बरंच रक्त स्त्राव झाला आहे."

गाडी शाहजहाँपूर स्टेशनवर थांबली. स्टेशनमास्टर धांवत आला. रेल्वे पोलीस ही आले. गुंडाला त्यांच्या ताब्यात देण्यात आले. डॉक्टर साहेब रूशाद, आयशा व लालला घेऊन खाली उतरले. त्यांनी नसीम साहेबांना हळूच काहीतरी सांगितले. थोड्या वेळे नंतर गाडी बरेलीकडे रवाना झाली. नसीम साहेब त्याच गाडीने बरेलीकडे रवाना झाले.

गुंड कंबरेच्या दुखण्याने व महिलांच्या चपलांच्या फटक्यामुळे कन्हत होता. त्याला पोलीस घेऊन जात होते. त्यांने रूशादकडे इशाराकरून डॉक्टर साहेबांना विचारले.

"सरकार या मुलांचे नांव काय म्हटलांत तुम्ही?"

"कां?"

"सरकार तुम्ही याला 'रूशाद' म्हणून हाक मारली होती?"

"होय, पण तू कां विचारतोस?"

"हा राशिद अली खान हवालदाराचा पुत्र तर नाहींना?"

"होय, तोच आहे."

"सरकार त्या मुलीचे रूशादशी काय नाते आहे"

डॉक्टर साहेबांना गुंडाच्या प्रश्नाने थोडे आश्चर्य वाटले. त्यांनी त्याला विचारले "तू स्वत:बद्दल सांग, रजिया रूशादच्या गुरुजीची मुलगी आहे."

"हे राम मी हे काय दुष्कर्म केले. ईश्वरा हे काम करण्यापूर्वी मला मृत्यु आले असते तर बरं झालं असतं" अहो मुन्नाची आई याला 'देवता' म्हणत असे. मी तिला काय उत्तर देईन. अहो दोनशे रुपयांच्या लोभाने मी हे सर्व काम केलंय" गुंड पश्चात्तापाने वेडावून स्वत:चे डोके हातावर आपटत होता. डॉक्टरांचे कुतुहल वाढू लागले. त्यांनी पोलिसांना थांबविले व विचारले."

"मला खरं खरं सांग, झालं तरी काय?"

"अहो सरकार, माझ्या मुलाचे रूशादने जीव वाचवले होते. माझा मुलगा गाडीखाली येता येता वाचला. त्या वेळेस रूशाद बारा वर्षाचा असेल."

आयशाने सांगितले की ही घटना मुल्लानीबीनी तिला सांगितली होती.

गुंडाला त्याचे नांव विचारले असता त्यांने स्वत:चे नांव गंगू असल्याचे सांगितले.

डॉक्टर साहेबाने आयशाकडे पाहिले आयशाने मान हलवून नाव बरोबर असल्याचे सांगितले. आयशाने डॉक्टर साहेबांना हळूच काही तरी सांगितले. डॉक्टर साहेबांनी पोलिसांना थांबायला सांगितले. त्यांनी पोलिसाला सांगितले की बरेलीहून येणाऱ्या गाडीने आपण जाऊ.

"सरकार मी काही सांगू इच्छितो."

"बोल" डॉक्टर साहेबांबरोबरच स्टेशन मास्टर व शिपाई गंगू कडे पाहू लागले. सर्वांना ही घटना विचित्र वाटत होती. गंगू बोलू लागला.

"संपूर्ण घटनेचे वर्णन तर मी हवालदार साहेब आल्या नंतर सांगेन मात्र रूशाद बरोबर जी मुलगी होती काय नाव होते तिचे 'रजिया', तिचा पत्ता मी तुम्हास सांगेन" असं म्हणून तो रूशादकडे वळला व त्याला बिलगून रडू लागला. आयशा रजियाच्या चिंतेने मुसमुसत होती व रूशाद थोडासा गांगरून गेला होता.

"हं गंगू लवकर सांग रजिया कुठे आहे?"

"सरकार, किती वेळ झालीय या घटनेला?"

"जवळ जवळ दीड तास"

"हे भगवान दीड तास..आता तर ते निघून गेले असतील."

"कोण निघून गेले असतील?"

"जातील कोठे सरकार, कच्चा खाऊन टाकीन एकेकाला गंगू दांत ओठ खात म्हणाला"

"गंगू त्यांची नांवे सांग"

"नावं तर मी हवालदार साहेबांना सांगेन" असं म्हणत त्याने रूशादला पुन्हा आपल्या कडे ओढून घेतले.

"जाऊ दे, नको सांगू" तोंड फिरवीत डॉक्टर बोलले. "गाडीला किती वेळ आहे?" त्यांनी स्टेशन मास्टरला विचारले. स्टेशन मास्टर ने सांगितले देरहा एक्सप्रेस बरेली पोहचली असेल. येथे येता येता साधारण दीड तास लागेल."

"नसीमसाहब हवालदार साहेबांना आणू शकणार नाहीत कां?"

"मला वाटते त्यांना टॅक्सीने यावे लागेल."

"बराच वेळ वाट बघावी लागेल. मास्टर साहेब जवळपास एखादा डॉक्टर असेल कां, रूशाद व गंगूला कमीत कमी प्रथमोपचार तरी द्यायला हवा."

"गंगूला ही?"

"होय, डॉक्टरांची फी मी अदा करीन."

"ठीक आहे, स्टेशन मास्टरने पोलिसाला इशारा केला. तो धावत गेला व डॉक्टर इबाद साहेबाना घेऊन आला."

डॉक्टर साहेबांबरोबर एक कम्पाऊंडर होता. स्टेशन मास्टरने डॉक्टर अहमद साहेबांचा त्यांच्याशी परिचय करून दिला व सांगितले की आपण शांतिनिकेतन च्या अरबी डिपार्टमेंटचे इन्चार्ज आहेत.

"हो, मी यांचे नावं ऐकूण आहे," डॉक्टर अहमद यांनी हस्तांदोलन केले व संपूर्ण घटनेचे संक्षिप्त वर्णन केले.

डॉक्टर साहेबाने रशादला तपासून म्हटले. "चिंतेचे कारण नाही. त्यांनी कंपाऊंडरला रूशादचे औषधोपचार करण्याबाबत सूचना दिल्या. गंगूला बराच मुका मार लागला होता व वेदनामुळे बेचैन होता. डॉक्टरांनी त्याला इंजेक्शन दिले. दोन तीन गोळ्या खायला दिल्यात. एका प्रकारचे तेल कमरेवर लावायला दिले. ते म्हणाले कंबरला जबर दुखापत झाली आहे. मात्र कोणतीही गंभीर हानी झालेली नाही."

अचानक एक टॅक्सी येऊन स्टेशनला येऊन थांबली. त्यातून हवालदार राशिद अली खान, इस्लामुद्दिन व नसीम साहेब उतरले. तिघे चिंतित दिसत होते. त्यांना पाहून डॉक्टर अहमद पुढे

झाले. आयशा वडिलांना बिलगून रडू लागली. हवालदार नसीम साहेब स्तब्ध उभे होते. त्यांनी लाल व आयशाला धीर दिला. दिलासा दिला रशादला पाहुन त्यांना हायसे वाटले. अचानक हवालदार साहेबांची नजर गंगूवर पडली ते उद्‌गारले,

"अरे तू"

"हो साहेब, मीच तो गंगू नमक हराम. त्यांने रूशादला बाजूस सारले व जमीनीवर डोक आपटणार एवढ्यात हवालदार साहेबांनी त्याला सांवरून घेतले.

"असं काय करतोस तुला मार लागला आहे. दुखत असेल, नाही कां? नसीम साहेबांकडून मला सर्व हकीगत माहित झाली आहे."

डॉक्टर इबाद म्हणाले "पांच दहा मिनिटात माझे काम आटपेल."

स्टेशन मास्टरने डॉक्टर इबादला पांच मिनिटाची सवलत दिली व गाडी येण्याची सूचना दिली. डॉ. अहमद यांनी स्टेशन मास्टरशी हस्तांदोलन केले. डॉक्टर ईबादला दहा दहाच्या पांच नोटा देऊ लागले.

डॉ. इबाद म्हणाले 'अहो साहेब मी मामूली डॉक्टर नाही.'

"ठीक आहे शंभर रुपए घ्या" डॉ. अहमद म्हणाले

"मुळीच नाही."

"मग"

"मला जर फी द्यायची असेल तर सर्वांना लगेच माझ्या घरी यावे लागेल. पेशंटला ही सोबत घ्या. हे पोलीस ही येतील सकाळी आरोपीला लॉकअप मध्ये पाठविण्यात येईल. मात्र ही खरोखर आश्चर्याची बाब आहे की तक्रार करणारा आरोपीशी इतका आपुलकीचा व्यवहार करत आहे."

डॉक्टर अहमद खुश झाले. पैसे खिश्यात टाकले. सर्व जण डॉक्टर इबादच्या घरी कारने रवाना झाले. जाता जाता त्यांनी स्टेशन मास्टरला सूचित केले की त्यांना गंगू विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची इच्छा नाही.

डॉक्टर इबादच्या घराच्या एका खोलीत गंगूला बोलविण्यात आले. त्यांने चारी बाजूला नजरा फिरविल्या नंतर हवालदार साहेबांना विचारले. बाहेर कोणी ऐकत तर नाहीं ना? हवालदार साहेब म्हणाले, नाही कोणी ऐकत नाही. बोल काय बोलायचे तुला."

गंगू बोलू लागला 'हे सर्व तुमच्या भावाने घडवून आणले आहे. मला दोनशे रुपए दिलेत त्यांनी व तुमचा उलेख ही केला. मात्र मला हे सांगितले नाही की रजिया रशादच्या शिक्षकाची मुलगी आहे व रजिया व रूशाद मध्ये सलगीचे संबंध आहेत. व्यूह रचना अशी होती की आपले बंधू

रस्त्यावर कार घेऊन उभे राहतील. त्यांना माहित होते की रजिया या गाडीने येणार आहे. ते बऱ्याच दिवसापासून आग्रह करीत होते. त्यांचे खबरीलोक तुमच्या पाळतीवर होते. आज त्यांना संधी मिळाली. मला त्यांनी या कामाकरिता तैनात केले. मला हे सर्व काम तुमच्यासाठी केले जात आहे अशी बतावणी केली. त्यांची माणसे गाडीत होती. त्यांनीच सांखळी ओढून गाडी थांबविली. मी तयारच होतो. गाडी थांबताच महिलांच्या डब्यात शिरलो. पाठोपाठ त्यांची माणसे ही डब्याजवळ पोहचली मी रजियाला उचलले व त्यांच्या हातात सोपवून दिले. ते अंधारात तिला घेऊन गडप झाले. मला रूशादने पकडताच त्याला धक्का देऊन जमीनीवर पाडले पण तेवढ्यात लालने माझे पाय आवळून धरले व माझा तोल गेला. रजियाला घेऊन ती माणसे रस्त्यावर पोहचली असतील तिथे त्या दोघांना तुमच्या इन्स्पेक्टर बंधूने दम दिला असेल. त्या दोघांनी तेथून पळ काढला असेल. रजिया तुमच्या बंधूना ओळखते तिला वाटलं असेल की काकाने तिला गुंडाकडून सोडविले असावे. ती त्यांना आपला संरक्षक मानून त्यांच्या सोबत कारने लखनऊ कडे निघून गेली असेल."

"ठीक आहे ही सर्व हकीगत गुप्त ठेव, कोणाला काही सांगू नकोस. मला जे योग्य वाटेल ते मी करीन. सकाळीच मी तुला सोबत घेऊन लखनऊला पोहचने व ईश्वर जी बुध्दि देईल त्या नुसार कारवाई करीन."

रात्र संपत आली होती थोड्यात वेळाने पहाटेच्या (फजरच्या) नमाजची अज़ान ऐकू आली हवालदार साहेब उठले व नमाजच्या तयारीला लागले.

****

शोध

पहाटेच्या (फज्र) नमाज नंतर डॉ. इबादने सर्वांच्या न्याहारी (नाश्त्याची) चोख व्यवस्था केली. नाश्ता होत असतांना सर्वांनी रात्रीच्या घटनेचा तान विसरून जावे म्हणून मनोरंजक गप्पा सुरु केल्या. नाश्त्या नंतर सर्व जन विचार विनिमयासाठी एकत्र येऊन बसले. रजियाचा शोध घ्यावयाचा होता. डॉक्टर अहमद साहब रूशाद, आयशा व लालला घेऊन बरेलीला रवाना होतील तेथे फक्त ज़मीर साहेबांना घटनेची माहिती मिळाली आहे. त्यांच्या सल्ल्यानुसार अहमद साहब महिलांना ह्या घटनेबाबत तपशील देतील व त्यांचा नकार असेल तर आम्ही परत येई पर्यंत वार्ता गुप्त ठेवली जावी. हवालदार राशिद अली खान गंगूला घेऊन लखनऊला रवाना होतील, असे निर्णय घेण्यांत आले.

डॉ. इबाद साहेबांच्या पाहुणोपचार व त्यांनी अत्यंत आत्मयितेने दिलेल्या सेवे बद्दल सर्वांनी त्यांचे आभार मानले. डॉक्टर इबाद यांनी गंगूसाठी काही औषधी गोळ्या व मालिशकरिता, तेल दिले. गंगूला लखनऊला रवाना करण्यापूर्वी त्याला एक इंजेक्शन ही देण्यात आले.

ठरल्या प्रमाणे डॉक्टर अहमद साहब आयशा, रशाद व लालला घेऊन बरेलीकडे रवाना झाले. नसीम साहेब सर्वांना भेटून आपल्या घराकडे रवाना झाले व हवालदार राशिद अली खान गंगूला घेऊन लखनऊ कडे जाण्याच्या तयारीला लागले.

लखनऊला पोहचताच ते प्रथम तेथील पोलीस स्टेशनला गेले. पोलीस इन्स्पेक्टरला भेटले. संपूर्ण घटनेचा तपशील दिला व म्हटले माझी इच्छा आहे की सांप तर मरायला हवा पण काठी तुटता कामा नये. ते त्यांचे भाऊ आहेत. त्यांची बदनामी होणार नाही या बाबत काळजी घ्यायला हवी. ते जर सरळ बोलाने रजियाला आमच्या हवाली करत असतील तर ठीक आहे, नाहीतर कायदेशीर कारवाई करायला हरकत नाही.''

इन्स्पेक्टर शर्मा वयस्क व अनुभवी अधिकारी होते. दोघा भावांना ओळखत होते. दोघांशी त्यांचे संबंध होते. सर्व कथनाक ऐकल्या नंतर ते विचार करू लागले. नंतर ते म्हणाले. असं करा. मुरशद अली खान यांचे नाव न सांगता रिपोर्ट करून टाका. त्या नंतर आपण दोघे जाऊन त्यांच्याशी बोलणी करु. बघू या ते कसा प्रतिसाद देतात. मला वाटतं ते सुरवातीला नकार देतील. त्यांना माहित नाही की गंगू ही आपल्या सोबत आला आहे. गंगू आपल्या सोबत आला आहे हे समजताच ते वरमतील. समजा, तरी ही त्यांनी दाद दिली नाही तर त्यांच्या घरात रज़ियाचा शोध घेतला जाईल. ज्या योजनेनुसार त्यांनी रजियाचे अपहरण केले आहे, त्यावरून रजिया त्यांच्याच घरात असायला हवी असे वाटते. तिच्यावर कोणतेच बंधन ही नसणार कारण तिला त्यांच्या बाबत अद्याप कोणताच संशय नसावा. तिला भ्रमात ठेवले गेले असेल की ते तिचे मददगार आहेत व

तिच्या बद्दल त्यांना पूर्ण सहानुभूति आहे. मला तर असं वाटतं की तुम्ही तेथे गेल्यानंतर तुमचा आवाज ऐकताच ती स्वत: धावत येईल. तसं झालं तर बरं, नाही तर नाइलाजास्तव कायदेशीर कारवाई केली जाईल."

"तुम्ही संमति देत असाल तर गंगूला शरीफ हॉटेलात राहू देऊ. गरज भासल्यास त्याला बोलाविता येईल. हॉटेलात त्याला थोडा आराम ही मिळेल."

"ठीक आहे, असे सांगून इन्स्पेक्टर ने आपल्या सहाय्यकाला हांक मारली. त्यांना रिपोर्ट कशा प्रकारे लिहून घ्यायचा या बाबत सूचना दिल्या. राशिद अली खान गंगूला घेऊन हॉटेल शरीफ मध्ये पोहचले. त्याच्या आरामाची व्यवस्था केली. स्वत: स्नान केला व थोडे जेवून घेतलं. नंतर पुन्हा पोलिस स्टेशनला पोहचले. इन्स्पेक्टर शर्मा तयारच होते. हवालदाराना बघताच सत्र इन्स्पेक्टर चौहान यांना काही सूचना देऊन हवालदार राशिद अली खान सोबत मुरशदअली खान यांच्या घराकडे रवाना झाले.

ज्या वेळी दोघेजन मुरशद अली खान यांच्या घरी पोहचले तेव्हा ते जेवत होते. त्यांचे कुटूंबीय सुद्धा जेवत होते. रजिया अर्शद व रईसा सुलताना यांच्या दरमियान बसून जेवत होती व म्हणत होती. 'काका, मला तुम्ही प्राणी संग्राहलयात घेऊन जाल ना. मला पक्षी खूप आवडतात. उद्या आपण बरेलीला जाणार आहोत ना?"

"घरचे सर्व लोक तिला सांत्वन देत होते. एवढ्यात घन्टी वाजली. मुरशदअली खान यांनी मोलकरीन कडे पाहिले. मोलकरीन ने दार उघडला. दारात इन्स्पेक्टरला पाहून ती परत फिरली व मुरशद अलीना पोलीस इन्स्पेक्टर एका व्यक्तिसह आल्याचे सांगितले."

"आणखी कोणी आहे कां?"

"नाहीं सोबत कोणी पोलीस वगैरे नाही"

"ठीक आहे त्यांना बसू द्या व चहापाण्याची व्यवस्था करा."

त्यांनी जेवण आटोपते घेतले. हात तोंड धुतले. पत्नीला इशारा केला. ती उठून त्यांच्या जवळ आली. ते बोलले "असं कर रजियाला अर्शी सोबत प्राणी संग्राहलय दाखविण्याच्या निमित्ताने हॉटेल शरीफ मध्ये पाठवून दे व तेथे एखाद्या खोलीत तिला राहू दे. सोबत लहान मुलांना ही पाठवून दे, म्हणजे कोणाला संशय वाटणार नाही. मी इन्स्पेक्टरला निरोप देतो व रजियाला रायबरेलीला पाठवून देण्याची व्यवस्था करतो.

मुरशद अलीने पानाचा विडा तोंडात कोंबला व अतिथी खोलीत प्रवेश केला. समोर धाकटा भाऊ व पोलीस इन्स्पेक्टरला पाहून सर्व प्रकार त्यांच्या लक्षात आले. ते चाणाक्ष व्यक्ति असल्यामुळे स्वत:ला सांवरून घेतले. चेहऱ्यावर कोणतेच भाव प्रगट होऊ दिले नाही. भावास उद्देशून बोलले.

"अरे भाऊ, तू कधी आलास? व घरांत का आला नाहीस. घरात कोणी परका आहे कां?"

"इन्स्पेक्टर साहेबांशी भेटणे आवश्यक होते."

"ठीक आहे, भुकेला असशील, आत जा, जेऊन घे."

मुरशदअलीला निश्चितपणे बोलत असल्याचे पाहून इन्स्पेक्टरच्या लक्षात आले की रजिया घरात नाही, इन्स्पेक्टर म्हणाले, "छान, भावाला तर जेवणा बद्दल विचारले, माझी तर विचारले ही नाही.

"क्षमा असावी, आपणा करिता इथेच जेवणाची व्यवस्था करतो." तो दाराजवळ गेले व हांक देत म्हणाले की जेवणा ची व्यवस्था येथेच करण्यात यावी.

त्याच क्षणी इन्स्पेक्टरने राशिद अली खान यांना इशारा केला. राशिदअली दाराजवळ गेले व भावास संबोधून म्हणाले.

"भाऊसाहेब" मी जेवून आलोय. असं बोलता बोलता आंत डोकाऊन पाहिले. तेथे कोणी नव्हते. त्यांच्या चेहऱ्यावर निराशाजनक भाव निर्माण झाले व इन्स्पेक्टरना परिस्थितीची जाणीव झाली."

"कमाल केलीस, आपलं घर असताना बाहेर का जेवलास"

"खरं सांगू मला खूप भूक लागली होती"

"बरं, हे सांग अचानक कसा आलास?"

"सल्ला घ्यावयाचा होता"

"कशा बाबत?"

"रजियाचे अपहरण करून येथे आणले गेल्याचा संशय आहे."

"रिपोर्ट केला की नाही."

"हो रिपोर्ट केलाय, इन्स्पेक्टर साहेबांनी सांगितले की तुमचा ही सल्ला घेतला जावा."

"अरे माझं काय, मी आता कार्यमुक्त झालो आहे. मला काही माहीत नाही. मी तर घरातच पूजापाठ करीत असतो."

"मला खात्री आहे की आपणांस माहित असते तर आपण त्वरित फोन केला असता. मला तर आपणाकडून सल्ला घ्यायचा की इतक्या मोठ्या शहरात तिचा शोध कसा घ्यायचा?"

"अरे इन्स्पेक्टर साहेब आहेत ना, तू कशाला चिंता करतोस."

या बेपर्वाईच्या उत्तराने इन्स्पेक्टर साहेबाच्या संशयाला पुष्टि मिळाली. ते म्हणाले."

"माझी इच्छा होती की आपल्या अनुभवाचा फायदा घेण्यात यावा. तसं आम्हाला काही गोष्टींची माहिती मिळाली ओह.

"काय काय माहिती मिळाली आहे? असे बोलता बोलता त्यांनी उगीचच दाराकडे पाहिले. दाराला टांगलेल्या पडद्या मागे कदाचित पत्नी रईसा सुलताना उभ्या होत्या. राशिद अली खानच्या लक्षात येताच त्यांनी वहिणीना नमस्कार (सलाम) केला.

इन्स्पेक्टर साहेबांनी खोचट प्रश्न विचारला "तुम्ही पण आमचं बोलणं ऐकत आहात" मुरशद अली शांत राहिले.

"कमाल आहे भाऊ, भावाच्या मदतीला तयार नाही."

"बघाना विचित्र जमाना आहे. मी राशिदला लहानपणा पासून पोसले आहे. वर्ष दीड वर्षापूर्वी मी यांना एक काम सोपविले होते. जमणार नाही असे उत्तर देऊन मोकळे झाले."

"हवालदार साहेब, ऐकूण खेद वाटला. आपल्या उपकारकर्त्या भावाच्या विनंतिला तुम्ही मान दिला नाहीं."

"काय सांगू साहेब, ते माझ्या हातात नव्हते." हवालदार उत्तरले."

"हे काम सुद्धा माझ्या शक्ति बाहेरचे आहे" लगेच मुरशद अली खान ने उत्तर दिले.

"मुरशदअली खान साहेब गंगू आमच्या सोबत आला आहे." हवालदार राशिदखान म्हणाले व मुरशद अली खान च्या चेहरा काळपट झाला. त्यांनी स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न केला."

"कोण गंगू? मी ओळखत नाही त्याला."

"पण तो तुम्हाला ओळखतो व आपल्या बद्दल तो कृतज्ञता व्यक्त करीत होता."

मुरशद अली गोंधळले, तरीही त्यांनी धीर सोडला नाही. म्हणाले मी कोणातरी गंगू नावा माणसाला दोनशे रुपए दिले होते."

"भाऊसाहेब, तुम्ही रजियाला आणले आहे ना? कृपा करुन."

हवालदार यांना या स्वरात बोलताना ऐकूण इन्स्पेकटरने त्यास थांबवून मुरशदअलीला सांगितले की आम्हाला आपल्या घराची तपासणी करायची. मी गंगूला बोलावून घेतो. जरा आपला टेलीफोन द्या बरे."

"हा घ्या टेलीफोन, व घर तपासून घ्या. पण हे बघ राशिद माझी बदनामी तुला महाग पडेल.

राशिद अली शांत राहिले. इन्स्पेक्टर साहेबांनी हॅटिल शरीफला फोन लावला. हॅटिल मालकांस त्यांनी आदेश दिला की खोली नंबर दोन मध्ये गंगू नावाचा इसम आहे त्यास ताबडतोब

रिडायर्ड पो. इन्स्पेक्टर मुरशदअली खान यांच्या घरी पाठवून द्यावे."

"काय? काय म्हटलंत आपण गंगू, ते सर्व आताच पोहचलेत हो, हो, अगदी माझ्या लक्षात आले. मी आलोच, खबरदार कोणला ही हॉटेल बाहेर जाऊ देऊ नका." पोलीस इन्स्पेक्टर फोन वर बोलत होते. मुरशदअली खान गांगरून गेले. ते इन्स्पेक्टर च्या तुटक्या संभाषणाचा अर्थ काढत होते. त्यानंतर पोलीस इन्स्पेक्टरने पोलीस स्टेशनला फोन लावला. दहाबारा पोलीस हॉटेल शरीफला घेराव घालण्यासाठी पाठवून देण्याचे आदेश दिले. हे ऐकूण मुदशद अली खान यांचे रक्त आटत होते. हवालदार राशिद अली खान यांनी विचारले."

"हॉटेल शरीफ मध्ये सर्व ठीकठाक आहे ना?"

"होय, आता आपण तुमच्या बंधुसह हॉटेल शरीफकडे जात आहोत."

"माझं तेथे काय काम आहे?"

"मुरशदअली खान साहेब, तुम्ही माझ्याशी सर्रास खोटे बोललात. आताच आपले पुत्र अर्शद रजियाला घेऊन हॉटेल शरीफ मध्ये पोहचलेत. त्यांना गंगूने पाहून घेतले. हा योगयोगच म्हटला पाहिजे. आता सांगा तुम्हाला काय सांगायचे. सरळ बोलाने येताय आमच्या बरोबर की करू कायदेशीर कारवाई."

मुरशद अलीखान काय बोलणार. त्यांचा चेहरा नि:स्तेज झाला. त्यांना वाटलं होते की त्यांनी बाजी मारली म्हणून पण म्हणतात ना शिकारी स्वत:च्याच जाळ्यात अडकला जातो. त्यांनी मोठ्या चलाखीने हॉटेल शरीफ मध्ये रजियाला पोहचवून दिले होते. पण त्यांना माहित नव्हते की गंगू तेथे हजर होता. ते गपचुप इन्स्पेक्टरांबरोबर जायला तयार झाले. मनांतच म्हणत होते.

करायला गेलो एक अन्.......

✻ समाप्त ✻